



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार १७ आक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# गुजरातमध्ये १६ मंत्र्यांचे राजीनामे

■ अमित शाह गुजरातमध्ये उपस्थित
■ नव्या मंत्र्यांचा शपथविधी आज



**अहमदाबाद/वृत्तसंस्था :** दिवाळीच्या अगदी तोंडावर गुजरात मंत्रिमंडळात फेरबदल होणार आहेत. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल सोडून सर्वच मंत्र्यांनी राजीनामा दिल्याने खळबळ उडाली आहे. मुख्यमंत्री पटेल यांनी मंत्र्यांना त्यांच्या निवासस्थानी बोलावले आहे. नवीन मंत्र्यांचा शपथविधी उद्याच १७ ऑक्टोबर रोजी सकाळी गांधीनगर येथील महात्मा मंदिरात भाजपचे केंद्रीय नेते अमित शाह आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांच्या उपस्थितीत होतील.

सध्याच्या गुजरात मंत्रिमंडळात मुख्यमंत्री पटेल यांच्यासह १७ मंत्र्यांचा समावेश आहे. यापैकी आठ कॅबिनेट दर्जाचे मंत्री आहेत आणि तेवढेच राज्यमंत्री (एमओएस) आहेत. (पान २ वर)

## महापालिका कर्मचा-यांना 31,000 बोनस

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवाळीच्या निमित्ताने मुंबई महानगरपालिकेने कर्मचा-यांना ३१ हजार रुपये सानुग्रह अनुदान (बोनस) देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा कर्मचा-यांच्या बोनसमध्ये दोन हजार रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या कर्मचा-यांची दिवाळी आनंदात साजरी होणार आहे. तसेच बालवाडी शिक्षिका आणि मदतनीसांना पाच हजार रुपये भाउबीज भेट म्हणून देण्यात येणार आहेत. महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांना दीपावली २०२५ साठी ३१ हजार रुपये सानुग्रह अनुदान महानगरपालिका प्रशासनाने जाहीर केले आहे. महानगरपालिकेच्या अधिकारी आणि कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय आयुक्त भूषण गगराणी यांनी घोषित केला आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आवश्यक मनुष्यबळाची उपलब्धता करावी

**मुंबई/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ते प्राधान्याने उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीसंदर्भात आयोगाच्या कार्यालयात दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ अधिका-यांची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते.मुख्य सचिव राजेश कुमार, आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव ड?. के. एच. गोविंदराज, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरव विजय, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, गृहविभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, मुंबईचे पोलिस आयुक्त देवेन भारती,



राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे

विशेष पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा, आदी यावेळी उपस्थित होते. दिनेश वाघमारे यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि इतरही कर्मचा-यांची उपलब्धता महत्वाची आहे. त्याचबरोबर राज्य निवडणूक आयोगातही काही जागा रिक्तआहेत. एकूण मनुष्यबळाच्या उपलब्धतेबाबत संबंधित विभागांना अवगत करण्यात यावे.कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. गरजेनुसार भरारी पथके, चेकपोस्ट, तक्रार निवारण केंद्र इत्यादींची व्यवस्था करावी. सर्व ठिकाणी पुरेसा पोलीस बंदोबस्त असावा. आचारसंहितेच्या प्रभावी अंमबजावणीच्या दृष्टीने (पान २ वर)

# ३१ हजार कोटींचे पॅकेज म्हणजे जुन्या बाटलीत नवी दारू

## फसव्या शासन परिपत्रकाची होळी!



**नागपूर/प्रतिनिधी :** जळाला रे जळाला, फसवा शासन परिपत्रक जळाला! या घोषणा देत शेतकरी संघटनेने (शरद जोशी विचार मंच) नागपूरच्या व्हेरायटी चौकात गुरूवारी आंदोलन केले. महाराष्ट्र सरकारच्या ९ ऑक्टोबर रोजीच्या फसव्या शासन निर्णयाची होळी करत शेतक-यांनी सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. या आंदोलनाचे नेतृत्व संघटनेचे नागपूर जिल्हा अध्यक्ष ॲड. श्रीकांत दौलतकार यांनी केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७ ऑक्टोबर रोजी पत्रकार परिषद घेउन ३१,६२८ कोटी रुपयांच्या शेतकरी पॅकेजची घोषणा केली होती. मात्र, ही केवळ शाब्दिक मदत असून, प्रत्यक्षात जुनेच पॅकेज नव्या नावाने पुन्हा सादर करण्यात आले, असा आरोप दौलतकार यांनी केला.या पॅकेजनुसार फक्त २ हेक्टर ऐवजी ३ हेक्टरपर्यंत नुकसानभरपाई देण्याची एकमेव सुधारणा करण्यात आली असून, याआधी जाहीर करण्यात आलेली २२१५ कोटींचीच तुटपुंजी मदत कायम ठेवण्यात आली आहे. त्यामुळे सरकारचा हा निर्णय म्हणजे जुन्या बाटलीत नवी दारू असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

ॲड. दौलतकार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, दिवाळी तोंडावर आली असून देखील अजून एकाही शेतक-याच्या खात्यात मदतीचा रक्कम जमा झालेली नाही. हे सरकार शेतक-यांची फसवणूक करत आहे. निवडणुकीपूर्वी फडणवीस यांनी दिलेले सातबारा कोरा करण्याचे आश्वासन अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे आम्ही सरकारला इशारा देतो की, शेतक-यांचे कर्ज त्वरित माफ करून सातबारा कोरा करा, अन्यथा यापुढे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल आणि मुख्यमंत्र्यांची दिवाळीही साजरी होउ दिली जाणार नाही. या आंदोलनात शेतकरी संघटनेचे माजी जिल्हा अध्यक्ष आणि विदर्भवादी नेते अरुण केदार, महिला जिल्हा अध्यक्षा सुधाताई पावडे, नरखेड तालुका अध्यक्ष वसंतराव वैद्य, तसेच मुकेश मासुरकर, सुनील चोखारे, प्रशांत नखाते, नरेश निमजे, सुमित तांदूळकर, विकास गोहाणे, राहुल बनसोड, राज यादव, आनंद निखार आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हे आंदोलन हे फक्तइशारा असून, जर शेतक-यांचे प्रश्न मार्गी लागले नाहीत, तर राज्यभर तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे

## हे पॅकेज नव्हे, फसवणूक आहे

**यवतमाळ/प्रतिनिधी :** राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून हजारो शेतकरी हवालदिल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने नुकताच, म्हणजेच ९ ऑक्टोबर रोजी, अतिवृष्टीग्रस्त शेतक-यांसाठी मदत निधीचा शासन आदेश जारी केला. मात्र, या आदेशात जाहीर केलेली आर्थिक मदत अत्यल्प आणि शेतक-यांच्या अपेक्षेपेक्षा खूपच कमी असल्याने संतप्त शेतक-यांनी आज गुरुवारी यवतमाळ बसस्थानक चौकात शासन आदेशाची प्रतिमात्मक होळी करून तीव्र निषेध नोंदविला.

अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, तूर यासह अनेक पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतक-यांना झालेल्या या नुकसानीनंतर त्यांना योग्य भरपाई मिळावी, अशी सर्वसामान्य अपेक्षा होती. मात्र, शासनाने जाहीर केलेली मदत तोंडाला पाने पुसणारी असल्याचा आरोप शेतकरी संघटनांनी केला आहे. शासनाने घोषित केलेल्या पॅकेजनुसार हेक्टरी फक्त काही हजार रुपयांची मदत



देण्याचा निर्णय घेतला असून, त्यामध्ये नुकसान भरपाईच्या वास्तवाशी फारकत घेतल्याचे शेतक-यांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर आज गुरुवारी झालेल्या आंदोलनात शेतक-यांनी, आम्हाला दिखाउ नाही, हक्काची मदत हवी, हे पॅकेज नव्हे, फसवणूक आहे, अशा घोषणा देत रोष व्यक्त केला. आंदोलना दरम्यान शासन निर्णयाची प्रत जाळून निषेध नोंदवण्यात आला. शेतकरी संघटनेचे राजेंद्र झोटिंग, विजय निवल, मिलींद दामले, सोनाली भरगडे, प्रज्ञा बापट, गिरीष तुरके, कुणाल देठे आदींच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. या शेतक-यांनी शासनाकडे हेक्टरी किमान ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. तसेच, नुकसानीचे अचूक पंचनामे करून थकित कर्जाचे पुनर्गठन करण्याची आणि बियाणे व खते यासाठी स्वतंत्र अनुदान जाहीर करण्याची मागणीही करण्यात आली. अन्यथा राज्य भर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.यवतमाळ जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे जवळपास साडेतीन लाख हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. उमरखेड, महागाव, यवतमाळ, आर्णी या तालुक्यांमध्ये सर्वाधिक जवळ बसली, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अतिवृष्टीच्या काळात दोन वेळा यवतमाळ दौ-यावर आले. मात्र त्यावेळी त्यांनी शेतक-यांची साधी विचारपूसही केली नव्हती. तेव्हापासून शेतक-यांमध्ये शासनाप्रती रोष दिसत आहे. आता जिल्ह्यातील सोळाही तालुक्यांना अतिवृष्टी नुकसान भरपाईचा लाभ मिळणार असला तरी, ही मदत तोकडी असल्याने शेतक-यांमध्ये नाराजी आहे. आजच्या निषेध आंदोलनानंतर जिल्ह्यातील कृषी व महसूल अधिका-यांवरही कारवाईच्या मागण्या पुढे येत आहेत. शेतक-यांच्या रोषामुळे प्रशासन आणि शासन यांच्यासमोर आगामी काळात मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे.




# ‘गुरु मां’ निघाला बाबू खान

## मुंबई पोलिसांचा संशय खरा ठरला, 20 घरं घेणा-या बांगलादेशीला अटक



**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या वर्षभरापासून देशभरात अवैधरित्या भारतात राहणा-या बांगलादेशींविरोधात सुरक्षा यंत्रणांनी कठोर पावले उचलली आहेत. घुसखोरी करुन भारतात राहणा-या हजारो बांगलादेशींना आतापर्यंत हद्दपार करण्यात आलं आहे. मात्र काही बांगलादेशींकडे आधार कार्ड आणि पॅन कार्डसारखी भारतीय कागदपत्रे असल्याचीही धक्कादायक माहिती समोर आली आहे. असं असले तरी मुंबई पोलिसांनी अशा घुसरोखोरांना शोधून काढलं आहे. मुंबई पोलिसांनी एका बांगलादेशी तृतीयपंथीयाला अटक केली असून, ती गेल्या ३० वर्षांपासून भारतात बनावट कागदपत्रांच्या आधारे राहत असल्याचे समोर आलेमुंबईत 'ज्योती उर्फ गुरु मां' या नावाने ओळखल्या जाणा-या या तृतीयपंथीयाचे खरे नाव बाबू अयान खान असल्याचे उघड झाले आहे. गोवंडीच्या शिवाजी नगर परिसरात अवैध बांगलादेशी नागरिकांविरुद्ध पोलिसांनी मोहीम सुरू केली होती. याच दरम्यान ज्योतीचे काही साथीदार पकडले गेले होते. सुरुवातीला ज्योतीलाही पोलिसांनी ताब्यात घेतले होते, पण तेव्हा तिच्याकडे आधार कार्ड आणि पॅन कार्डसह सर्व भारतीय कागदपत्रे असल्याने तिला सोडून देण्यात आलो होते. मात्र, मुंबई पोलिसांना संशय आल्याने त्यांनी या कागदपत्रांची कसून चौकशी केली. तेव्हा ते सर्व कागदपत्रे खोटी असल्याचे समोर झाले. त्यानंतर तिला पुन्हा अटक करण्यात आली.

बाबू अयान खान उर्फ 'ज्योती'कडे मुंबईतील रफीक नगर आणि गोवंडीसह विविध भागांत २० हून अधिक मालमत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. या मालमत्तांची किंमत खूप मोठी असण्याची शक्यता आहे. या भागांत तिचे अनेक अनुयायी आहेत, जे तिला 'गुरु मां' (पान २ वर)

# पंजाब पोलिस डीआयजीच्या घरात सापडले घबाड

■ सीबीआयची मोठी कारवाई
■ नोटा मोजण्यासाठी मशीनचा वापर



**चंदिगड /वृत्तसंस्था :** सीबीआयने केलेल्या कारवाईत पंजाब पोलिसांच्या एका डीआयजींच्या घरातून मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम सापडली असून या नोटा मोजण्यासाठी चक्क मशीन मागवावी लागली. आता सीबीआयने पंजाब पोलिस दलातील रोपड रेंजचे डीआयजी हरचरण सिंह भुल्लर यांना लाचखोरीच्या या प्रकरणात अटक केली आहे. सदर डीआयजींनी एका स्क्रॅप व्यावसायिकाकडून ८ लाख रुपयांची लाच आणि दरमहा सेवापानी म्हणून हप्ता मागितल्याचा आरोप आहे. ११ ऑक्टोबर रोजी नोंदवण्यात आलेल्या तक्रारीनंतर सीबीआयने ही कारवाई केली आहे. डीआयजी हरचरण सिंह भुल्लर यांनी आपल्याला एका बनावट केसमध्ये अडकवण्याची धमकी दिल्याचा आणि एका मध्यस्थामार्फत ८ लाख रुपयांची लाच मागितल्याची फतेहगड येथील स्क्रॅप व्यावसायिक आकाश बट्टा यांनी सीबीआयकडे केली होती.त्यानंतर सीबीआयने सापळा रचला आणि सेक्टर २१ चंडीगड येथे मध्यस्थ कृष्णू याला ८ लाख रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले.त्यानंतर सीबीआयने कृष्णू याला डीआयजींना फोनही करायला लावला. त्यानंतर डीआयजींनी रकमेला दुजोरा देत दोघांनाही (पान २ वर)

# जालना मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांना अटक

## १० लाखांची लाच घेताना रंगेहाथ पकडले!

**जालना /प्रतिनिधी :** जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १० लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ अटक केली आहे. पालिका प्रमुखावरच ही कारवाई झाल्याने प्रशासकीय वर्तुळात तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. प्राथमिक माहितीनुसार, एका कंत्राटदाराच्या बांधकामाचे बिल अदा करण्याच्या बदल्यात आयुक्त संतोष खांडेकर यांनी कंत्राटदाराकडे १० लाख रुपयांची मागणी केली.



कंत्राटदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची खातरजमा झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला आणि आयुक्तांना १० (पान २ वर)

# इज्जत गेली गावाची आणि आठवण आली भावाची

## ठाकरे गटावर एकनाथ शिंदे यांची टीका



**रत्नागिरी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका जसजशा जवळ येत आहेत, तसे विरोधक पराभवाच्या भितीने सरकारवर नवनवीन आरोप करीत आहेत. इज्जत गेली गावाची आणि आठवण आली भावाची अशी म्हण सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाकरे गटावर जहरी टीका केली. रत्नागिरी येथील वि. दा. सावरकर नाट्यगृहात शिवसेनेच्या बूथप्रमुखांच्या मेळाव्यात ते बोलत होते.या मेळाव्याला उद्योगमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री योगेश कदम, आमदार दिपक केसरकर, रवींद्र फाटक, माजी आमदार राजन साळवी, आमदार कीरण सामंत, आमदार नीलेश राणे, राजन महाडिक, आहिरराव, रचना महाडिक, सुभाष बने, संजय कदम, राहूल पंडीत यांच्यासह इतर पदाधिकारी व्यासपिठावर उपस्थित होते.यावेळी शिंदे म्हणाले, व्यासपीठ भरलेले असले तरी कार्यकर्त्यांचा यात मोठा सहभाग आहे. शिवसेना व कार्यकर्ते हे शिवसेनेचे एश्वर्य आहे. कोकणावर बाळासाहेबांनी प्रेम केले तेवढच कोकण वासियांनी देखील शिवसेनेवर प्रेम केले. कोकण हा शिवसेनेचा श्वास आहे,असे शिंदे म्हणाले. रत्नागिरी जिल्हा परिषदेवर १९९७ पासून शिवसेनेचा भगवा फडकत आहे. कार्यकर्त्यांच्या एकजुटीने पुढील ५६ वर्ष हा भगवा कायम फडकत राहिल. (पान २ वर)

# रस्त्यांवरील खड्ड्यामुळे स्कूल व्हॅन उलटली; 6 विद्यार्थी जखमी

**भंडारा:** शाळेतून विद्यार्थ्यांना घेउन जाणारी स्कूल व्हॅन रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे पुलावरून उलटल्याने सहा ते सात विद्यार्थी जखमी झाले आहेत. जखमी विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहे. विशेष म्हणजे शासनाच्या परिपत्रकानुसार कालपासून शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. असे असताना सीबीएसई शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळेत बोलावले गेले. सीबीएसई शाळा कायमच शासनाच्या नियमाची पायमल्ली करीत असल्याने विद्यार्थ्यांना अनेकदा त्याचे दुष्परिणाम भोगावे लागते . आज घडलेल्या या अपघातानंतर खराब रस्ते आणि खाजगी शाळांचा मनमर्जी कारभार याबद्दल पालकांमध्ये रोष निर्माण झाला आहे.

# महाराष्ट्रात सत्ता आणण्यासाठी खोट्या मतदारांची नोंदणी

## डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव असलेले आधार कार्ड! रोहित पवारांचा खळबळजनक दावा



**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज पत्रकार परिषद घेत मतचोरीचे गंभीर आरोप केले. रोहित पवार यांनी आज पत्रकार परिषदेत चक्क अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं आधारकार्ड दाखवलं. डोनाल्ड ट्रम्प यांचं जसं आधारकार्ड काढलं आहे तसं अनेकांनी आधारकार्ड काढलं असेल आणि त्या आधावर मतदार ओळखपत्र बनवलं असेल, असा दावा रोहित पवार यांनी केला. तसेच विधानसभा निवडणुकीत विविध मतदारसंघांमध्ये किती मतदार वाढले याची सविस्तर माहिती देत मतचोरीचे गंभीर आरोप केले. रोहित पवार यांनी या आरोपांनंतर काही मागण्यादेखील मागितल्या आहेत.

‘शिरुर विधानसभा मतदारसंघाचे १०२३० नावे आहेत. वडगाव शेरीत ११०६४, खडकवासला येथून १२३३०, पर्वती मतदारसंघात ८२३८, हडपसर मतदारसंघात १२७९८ असे ५४००० नावे वाढवली आहेत. आमचे कार्यकर्ते तिथे माणसं शोधायला गेली. पण एक सुद्धा माणूस तिथे सापडली नाहीत. अशोक पवार यांनी जसं सांगितलं की, बसने तिथे लोकं आणली. तिथे मतदान करुन घेतल्यानंतर परत त्यांना बसने पाठवलं. पैसे देवून लोकांना मतदानासाठी आणलं. मतदान करुन घेतलं आणि परत त्यांच्या मतदारसंघात पाठवलं. मी पिंपरीचं उदाहरण दाखवलं. तिथे ५४००० मतदारांचा घोळ झालेला आहे’, असा आरोप रोहित पवार यांनी केला.



‘खोलात जायचं झालं तर यामध्ये मेथडोलॉजी डिझाईन केली गेली. देवांग दवे माणसाने हे केलं. ते भाजपचे पदाधिकारी आहेत. ह्यांनी काय केलं? तर त्यांनी मेथडोलाजीचा वापर केला. किती लोकांना काढायचं, कुणाला काढायचं, कुणाला घालायचं, टोटल को-ऑर्डिनेशन कसं करायचं, काय करायचं हे करण्यात आलं’, असा आरोप रोहित पवार यांनी केला.

‘निवडणूक आयोग ही एक स्वायत्त संस्था आहे. या स्वायत्त संस्थेचं इंटरनेट आणि त्यांची वेबसाईट सांभाळण्याची जबाबदारी दिवांग दवे नावाच्या व्यक्तीला निवडणूक आयोगाने दिली आहे. निवडणूक आयोगाच्या (पान २ वर)



# अचलपूर शहरातील देवडी मुख्य रस्त्याची दुरावस्था
## रिपाई ने केला प्रतीकात्मक 'बेशरम झाड' लावून निषेध



**अचलपूर/प्रतिनिधी:-** अचलपूर शहरातील देवडी मुख्य रस्त्याची दुरावस्था झाली असून या परिसरात अचलपूर नगर परिषद प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे मूलभूत सुविधांचा अभाव आहे .यामुळे आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI) अचलपूर शाखेच्या वतीने प्रतीकात्मक झाड लागवड करून निषेध नोंदविण्यात आला. या आंदोलनाचे नेतृत्व शहराध्यक्ष किशोर मोहोड यांनी केले. आंदोलनात मुकेश अग्रवाल, सुनिल लाड, राम खंडेलवाल, ममदु राजा, असलम खान, श्याम खंडेलवाल, रमेश पुरोहित, लवकेश खंडेलवाल, मनोज अग्रवाल, प्रणय जुनघरे, भुपेश अग्रवाल, मुस्ताक अहमद, साकेत खंडेलवाल,भगवानदास शर्मा यांसह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.रिपाईच्या निवेदनात नमूद करण्यात आले की, देवडी चौक हा गजबजलेला भाग असून दररोज हजारो नागरिक, व्यापारी, विद्यार्थी व महिला या मार्गाने प्रवास करतात. मात्र या भागात स्वच्छतेची आणि पायाभूत सुविधांची पूर्ण कमतरता आहे. रस्त्यावर खड्डे असून, सार्वजनिक शौचालयाची अवस्था अत्यंत वाईट आहे. विशेषतः महिलांसाठी स्वतंत्र आणि स्वच्छ शौचालय न मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. 'महिला आणि नागरिकांना होणाऱ्या त्रासाकडे नगरपरिषद दुर्लक्ष करत आहे. देवडी चौक परिसरात स्वच्छता, रस्त्यांची दुरुस्ती व महिलांसाठी स्वतंत्र शौचालयाची तातडीने व्यवस्था करण्यात यावी. अन्यथा ३० दिवसांत समस्यांचे निराकरण न झाल्यास आमरण उपोषण करण्यात येईल. आंदोलना दरम्यान देवडी चौकात प्रतीकात्मक 'बेशरम झाड' लावण्यात आले.आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, हे झाड प्रशासनाच्या निष्क्रियतेच्या विरोधातील प्रतीक आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### विवाहित तरुणाने प्रेयसीचा गळा

भांबुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तपास सुरू केला. गुप्त माहिती व तांत्रिक पुरावे यांच्या आधारे मृत युवतीचे गावातील शुभम हटवार या तरुणाशी प्रेमसंबंध असल्याचे समोर आले. शुभम विवाहित असून त्याचे प्रेयसीसोबत दीर्घकाळ अनैतिक संबंध होते. मृत तरुणी सतत 'पत्नीला सोडून माझ्याशी लग्न कर' असा तगादा लावत होती. या दबावाला कंटाळून शुभम आणि त्याची पत्नी पूजा यांनी एक भयानक कट रचला. शुभमने प्रेयसीला रात्री घरी बोलावले. त्यानंतर पती पत्नी दोघांनी मिळून दोरीने तिचा गळा आवळून खून केला. मृतदेह पोत्यात भरून मोपेडवरून रेल्वे पुलाखाली नेऊन रुळावर ठेवला, जेणेकरून तिने आत्महत्या केल्याचा भास निर्माण होईल. नंतर दोघेही घरी परतले. तांत्रिक तपासात सर्व पुरावे आरोपी शुभमकडे निर्देश करीत असल्याने त्याने अखेर गुन्ह्याची कबुली दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक थोरात, आणि पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पो.उप.नि. मूलचंद भांबुरकर, अमोल देशमुख, सचिन मिश्रा, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजिया, आणि हवा. मनोज घवळे यांचे मोलाचे योगदान राहिले.

### बाफना कंपनीच्या निकृष्ट सोयाबीन

सदस्य नितीन हटवार यांनी बाफना कंपनीवर तीव्र शब्दांत हल्ला चढवत म्हटले की,'बाफना कंपनीने निकृष्ट, रोगीट बियाणे बाजारात आणून विदर्भातील शेतकऱ्यांना उध्वस्त केले आहे. कृषी विभाग आणि बियाणे महामंडळ यांची या सर्व प्रकरणात मिलीभगत असल्याचा त्यांनी आरोप केला.हटवार यांनी मागणी केली की, ज्या शेतकऱ्यांकडे कृषी केंद्राकडून खरेदी केलेल्या बाफना कंपनीच्या बियाण्यांची बिले आणि फवारणीच्या खर्चाचे पुरावे आहेत, त्या सर्व शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्यावी.जर बाफना कंपनीने नुकसान भरपाई दिली नाही, तर कंपनीविरोधात पोलीस तक्रार दाखल करून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा नितीन हटवार यांनी दिला आहे.दरम्यान, कृषी विभाग आणि बियाणे महामंडळाने तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.'शेतकऱ्यांच्या घामाचा पैसा लुटणाऱ्या कंपन्यांना सरकारने रोखले पाहिजे, नाहीतर हे आंदोलन विदर्भभर पेटेल,'असा इशारा हटवार यांनी दिला आहे.

### क्रेनच्या धडकेत आजोबाचा

आले होते. खरेदी झाल्यावर ते परत पायदळ वडूरा येथे जात होते. त्यावेळी नवी वस्ती येथील हिंदू समशानभूमी जवळ समोरून येणाऱ्या क्रेन एमएच २७ डीएल ००५० च्या चालकाने आपले वाहन निष्काळजीपणाने चालून त्यांना धडक दिली. यामध्ये आजोबा आणि नातू गंभीर जखमी झाले. त्यांना जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. जेथे राजेंद्र सायरे यांचा मृत्यू झाला तर नातू पूर्वेश जखमी आहे. त्याच्यावर उपचार सुरू आहे. घटनेनंतर क्रेनचालक तेथून क्रेन सोडून फरार झाला. पोलिसांनी क्रेन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

### धारणीतील प्राणघातक हल्ल्यात

मृत्यू झाला, तर नाजीम बेगवर उपचार सुरू होता. उपचारादरम्यान त्यांचा आज मृत्यू झाला. या प्रकरणात पोलिसांनी मुख्य आरोपी रईसोद्दीन शेख इकरामोद्दीन (वय ३६), शेख नदीम शेख काजीम (वय २४), शेख फारुक शेख रोशन (वय२५), शेख शाहरुख शेख रोशन (वय३२), अवेश खान अयास खान (वय२४), नदीम खान न्यामत खान (वय७९) व असदुद्दीन शेख अजीमुद्दीन (वय २५, सर्वे राहणार हिवरखेड अकोला) यांना अटक केली आहे. या प्रकरणात आरोपींची संख्या आणखीन वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### महसूल सेवकांना तलाठी भरतीत

अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत विविध पर्यायांवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार महसूल सेवकांना चतुर्थ श्रेणी वेतनश्रेणी लागू करण्याबाबत तरतूद नसल्याचा मुद्दा चर्चेला आला. त्यामुळे त्यांना पर्यायी व्यवस्था करण्यासाठी महसूलमंत्र्यांनी पुन्हा राज्याचे मुख्य सचिव राजेश मिना यांच्या कार्यालयात बैठक घेतली.

या बैठकीमध्ये महसूलमंत्र्यांनी महसूल सेवकांना वेतन श्रेणी देता येत नसली तरी त्यांच्या सेवेचा आणि अनुभवाचा विचार करुन त्यांना तलाठी भरतीमध्ये काही जागा राखीव ठेवण्याचा मुद्दा मांडला. त्याबरोबरच ज्यांना पाच वर्षाचा महसूल सेवकाचा अनुभव आहे. त्यांना २५ गुण अतिरिक्त देण्याच्या मुद्दयावरही चर्चा झाली. याबाबत अधिकाऱ्यांनीही सकारात्मकता दर्शविली असून लवकरच याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. महसूल सेवकांच्या इतर प्रश्नांवरही सकारात्मक निर्णय घेण्यात येईल,असे आश्वासनही महसूलमंत्र्यांनी बैठकीवेळी दिले. महसूल सेवकांना यापूर्वीच मानधन वाढ देण्यात आली आहे. त्याबरोबरच त्यांच्या प्रश्नांना सरकार कायम प्राधान्य देत असते. सध्या ऑनलाईन पद्धतीने सर्व सेवा देण्यात येत असल्याने महसूल सेवकांचे बरेच काम कमी झाले आहे. पूरस्थितीच्या काळात अनेक महसूलसेवक संपावर होते. त्यामुळे अधिकाऱ्यांना काम करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे. याचाही महसूल सेवकांनी विचार करायला हवा, अशीही चर्चा बैठकीवेळी झाली.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहनाला

उपस्थित होते. उपस्थितांना निम्न पेढी प्रकल्पातील पुनर्वसनाबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात आली. तसेच लोकप्रतिनिधींच्या शंकांचे समाधान करण्यात आले.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी पुनर्वसित गावात रस्ते, दिवाबत्तीची सोय करण्यात आली आहे. तसेच १५० घरकुल मंजूर करण्यात आली आहेत. तसेच स्थलांतरणासाठी देण्यात येणारा दोन लाख रूपयांचा भत्ता एकरकमी देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगितले. तसेच पुनर्वसित गावांमधील सोयीसुविधांसाठी ५७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून गावाच्या मागणीप्रमाणे इतर योजनांमधून सुविधा उभारण्यात येतील. प्रकल्पामुळे १२ हजार हेक्टर क्षेत्रात सिंचनाची सुविधा होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्यासाठी पर्यायी रस्ते करून दिले जाणार आहे, असे सांगितले.शासनाने निम्न पेढी प्रकल्पाच्या घळभरणीची परवानगी दि. १४ ऑक्टोबर रोजी दिली आहे. त्यामुळे तातडीने हे काम हाती घेण्यात आले आहे. घळभरणीचे काम फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. येत्या काही दिवसांत प्रकल्पात पाणी साठण्यास सुरवात होणार असल्याने हा पाणीसाठा बाधीत गावात येणार आहे. त्यामुळे अद्यापही स्थलांतरीत झाले नसलेल्या नागरिकांना विश्वासात घेऊन त्यांचे स्थलांतर करावे, अशा सुचना देण्यात आल्या. बाधित गावातील नागरिकांना प्राधान्याने घरकुल मंजूर करण्यात येणार आहे. त्यामुळे कोणत्याही नागरिकाची निवाऱ्याशिवाय गैरसोय होणार नाही. निम्न पेढी प्रकल्प प्रधानमंत्र्यांचा प्राधान्याचा प्रकल्प असल्याने यास गती देण्यात आली आहे. सरपंचांनी सकारात्मक पावले उचलून नागरिकांचे पुनर्वसित गावात स्थलांतरीत करावे, असे आवाहन त्यांनी केले.निम्न पेढी प्रकल्पातील सर्व गावांचे पुनर्वसन होण्यासाठी पारदर्शकता राखण्यात आली. विशेष पॅकेज देण्यात आल्याने प्रकल्प मार्गी लागण्यास मदत होणार आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींशी सातत्याने संवाद राखला. त्यांच्या प्रयत्नातील सातत्याने प्रकल्पबाधीत पुनर्वसित गावात जाण्यास तयार झाले आहेत. प्रकल्पबाधितांच्या मागण्या आणि देण्यात येणाऱ्या सुविधांमुळे हा प्रकल्प मार्गी लागण्यास मदत होणार आहे.

### महानगरपालिका आयुक्तांची राजापेठ

प्राधान्य आहे. मनपा प्रशासन, वाहतूक पोलीस आणि नागरिकांनी परस्पर सहकार्य केल्यास अमरावतीची वाहतूक व्यवस्था नक्कीच सुधारेल. या पाहणीदरम्यान उपस्थित अधिकाऱ्यांना आयुक्तांनी राजापेठ परिसरातील सर्व मुख्य चौक, बाजारपेठ परिसर आणि बसस्थानकाजवळील पार्किंग क्षमतेचे पुनर्मूल्यांकन करण्याचे निर्देशही दिले. आवश्यक असल्यास नवीन पार्किंग झोन निर्माण करण्याबाबत अभ्यास अहवाल तयार करण्याचे आदेश देण्यात आले. मनपा प्रशासनाने पुढील काही दिवसांत राजापेठ परिसरात वाहतूक सुधारणा आराखडा तयार करून तो अमलात आणण्याची तयारी सुरू केली आहे. या आराखड्यात पार्किंग झोनचे पुनर्निर्धारण, वाहनांच्या एकमार्गी हालचाली, तसेच पादचारी मार्गांचे संरक्षण या गोष्टींना विशेष प्राधान्य दिले जाणार आहे. शहरातील वाहतुकीच्या शिस्तीसाठी नागरिकांचे सहकार्य अत्यावश्यक असल्याचे सांगत आयुक्त यांनी सर्व वाहनचालक आणि व्यापाऱ्यांना महानगरपालिकेच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले. या पाहणी दरम्यान पोलीस सहाय्यक आयुक्त संजय खताळे, पोलीस निरीक्षक प्रविण वांगे, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दिपक खडेकर, उपअभियंता सुहास चव्हाण, प्रमोद इंगोले, लक्ष्मण पावडे, वाहतूक पोलीस, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

### बिबट्याने पाळीव श्वानाची केला

संजय देऊळकर आपल्या कुटुंबासमेत राहतात. देऊळकर कुटुंबाने आपल्या घरात शिवा नामक एक श्वान पाळला आहे. त्याचे वय पाच वर्षे आहे. देऊळकर परिवार वरच्या मजल्यावर राहतात. रात्री घराच्या अंगणात त्यांचा कुत्रा रखवाली करतो. बुधवारी मध्य रात्री तीन वाजताच्या दरम्यान बिबट्याने अंगणात उडी मारली आणि श्वानाचा फडशा पाडला आणि त्याला घेऊन जंगलाकडे निघून गेला. त्याचवेळी परिवारातील सदस्य जागी झाले. त्यांना त्यांचा पाळीव कुत्रा दिसला नाही आणि तेथे रक्ताचे डाग दिसले. त्यांनी तत्काळ वन विभागाला सूचित केले.वनाधिकाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला आणि बिबट्याला पकडण्यासाठी शोध मोहीम आखली, परंतु बिबट्या दिसला नाही. बिबट्याने पाळीव श्वानाची शिकार केल्याने परिसरात भीतीचे वातावरण आहे.

### नांदगाव पंचायत समितीने केला

जि प शाळा पहूर च्या विद्यार्थ्यांनी स्वागत नृत्य करत सर्वांची मने जिंकली.या सन्मान सोहळ्यात ५८ शिक्षकांचा मिशन पटसंख्या वाढ, ३ शिक्षकांचा नवोदय पात्रता परीक्षेतील योगदान व २ शिक्षकांचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. तसेच केंद्राच्या पटसंख्येत विशेष वाढ झाल्याबद्दल केंद्रप्रमुख अनिल कोल्हे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सन्मान करण्यात आलेल्या शिक्षकांमध्ये सुरज वाघमारे, अनंत राठोड, प्रतिभा पवार, भाग्यश्री पानसरे, सरोज रघुवंशी, इंदिरा पोटेकर , विष्णू आडे , जफरअली गुलामअली, रंजना मानेकर, ज्योती मंडलकर, वंदना ढगे , वसंत मून , शंकर कवाने, सुनिता जुमळे , दिलीप गुल्हाने, माधवी कहाळे, राजेंद्र बांडाबुचे, सचिन अवघड, प्रतिभा राऊत, विद्या गायगोले, मंजुश्री मांजरे , राजश्री भडांगे, अब्दुल हाफिज अब्दुल रशीद, अहमद अली मुजफ्फर अली, जितेंद्र फुलझेले, अनामिका बांगर , अब्दुल फहीम अब्दुल गफार, विजया थोरात , वंदना सरोदे, मीना हरणे, अरुणा घुगे, संजय भडांगे , शुभांगिनी कारमोरे , वंदना ढेबरे , वनिता मानकर, लता गुल्हाने , नितीन सयाम, कलीम खान पठाण, प्रभावती भस्मे , सुनिता लढे , नीलिमा डेकाटे, पुनम पारधी, अर्चना सरोदे, प्रशांत सापाने , गजानन होळकर, श्रद्धा जगताप , ज्योती सोर्व, परमानंद वैष्णव , धनाजी चव्हाण, सुरज मुंडे, विजय खानजोडे , नलू ससाने, रेखा राठोड , सुप्रभा मोहोड, मिर्झा शफिक बेग, संगीता मुंडे, मंगला अळसपुरे, प्रकाश बावनकुळे, वर्षा भांदरगे , राजू कांबळे, विवेक मालगे, आदींचा समावेश होता. यावेळी मान्यवरांनी आपली मते व्यक्त करीत शिक्षकांना प्रेरणादायी संदेश दिला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शालेय पोषण आहार अधिक्षक तथा शिक्षण विस्तार अधिकारी विलास बाबरे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन राधा मोहोड तर आभारप्रदर्शन शिक्षण विस्तार अधिकारी वैशाली महाजन यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ यांचे मार्गदर्शनात केंद्रप्रमुख अनिल कोल्हे, विलास राठोड, प्रवीण मेहरे, बाळासाहेब मुंदे, अविनाश आढाव, बलदेव घुगे, भूषण बागडे, रमेश राठोड विशेष शिक्षक रंगारी, नावेद, निंघोट, आदींनी परिश्रम घेतले.

### चोरी गेलेले १०५ मोबाईल मूळ

जप्त केले व मूळ मालकांना परत केले. यावेळी आयुक्तांनी नागरिकांना सायबर सुरक्षा बद्दल महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, शहरातील सायबर गुन्हे, ऑनलाइन आर्थिक फसवणूक, महिला व बालकांविरुद्ध होणारे अपराध, सोशल मीडियाचे संभाव्य धोके, सायबर सुरक्षा, मोबाईल सुरक्षा इत्यादी बाबत जनजागृती करण्याकरिता सायबर स्टेशन मार्फत महाविद्यालय ,शाळा ,व्यवसायिक संकुले, महत्त्वाचे चौक व इतर ठिकाणी प्रशिक्षित पोलीस अधिकारी व अंमलदार पाठवून मार्गदर्शन करण्यात येत आहे. दहा पोलीस ठाणे मार्फत विविध ठिकाणी कार्यक्रम घेतले जात आहे. सायबर अवेअरनेस ऑन विल्स, अवेअरनेस पुस्तिका, अवेरअनेस वाचनालय आदि उपक्रम घेण्यात आले आहे. तसेच सायबर गुन्ह्याशी संबंधित आर्थिक फसवणूक बाबत तक्रार करण्यासाठी १९३० अथवा १९४५ हेल्पलाइनवर तसेच सायबर क्राईम संकेतस्थळावर तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले. सायबर गुन्हेगारांबाबत जनजागृती करण्याकरिता पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे, अनिकेत कासार, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रियंका कोटावार यांच्या नेतृत्वात कार्य केले जात आहे.

### अंजनगाव सुर्जी नगरपरिषद

पुन्हा एकदा आपली 'ताकद आजमावतात की एकमेकांशी हातमिळवणी करून निवडणुकीला सामोरे जातात, याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.६ ऑक्टोबर रोजी नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाले. त्यातच अनुसूचित जाती प्रवर्गासाठी नगराध्यक्षपद निघाल्याचे कळताच खुल्या प्रवर्गातील ' उमेदवारासह सर्वांच्या आनंदाला ब्रेक लागले. सध्या दिवाळीची धामधुम सुरू असून ही कोणीही अन्य विषयावर बोलताना दिसून येत नाही. त्यामुळे आता सामना चांगलाच रंगणार ' हे वाक्य सर्वांच्या तोंडातून निघत आहे. मागील निवडणुकीत अनुसूचित जाती प्रभागातून निवडून आलेल्या काहीं माजी, तर काही विद्यमान सदस्यांच्या आशा यामुळे पल्लवीत झाल्याचे दिसून येत आहे.

याशिवाय पंचवार्षिक प्रमाणे यंदाची निवडणूक चांगलीच रंगणार असल्याचे दिसून येत आहे. आता राष्ट्रीय' पक्षाकडून कुणाला तिकीट मिळते, कुणाला अपक्ष मैदानात उतरावे लागते, यावरही बरीच गणिते अवलंबून राहणार आहे.

### गुजरातमध्ये १६ मंत्र्यांचे

भाजपच्या सर्व आमदारांना आणि मंत्र्यांना दोन दिवस गांधीनगरमध्ये राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मंत्रिमंडळात समाविष्ट होण्याची अपेक्षा असलेल्या आमदारांना फोनवरून माहिती देण्यात आली आहे.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा शुक्रवारी सकाळी गुजरातमध्ये पोहोचणार आहेत. सहसा, जेव्हा मंत्रिमंडळ विस्तार होतो तेव्हा भाजप हायकमांडमधील इतके नेते उपस्थित नसतात, त्यामुळे सरकारमध्ये मोठे बदल होण्याचे संकेत आहेत. राष्ट्रीय संघटनेचे सरचिटणीस सुनील बन्सल आज गुजरातला भेट देणार आहेत. दरम्यान, मंत्र्यांचे राजीनामे राज्यपाल देवव्रत आचार्य यांना सादर केले जातील. राजीनाम्यांसोबतच नवीन मंत्र्यांची यादी राज्यपालांना सादर केली जाईल.

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

संपूर्ण यंत्रणेने सजग राहणे आवश्यक आहे. कुठेही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असेही वाघमारे यांनी सांगितले.

मुख्य सचिव राजेश कुमार यांनी सांगितले की, राज्य निवडणूक आयोगाला निवडणुकांसाठी आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाईल. निवडणूक निर्णय अधिका-यांची पुरेशी उपलब्धता होण्याच्या दृष्टीने आतापासूनच नियोजन केले जाईल. कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीनेही आवश्यक ती खबरदारी घेतली जाईल.

आयोगाचे सचिव काकाणी यांनी निवडणुकांच्यादृष्टीने आवश्यक बाबींसदर्भात माहिती दिली. ते म्हणाले की, राज्यातील सर्व २९ महानगरपालिका, २४६ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायती, ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुकांची तयारी सुरू आहे. प्रभाग रचनेचे काम पूर्ण झाले आहे. आरक्षण निश्चिती आणि मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आला आहे. निवडणुकांच्या अनुषंगाने विविध आदेशही निर्गमित करण्यात आले आहेत.

### .पंजाब पोलिस डीआयजीच्या

ऑफीसमध्ये बोलावले. त्यानंतर सीबीआयच्या टीमने डीआयजी हरचरण भुल्लर यांना त्यांच्या ऑफीसमधूनच अटक केली. त्यानंतर सीबीआयने डीआयजींच्या चंडीगड आणि रोपड येथील मालमत्तांवर टाकलेल्या धाडींमधून सुमारे ५ कोटी रुपये रोख, १.५ किलो सोने, २२ आलिशान घड्याळे, दोन लक्झरी कारच्या चाव्या, निनावी मालमत्तांची कागदपत्रे आणि ४० लिटर विदेशी मद्य जप्त करण्यात आले. याशिवाय त्यांच्याकडे एक डबल बॅरल गन, पिस्तूल, रिव?ल्व्हर आणि एअरगनही सापडली. तर मध्यस्थ कृष्णू याच्याकडे २१ लाख रुपये सापडले.

### जालना मनपा आयुक्त

लाख रुपयांची लाच घेताना त्यांच्या मोतीबाग येथील शासकीय निवासस्थानी रंगेहाथ पकडले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी सध्या आयुक्तसंतोष खांडेकर यांच्या मोतीबाग येथील शासकीय निवासस्थानी झडती घेत आहेत. या झडतीमध्ये आणखी कोणती माहिती किंवा कागदपत्रे हाती लागतात, याकडे जालना शहरासह संपूर्ण प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे. पालिका आयुक्तांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून या प्रकरणात मोठी कारवाई होण्याची शक्यता आहे. या घटनेमुळे जालना महानगरपालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### 'गुरु मां' निघाला बाबू

म्हणून मानत होते. मुंबईतील शिवाजी नगर, नारपोली, देवनार, ट्राबे आणि कुर्ला अशा अनेक पोलीस ठाण्यांमध्ये 'ज्योती'वर गुन्हे दाखल आहेत. मुंबई पोलिसांनी ज्योतीला पारपत्र अधिनियम आणि भारतीय न्याय संहिताच्या विविध कलमांखाली अटक केली आहे. मुंबई पोलिसांच्या या कारवाईमुळे बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतात राहणा-या अवैध नागरिकांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

दिल्लीतही अशीच कारवाई

काही दिवसांपूर्वी दिल्ली पोलिसांनीही शालीमार बाग आणि महेन्द्रा पार्क परिसरात कारवाई करत १० बांगलादेशी नागरिकांना पकडले होते. यापैकी अनेकांनी लिंग परिवर्तन केले होते आणि ते भीक मागण्याच्या व्यवसायात गुंतले होते. त्यांनी भारतीय नागरिक असल्याचा दावा केला होता, पण चौकशीत ते अवैध नागरिक असल्याचे स्पष्ट झाले.

### इज्जत गेली गावाची आणि

मागील निवडणुकीत आणि आता येणा-या निवडणुकीत धनुष्यबाण आपल्याकडे आहे. त्यामूळे खरी शिवसेना आपली आहे. हा धनुष्य बाण वेगाने पळत आहे. त्यामुळे विरोधाकांची पळता भुई थोडी झाली आहे. या निवडणुकांमध्ये सर्व पदाधिकारी रस्त्यावर उतरल्यास विरोधकांचे डीप ?झीट जप्त झाल्या शिवाय राहणार नाही. मागील निवडणुकीत शिवसेनेच्या ९ जागांपेकी ८ जागा आपण जिंकलो आहेत, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

ते म्हणाले, आपण शिवसेना कार्यकर्त्यांच्या वि□ासाला तडा जावू देणार नाही. मुख्यमंत्री असताना आपण अनेक योजना आणल्या. युती सरकारने या योजना घराघरात पोहचविल्या आहेत. शासनाच्या योजनाचा पाच कोटी लोकांना याचा फायदा झाला आहे. येणा-या निवडणुकीत मतदार काम करणा-या लोकांना मते देतील, घरी बसणा-या लोकांना मते देणार नाहीत. फेसबुकवर लाईव्ह असणारी लोकं चालत नाही, तर थेट काम करणारी लोकं मतदारांना आवडतात. शिवसेनेचा मावळा कधीच रडिचा डाव खेळत नाही. तो रडत बसत नाही. मात्र हा मावळा रडणारा नसून लढणारा आहे. कार्यकर्त्यांनी चुकीच्या गोष्टींकडे लक्ष न देता आपल्या ताकदी वर ही निवडणूक आपल्याला जिंकायचे आहे. येणारी निवडणूक जरी आपल्याला सोपी असली तरी आपल्या विरोधकाला कमी समजू नये. कारण विरोधक हा स्वार्थी , कपटी आहे. आपल्याला सावध राहण्याची गरज असल्याचे ही शिंदे यांनी यावेळी सांगितले.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मुंबईसह राज्यातील तीन महानगपालिकांमधील कर्मचा-यांसाठी दिवाळीचा बोनस जाहीर करण्यात आला आहे. मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगर पालिकेतील कर्मचा-यांना दिवाळीनिमित्त हे सानुग्रह अनुदान जाहीर करण्यात आलं आहे. याबाबतची घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मुंबईसह राज्यातील तीन महानगपालिकांमधील कर्मचा-यांसाठी दिवाळीचा बोनस जाहीर करण्यात आला आहे. मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगर पालिकेतील कर्मचा-यांना दिवाळीनिमित्त हे सानुग्रह अनुदान जाहीर करण्यात आलं आहे. याबाबतची घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

या घोषणेनुसार मुंबई महानगरपालिकेतील कर्मचा-यांना ३१ हजार रुपये, तसेच बेस्ट कर्मचा-यांना ३१ हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर करण्यात आलं आहे. तर ठाणे महानगरपालिका कर्मचा-यांना २४ हजार ५०० रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेतील कर्मचा-यांना ३४ हजार ५०० रुपये बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सबंधित मनपा आयुक्तांना हे सानुग्रह कर्मचा-यांना त्वरित देण्याचे निर्देश दिले आहे. त्यामुळे या तिन्ही महानगरपालिकेतील कर्मचा-यांना लवकरच हे सानुग्रह अनुदान मिळणार आहे.

### महाराष्ट्रात सत्ता आणण्यासाठी

वेबसाईटवर सर्व माहिती असते. दवे भाजपचा पदाधिकारी असेल तर आमच्या आधी दवे यांच्याकडे सर्व माहिती होती. यादीत कुणाचं नाव घ्यायचं आणि कुणाचं नाव काढायचं हे दवेंनी त्या त्या मतदारसंघाच्या आमदारांना वि□ासात घेउन केलं, असं आमचं ठाम मत आहे', असा देखील गंभीर आरोप रोहित पवार यांनी केला.

'एवढी मोठी माहिती भाजपच्या पदाधिका-याला वेबसाईटच्या माध्यमातून मिळत असेल, आम्ही जेव्हा मागतो तेव्हा आम्हाला सांगितलं जातं की देत नाही. आमच्या नेत्यांना सांगितलं जातं की, ही माहिती आम्ही तुम्हाला देउ शकत नाही. मतदार यादीचे विश्लेषण आम्हाला दिलं पाहिजे. अचानक वाढलेले मतदार होते कुठले आणि कसे आले याची माहिती आम्ही मागवली आहे. आम्हाला लेखी स्वरुपात स्पष्टपणे माहिती दिली पाहिजे', अशी मागणी रोहित पवार यांनी केली.

**जाहीर नोटीस**
प्रो.नं.४०२०/२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.१५/१०/२०२५

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**
किरकोळ अर्ज क्र.४२१/२०२५ ने.ता.२४.११.२०२५

**अर्जदार -**
१. **रोहन नामदेवराव मालवे,** वय २४ वर्षे, धंदा - शेती
२. **रोशनी नामदेवराव मालवे,** वय २१ वर्षे, धंदा - घरकाम
३. **कौसल्या पंजाबराव मालवे,**वय ७६ वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.खोलापुरी गेट जवळ, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **नामदेव पंजाबराव मालवे** हे दिनांक **२३.०३.२०२५ रोजी मरण पावले आहे.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - मयत नामदेव पंजाबराव मालवे** यांचे नावे दि.अकोला अर्बन को.ऑप बॅक म.अकोला, शाखा दर्यापूर, जि.अमरावती येथील खाते क्र. १०१८००५००८४६४ या खात्यात त्यांचे नावे रक्कम रुपये २,२८,५३४/- इतकी रक्कम जमा आहे.

आज दि.**१५.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय (व.स्तर), दर्यापूर

**जाहीर नोटीस**
प्रो.नं.४०२७/२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.१६/१०/२०२५

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**
किरकोळ अर्ज क्र.३८५/२०२५ ने.ता.०७.११.२०२५

**अर्जदार -**
१. **मंजुराबाई बाजीराव पुंडकर,** वय ८२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.फुले आंबेडकर नगर, अकोट, ता.आकोट, जि.अकोला
२. **मोहन बाजीराव सोनोने,** वय ४५ वर्षे, धंदा - मजुरी
रा.लोतवाडा, ता.दर्यापूर, जि.अमरावती

**गैरअर्जदार-** निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **जाईबाई तुळशीराम इंगोले** हि दिनांक **११.११.२०२० रोजी मरण पावली आहे.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - मयत जाईबाई तुळशीराम इंगोले** यांचे नावे मौजा लोतवाडा, ता.दर्यापूर, जि.अमरावती ग्रामपंचायत मालमत्ता क्र.३३२ क्षेत्र ७५० चौ.फुट यावर बांधलेले घर व काही खुली जागा येणेप्रमाणे मिळकत आहे.सदर मिळकतीची बाजारभाव किंमत ५०,००० रुपये इतकी आहे.

आज दि.**१६.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय (व.स्तर), दर्यापूर

**जाहीर सुचना**

माझे पक्षकार याव्दारे सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, **नामे सविता गजानन वरटकर आणि गजानन बापुराव वरटकर** यांनी **इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड शाखा अमरावती** येथे गृह कर्जाकरिता अर्ज केला असून खालील नमुद मालमत्ता ही श्री गजानन बापुराव वरटकर यांनी राजेश मारोतराव बडवाईक खरेदीखत यांच्याकडून दिनांक २७/०३/२०१४ रोजी रजिस्टर खरेदी खत नं.३५२ खरेदी केले असून सदर खरेदीखत पुर्वीचे खरेदीखत १३९० राजेश मारोतराव बडवाईक आणि सौ.कौसल्याबाई विठ्ठलराव फसाटे यांच्याकडून दिनांक २१/०६/२०१२रोजी रजिस्टर खरेदी खत नं.१३९० खरेदी केले असून खरेदीखत हे चांदूर रेल्वे ते अमरावती येथे शासकीय कामाकरिता प्रवास करतांना सदर परिसरातून गहाळ झाली आहे.

**मिळकतीचे वर्णन** :-
**मालमत्ता नंबर -** CHRA00007042
**जुना मालमत्ता नंबर-** CHRA00007042
**मॅन्युअल मालमत्ता नंबर-** P3-2187 (As per Namuna-43)
**आणि मालमत्ता नंबर -** 27 (As per Sale Deed and Correction Deed )
मौजे चांदूर रेल्वे,भाग-१, प्रगणे-मांजरखेड गाव नं. ८७ चांदूर रेल्वे, अमरावती

सदर मालमत्तेवर कोणाचा वारसा हक्क, बोजा, गहाण, पतसंस्था कर्ज असल्यास प्रसिध्द झाल्यापासून तिन दिवसाच्या आत प्रत्यक्ष कागदपत्रांसह खालील पत्त्यावर संपर्क करुन आपली लेखी हरकत नोंदवावी, त्यानंतर आपली हरकत विचारात घेतल्या जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**आपला**
**ॲड. अनिकेत देशमुख**
**इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लि.अमरावती**
**मो.-७०२८९८९७०८**

MAHAVITARAN
**E-Tender Notice**
Separate sealed Quotations in prescribed forms are invited for execution of Hiring of vehicle Tata Sumo or Equivalent for special drive activities for nominated officers of SCADA under Amravati Circle Limited to **Rs. 1.91 Lakhs** Last Date & Time for Submission of Bid: **27.10.2025 at 3 p.m.** Contact person Executive Engineer (Adm)
**Tel. No 0721-2663640**
**Superintending Engineer**
**PRO No.194** **M.S.E.D.C. Ltd. O&M Circle Office, Amravati**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, १७ ऑक्टोंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## ‘हम करे सो कायदा, नियमाची ऐसीतैसी’

# वनपरिक्षेत्र अधिकारींची माहिती अधिकार कायद्याची उघडपणे अवहेलना !

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

**येथील नव्यानेच रुजू झालेले वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) तथा जनमाहिती अधिकारी गिरीश जतकर यांच्याकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची सर्रास अवहेलना केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. नागरिकाने अधिनियमान्वये मागितलेली माहिती विहित मुदतीत न देऊन प्रशासनातील पारदर्शकतेला धक्का पोहोचविण्यात आला आहे.**




अर्जदाराने दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी दोन वेगवेगळे अर्ज सादर करून माहितीची मागणी केली होती. त्यावर जतकर यांनी दि. २८ ऑगस्ट रोजी सहाय्यक क्षेत्रपाल पी. एन. खंडारे यांना संबंधित माहिती देण्याचे लेखी आदेश दिले. मात्र, ३० दिवसांची मुदत संपल्यानंतरही अर्जदारास कोणतीही माहिती मिळाली नाही. स्मरणअर्ज दाखल करूनही जनमाहिती अधिकाऱ्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

अर्जदाराने मुख्य वनसंरक्षक यवतमाळ व उपवनसंरक्षक वाशीम यांच्याकडे तक्रार दाखल केली. त्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल झाला नाही. अर्जदाराने थेट गिरीश जतकर यांची भेट घेतली असता त्यांनी ‘माहिती सहाय्यक क्षेत्रपालांकडून घ्या’ असा सल्ला देत जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला. सहाय्यक क्षेत्रपालांनी मात्र ‘मी माहिती देऊ शकत नाही, ती जनमाहिती अधिकाऱ्यांनीच द्यावी’ असे स्पष्ट सांगितले.

यामुळे दोन्ही अधिकारी परस्पर जबाबदारी टाळत असल्याचे चित्र दिसून आले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार अर्जदाराला ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. तथापि, संबंधित जनमाहिती अधिकाऱ्याने हा कायदा धाब्यावर बसविल्याचे स्पष्ट झाले आहे. सदर प्रकरणात वनपरिक्षेत्र अधिकारी गिरीश जतकर यांनी ‘मी नव्याने रुजू झालो आहे, बाहेरगावचा असल्यामुळे मला त्रास दिला जातो’ असे असंबंधित कारण देत माहिती न देण्याचे स्पष्टीकरण दिले. अर्जदाराच्या मते, मागितलेली माहिती कार्यक्षेत्रातील संभाव्य भ्रष्टाचार उघड करण्यास कारणीभूत ठरली असती, त्यामुळे जाणूनबुजून माहिती लपविण्याचा प्रयत्न झाला आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या दस्तऐवजांनुसार, सहाय्यक क्षेत्रपालाने वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना केली असून अशा अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही होणे आवश्यक आहे. मात्र, जनमाहिती अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई न करता ‘कागदी घोडे नाचवण्यापलीकडे काहीच केले नाही,’ अशी टीका नागरिकांनी केली आहे. सरकारने नागरिकांना प्रशासनात पारदर्शकता मिळावी म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम लागू केला असताना, हाच कायदा अंमलात आणणारे अधिकारीच त्याची पायमल्ली करत असल्याने जनतेत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, आदेशाची अवहेलना केल्याबद्दल सहाय्यक क्षेत्रपाल पी. एन. खंडारे यांना कारणे दाखवा (शो कॉज) नोटीस पाठविण्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी गिरीश जतकर यांनी दिली आहे.

# लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी –राज्य सेवा हक्क आयुक्त रामबाबू नरुकुल्ला

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा नागरिकांना सेवेचा हक्क देणारा कायदा आहे. वाशिम जिल्ह्यात त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सर्व यंत्रणांनी विहित वेळेत कार्यवाही करावी, असे निर्देश अमरावती विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त रामबाबू नरूकुल्ला यांनी दिले.



**■ उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या होणार गौरव**
**■ लोकसेवा हक्क आयोगाची आढावा बैठक**

वाशिम जिल्ह्यातील कामकाज समाधानकारक असून इथुन पुढेही असेच कार्य करावे. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना गौरविण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ संबंधी श्री.नरूकुल्ला यांच्या अध्यक्षतेत बैठक नियोजन भवनात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे ,मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र जाधव,उपसचिव देवेंद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

आयुक्त श्री. नरूकुल्ला म्हणाले की, या कायद्यानुसार नागरिकांना विहित कालमर्यादेत शासकीय विभागांच्या अधिसूचित सेवा मिळणे आवश्यक आहे. लोकसेवा हक्क कायदा संपूर्ण राज्यात सर्व शासकीय सेवा देणाऱ्या विभागांसाठी लागू करण्यात आला आहे. विहित कालावधीत सेवा पुरविली नसल्यास ज्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली आहे, विभागांतर्गत येणाऱ्या अधिकतम सेवा अधिसूचित करण्यासोबतच कायद्याच्या जनजागृतीसाठी विभागप्रमुखांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, कायद्याच्या अंमलबजावणीत क्रमवारीनुसार वाशिम जिल्हा ४ थ्या क्रमांकावर जिल्हा आहे. याबद्दल जिल्हा प्रशासनाचे त्यांनी यावेळी अभिनंदन केले. विभागप्रमुखांनी आपल्या अधिनस्त अधिका-यांचे मूल्यमापन नियमित करणे आवश्यक आहे. कायदा लागू होऊन अनेक वर्षे झाली असतानाही अधिसूचित सेवांबाबत अधिकारी अनभिज्ञ असतील तर ते गंभीर आहे. ही स्थिती सुधारण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी. अर्जदाराला न्याय मिळवून देणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. ज्या विभागाच्या सेवा ऑफलाईन आहेत.त्या विभागांनी ऑनलाईनसाठी त्यादृष्टीने सर्वंकष प्रयत्न करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

प्रास्ताविक जिल्हाधिकारी श्री.कुंभेजकर यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रदान करण्यात आलेले २६६, जिल्हापरिषद अंतर्गत ग्रामपंचायत मध्ये ४९१ , नगर परिषद / नगरपंचायत मध्ये ६ आपले सरकार सेवा केंद्र असून जिल्ह्यात एकूण ७६३ आपले सरकार केंद्र आहेत. यावेळी जिल्ह्यातील सर्वोत्तम १० आपले सरकार सेवा केंद्राबाबत माहिती दिली. पुढे बोलतांना जिल्हाधिकारी म्हणाले, जिल्ह्यातील महसूल विभागाचे प्रथम अपील २२३ प्राप्त झाले होते त्यापैकी २२२ प्रकरणी निकाली काढण्यात आले. जिल्ह्यातील महसूल विभागाचे द्वितीय अपील ७ प्रकरणे प्राप्त झाली होती त्यापैकी सातही निकाली काढण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषदेद्वारे ४०८ प्रथम अपील , व्दितीय अपील १७ प्रकरणे प्राप्त झाले. त्यापैकी अनुक्रमे ४०८ व १७ प्रकरणे ही निकाली काढण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# रामनगर म्हाडा प्रकल्प पुन्हा चर्चेत

## अनियमिततेवर महत्त्वाची हालचाल

### महेंद्र गवई यांच्या निवेदनाची दखल; मुख्य अभियंत्यांकडून चौकशीच्या सूचना



**अकोला :** मौजे उमरखेड येथील रामनगर (सर्वे क्र. १५/१) येथील म्हाडा विकास प्रकल्पातील अनियमिततेबाबत काँग्रेसचे अनु.जाती विभागाचे प्रदेश सचिव व जिल्हा निरीक्षक महेंद्र गवई यांनी केलेल्या निवेदनाची अखेर दखल घेण्यात आली आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) मुख्य अभियंता–१, मुंबई यांनी दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी अमरावती म्हाडा मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांना अधिकृत पत्र पाठवून प्रकल्पाची सखोल चौकशी करून आवश्यक कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

या पत्रामुळे १३,५३०.७२ चौ. मी. जागेवरील म्हाडा विकास प्रकल्प पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरला आहे. नियमानुसार विकासकाने ३६ टक्के जागा म्हाडासाठी विकसित करून देणे अपेक्षित होते, मात्र अडीच वर्षांच्या कालावधीतून एक वर्ष उलटल्यानंतरही प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नाही, हे लक्षात घेता म्हाडा प्रशासनावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. पत्रात नमूद आहे की, प्रकल्प ठप्प असून करारातील अटींनुसार आवश्यक कारवाई करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे आता म्हाडा प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करणे बंधनकारक ठरणार आहे.

दरम्यान, विकासकाने आतापर्यंत फक्त एक कोटी रुपयांची अनामत रक्कम भरली असून, त्याबदल्यात म्हाडाने सुमारे २५० कोटी रुपयांच्या बाजारभावाची जमीन एग्रीमेंटद्वारे हस्तांतरित केली, अशी माहिती समोर आली आहे. या व्यवहारावर पारदर्शकतेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. महेंद्र गवई यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे म्हाडा प्रशासनाला हालचाल करावी लागली आहे. त्यांच्या निवेदनाची अधिकृत दखल घेतली जाणे हे लाभार्थ्यांसाठी महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.दरम्यान, स्थानिक पातळीवर म्हाडाच्या अधिकाऱ्यांविषयी ’ते विकासकांच्या दबावाखाली काम करत आहेत का?’ असा सवाल उपस्थित केला जात आहे. एवढा कालावधी उलटूनही काम सुरू न झाल्याने अधिकाऱ्यांची भूमिकाच संशयास्पद असल्याचे नागरिकांचे मत आहे. ‘याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन स्वतंत्र चौकशी समिती गठीत करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी,’ अशी मागणी नागरिक व सामाजिक संघटनांकडून पुढे येत आहे.

# कारंजा भाजप युवा मोर्चाची जम्बो कार्यकारिणी जाहीर

### युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा कारंजा शहराची जम्बो कार्यकारिणी नुकतीच जाहीर झाली असून या घोषणेमुळे युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झालं आहे. आमदार सौ. सई डहाके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजपा युवा मोर्चा वाशिम जिल्हाध्यक्ष ?ड. प्रदीप देशमुख यांच्या सूचनेनुसार, शहराध्यक्ष रोहित सम्रत यांनी ही कार्यकारिणी जाहीर केली आहे.



या नव्या कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी भूपेंद्र हरीहर, अनिकेत जाधव, रोहित चवरे, पंकज रॉय, दिनेश डोईफोडे, शिशुपाल शिंदे, विरजित ठाकुर, आदित्य गोलाम आणि शुभम अंगाईतकर यांची निवड करण्यात आली आहे.

सरचिटणीसपदी साहील राठोड, सागर आवटे, शंतनु चौधरी, नयन बलखंडे यांची तर चिटणीसपदी सौरभ गुगल्या, प्रतीक गावंडे, सागर जाधव, पवन खाडे, श्रीराम सरगर, अनिकेत काकड, पवन गोलाम आणि प्रथम टाके यांची निवड करण्यात आली आहे. कोषाध्यक्षपदी सुजल सुळे यांची तर सोशल मिडिया प्रमुखपदी सत्यम राऊत व ’मन की बात’ प्रमुखपदी कृणाल अहीरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती अर्ज सादरीकरणास सुरुवात

## सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांचे महाविद्यालयांना आवाहन


**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व तसेच मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज सादर करणे आणि नुतनीकरणाची प्रक्रिया महाडिबीटी पोर्टलवर सुरु झाली आहे. ही माहिती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, वाशिम पीयुष चव्हाण यांनी दिली.

सन २०१८-१९ पासून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क परतफेड योजना, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता (विद्यावेतन) या योजना महाडिबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन रित्या राबविण्यात येतात.

सदर शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता नवीन (Fresh) व नुतनीकरण (Renewal) अर्ज सादरीकरणाची प्रक्रिया दि. १५ जून २०२५ पासून सुरू करण्यात आली आहे. तथापि, अनेक महाविद्यालयांनी अद्याप पोर्टलवर विद्यार्थ्यांची नोंदणी पूर्ण केलेली नसल्याचे आढळून आले असून अर्ज प्रलंबित आहेत. परिणामी पात्र विद्यार्थ्यांना योजनांचा लाभ वेळेत मिळू शकलेला नाही, असेही त्यांनी नमूद केले. महाडिबीटी पोर्टलवरील डॅशबोर्डनुसार २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात अनुसूचित जाती विद्यार्थ्यांच्या अर्जांचे प्रमाण मागील वर्षाच्या तुलनेत केवळ ७.६५ टक्के इतके असून ही चिंताजनक बाब असल्याचे श्री. चव्हाण यांनी सांगितले. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी आपल्या संस्थेत प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांची १०० टक्के नोंदणी पूर्ण करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती सूचना फलकावर, तसेच महाविद्यालयीन ॅ्रूज गृपवर देऊन अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शन करावे, असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी https:// mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळाचा वापर करून लवकरात लवकर अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभाग, वाशिम यांनी केले आहे.

# पिंपरी खुर्द येथे सप्त खंजिरी वादक सत्यपाल महाराजांच्या जाहीर कीर्तनाचे आयोजन



**■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■**

तालुक्यातील शेलू बाजार इथून जवळ असलेल्या पिंपरी खुर्द येथील श्री संत भायजी महाराज संस्थानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी चालू असलेल्या श्री हनुमानजी यांचे हरिनाम सप्ताह निमित्य सप्त खंजिरी वादक, राष्ट्रीय समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांच्या जाहीर कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. बुधवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री ७.३० ते १०.३० या वेळेत पिंपरी खुर्द ते अरक रोडवर श्री संत भायजी महाराज संस्थान येथे या भव्य कीर्तनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या जाहीर कीर्तनाचा परिसरातील सर्व भाविक भक्तांनी आनंद घ्यावा व या कार्यक्रमाला उपस्थित राहावे अशी विनंती समस्त गावकरी मंडळी व भायजी महाराज संस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

# गोविंद शाळेत वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

दि. १५ ऑक्टोबर रोजी माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त गोविंद महाराज उच्च प्राथमिक मराठी शाळा येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आवडते पुस्तक वाचायला प्रोत्साहन देण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला हार घालून करण्यात आली. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका कु. अपर्णा कदम लाभल्या व त्यांनी आपल्या मनोगतातून वाचनाचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाला सर्व शिक्षकांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करणे आणि ज्ञानसंपन्न बनणे का आवश्यक आहे हे सांगण्यात आले.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, मनोज काशिनाथ जाधव यांनी १. भुजंगराव गणपतराव खरात २. पुंजाजी गणपतराव खरात दोन्हीं रा पळसखेड ता. रिसोड जि. वाशिम यांचे कडून त्यांचे मालकी व ताब्यातील खालील वर्णनाची मालमत्ता विकत घेतली आहे त्याचे **वर्णन :-** मौजे प्र. ता. रिसोड जि. वाशिम येथील भुमापन क. ७६ रिसोड प्लॉट क्र. ४६५ मालमत्ता क्र. २९२ सर्वे क्र. १०/१ चे निवासी उपयोगा करिता वि. उपविभागीय साहेब वाशिम यांनी राजस्व मामला क. NAP-34/Risod /10/1982-83 असे मंजूर केलेल्या लेआउट नकाशातील प्लॉट क्र. ५ चा खुला सालीम प्लॉट पैकी उत्तर दक्षीण वाटणीचे पुर्वेकडील भाग ज्याचे मोजमाप १५.२५ मी. उत्तर दक्षीण वाटणीचे पश्चिमेकडील मोजमाप ज्याचे मोजमाप १६ मी. आणि पुर्व पश्चिम मोजमाप ४.७५ मी., एकुण ७४.७५ चौ. मी. (८०४. ३१ चौ. फुट) ज्याचे चतु:सिमा पुर्वेस : या प्लॉट मधिल श्री ज्ञानबा निधानजी सरदार उत्तरेस यांना विकलेला प्लॉट ज्याचे क्षेत्रफळ ९३ चौ मी, पश्चिमेस : प्लॉट क्र. ६, : सरकारी रस्ता, दक्षिणेस : प्लॉट क्र. १२.

तरी वरील वर्णनाच्या मालमत्तेची खरेदी मनोज काशिनाथ जाधव यांना भुजंगराव खरात व पुंजाजी खरात यांनी दिली व त्या खरेदी सोबत १. भुजंगराव गणपतराव खरात २. पुंजाजी गणपतराव खरात यांनी डॉ. कृष्णचंद्र दगडुलालजी बभेरवाल यांच्याकडून खरेदी केलेले खरेदी खत क्र. ६९९/१९९६ दि. २९.०३. १९९६ रोजी करून दिली त्या खरेदीची मुळ खरेदी खत मनोज काशिनाथ जाधव यांना खरेदी करून दिली त्यावेळी दिली होती. परंतु मनोज काशिनाथ जाधव दि. २० सप्टेंबर २०२५ रोजी त्यांच्या घरापासुन बस स्थानक येथे जात असतांना लोणी रोड येथे त्यांची पिशवी पडली त्या पिशवी मध्ये वरील १. भुजंगराव गणपतराव खरात २. पुंजाजी गणपतराव खरात यांना डॉ. कृष्णचंद्र दगडुलालजी बभेरवाल यांनी खरेदी करून दिलेली मुळ खरेदी खत व २ कोरे बॉन्ड पेपर होते. ती गहाळ झाली आहे.

तरी सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, कोणालाही वरील संदर्भात खरेदीखत मिळाल्यास ती मनोज कृष्णराव जाधव यांना परत करावी त्या संबंधी योग्य बक्षीस देण्यात येईल. त्यासंबंधी पोलीस स्टेशन, रिसोड येथे तक्रार सुध्दा केली आहे. त्या गहाळ झालेल्या खरेदीखत व मालमत्ते संबंधी कोणाला कोणतीही हरकत, गहाण, बोजा, तारण, सावकारी व्यवहार, वारसा हक्क व इतर अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह कळविण्याचे करावे. अन्यथा कोणाचीही कुठल्याही प्रकारची हरकत / तक्रार नाही असे समजण्यात येईल याची नोंद घ्यावी करीता जाहीर नोटीस.

दि. १६.१०.२०२५

**ॲड. सतिश एस भुतडा**
माडली - ११, चतुर्भुज कॉलनी, राम मंदीराजवळ, अकोला मो. ९८२२९२४३१६


# अकोला पोलीस दलाची अनोखी दिवाळी भेट!





**■ प्रतिनिधी | अकोला ■**

**■ १ कोटी ३० लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल व मोबाईल फिर्यादींना परत**
**■ उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना पारितोषिक देऊन सन्मानित**

जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला पोलीस दलाच्यावतीने दिवाळीच्या शुभ पर्वावर ‘एक अनोखी दिवाळी भेट’ हा उपक्रम राबविण्यात आला. राणी महल पोलीस लॉन येथे झालेल्या या विशेष कार्यक्रमात जिल्हाभरातील नागरिकांना एकूण १ कोटी ३० लाख ३४ हजार १९० रुपये किंमतीचा मौल्यवान मुद्देमाल व मोबाईल परत करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती रामनाथ पोकळे, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, व अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या शुभहस्ते झाले.

अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना सांगितले की, ‘नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास दृढ ठेवणे आणि गुन्ह्यातील मुद्देमाल त्वरित व कायदेशीर प्रक्रियेने परत देणे हे पोलीस दलाचे कर्तव्य आहे.’ या प्रसंगी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी नागरिकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ‘पोलीस प्रशासन हे गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व न्याय मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर आहे. नागरिकांनी कोणत्याही भीतीशिवाय गुन्ह्यांची तक्रार करावी.’ तर कार्यक्रमाचे अध्यक्ष रामनाथ पोकळे यांनी अकोला पोलीस दलाच्या कार्याचे कौतुक करत म्हटले की, ‘हा उपक्रम जनतेचा विश्वास दृढ करणारा आणि पारदर्शक प्रशासनाचे उत्तम उदाहरण आहे.’

यावेळी एकूण १९६ मोबाईल, २६५ ग्रॅम सोने, ४२ वाहने असा सुमारे १ कोटी ३० लाखांचा मुद्देमाल नागरिकांना परत देण्यात आला. सर्व वस्तू कायदेशीर प्रक्रियेनंतर संबंधित फिर्यादींना सुपूर्द करण्यात आल्या.

आभार प्रदर्शन उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील (शहर विभाग) यांनी केले. या प्रसंगी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, ठाणेदार, मुद्देमाल अंमलदार तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. अकोला पोलीस दलाने या उपक्रमातून नागरिकांशी दृढ नातं निर्माण करत ‘सद्रक्षणाय खलनिग्रहणाय’ या ब्रीदवाक्याला साजेशी सेवा प्रत्यक्ष कृतीत उतरवली आहे हे विशेष !

### जिल्ह्यातील विभागनिहाय परत केलेल्या मुद्देमालाचा तपशील पुढीलप्रमाणे

**अकोला शहर विभाग :** १०५ मोबाईल १७,९५,०००,
**२६४ ग्रॅम सोने :** १७,९६,२५८, ४०
**वाहने :** ११,१३,०००
**अकोट विभाग :** ४७ मोबाईल ८,२९,९९८, १ ग्रॅम सोने १,०४५
**मूर्तीजापूर विभाग :** १७ मोबाईल १,९५,४००, १ वाहन २३,०००
**बालापूर विभाग :** २७ मोबाईल ३,७१,९००, १ वाहन २५,०००

**उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ स्पर्धा विजेते :** पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित ‘उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ स्पर्धा’त विभागनिहाय निवड झालेल्या मंडळांना ५,००० रोख रक्कम, प्रशस्तिपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यामध्ये अकोला शहर विभाग: मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळ, अकोला

**बालापूर विभाग:** खडकेश्वर गणेशोत्सव, पातुर

**अकोट विभाग:** नवनिर्मित गणेशोत्सव मंडळ, आडगाव

**मूर्तीजापूर विभाग:** समता व्यायाम गणेशोत्सव मंडळ, मूर्तीजापूर

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३१८ ■ शुक्रवार, १७ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## आज देवळी येथे सीसीटिव्ही कॅमेरा व फॉरेसिंक व्हॅनचे लोकार्पण

### -गृह राज्यमंत्री डॉ.भोयर यांची उपस्थिती

**वर्धा जनमाध्यम :** गृह विभाग व जिल्हा पोलिस दलाच्यावतीने देवळी शहरातील सीसीटिव्ही कॅमेरा व फिर्यादीस मुद्देमाल परत करण्याचा कार्यक्रम तसेच जिल्हा पोलिस दलास प्राप्त फॉरेन्सिक व्हॅन आणि बसेस हस्तांतरण सोहळा जिल्ह्याचे पालकमंत्री तथा गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या शुभहस्ते तसेच खा. अमर काळे, आमदार सर्वश्री दादाराव केचे, आ. अभिजीत वंजारी, आ. सुधाकर आडबैले, आ. समीर कुणावार, आ. राजेश बकाणे, आ. सुमित वानखेडे, जिल्हधिकारी वान्मथी सी., जि,प,चे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शुक्रवार दिनांक १७ ऑक्टोंबर रोजी दुपारी १ वाजता देवळी येथील पोलिस स्टेशन, छत्रपती शिवाजी महाराज नाटयगृह येथे आयोजित करण्यात आला आहे.

**डॉ. भोयर यांच्या पुढाकारातून पोलिस विभागाचे आधुनिकीकरण**

वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी तसेच गुन्हेगारांवर वचक ठेवण्यासाठी जिल्हा पोलिस विभागाच्या आधुनिकीकरणासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विशेष लक्ष दिले आहे. त्यांच्या प्रयत्नामुळे वर्धा शहर पोलिस ठाण्याची इमारत,पोलिस मुख्यालय येथे २०० निवासस्थाने तयार करण्यात आली आहे. हिंगणघाट पोलिस ठाणे व उप विभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाच्या इमरातीसाठी ६.६८ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात अला आहे. आर्वी पोलिस ठाण्याच्या इमारतीसाठी ६.६८ कोटी, पुलगांव पोलिस ठाण्यातील कर्मचा-यांच्यासाठी निवासस्थानाची निर्मिती, कारंजा व आष्टी पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकारी व कर्मचा-यांसाठी निवासस्थान तयार करण्यात येत आहे.

**पोलिसांचा तिसरा डोळा सक्षम करण्यावर जोर**

गृह राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी गुन्हेगारी कार्रवाई रोखण्यासाठी पोलिसांचा तिसरा डोळा सक्षम करण्यासाठी खास प्रयत्न केले. वर्धा व हिंगणघाट शहरात सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात आले आहे. याशिवाय देवळी शहरासह पुलगांव, आर्वी येथील सीसीटीव्ही कॅमेरा साठी मान्यता देण्यात आली आहे. नाविण्यापूर्ण योजनेतंर्गत स्मार्ट पोलिसिंग साठी तीस जलाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. पोलिसांना गतीमान करण्यासाठी नवीन चार चाकी व दुचाकी वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहे. दोन फॉरेसिंग लॅब, सायबर सिक्युरिटी लॅबसाठी देखील पालकमंत्री भोयर यांनी पुढाकार घेतला आहे.

## समृद्धीच्या कामाने तहानलेली १३ गावे, दोन दिवस बंद राहणार नळ

**वर्धा जनमाध्यम :** समृद्धी चे नाव जरी गगनभरारीचे असले, तरी त्या महामार्गाच्या कामामुळे वर्धा परिसरातील १३ गावांचे नळ कोरडे पडणार आहेत, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (मजिप्रा) जलवाहिनी दुरुस्ती आणि नवीन जोडणीच्या कामामुळे १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी दोन दिवस नागरिकांना तहान सहन करावी लागणार आहे.वर्ध्याजवळील पिपरी (मेघे) सह तब्बल १३ गावांना मजिप्राच्या जुन्या जलवाहिनीवरून पाणीपुरवठा करण्यात येतो. मात्र दोन दशकांपूर्वी टाकलेली ही वाहिनी आता जीर्ण झाली असून गळती, फुटी आणि बिघाडांनी ती त्रस्त आहे. त्यातच समृद्धी महामार्गावर उडानपुल व विविध आस्थापनांचे बांधकाम झाल्याने दुरुस्तीचे काम अगदी डोकेदुखी ठरले आहे. अखेर मजिप्राने



कायमस्वरूपी उपाय म्हणून नवीन जलवाहिनी बसविण्याचे काम सुरू केले आहे.समृद्धी महामार्ग ते जुनापाणी पूल या साडेतीन किलोमीटरच्या भागात जलवाहिनी टाकणीचं काम युद्धपातळीवर सुरू असून, ८० टक्के गळतीची समस्या सुटेल, असा दावा करण्यात आला आहे. पण तोपर्यंत दोन दिवस वर्धेकरांचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.मजिप्राने नागरिकांना उपलब्ध पाणी काटकसरीने वापरा असे आवाहन केले असले, तरी समृद्धीच्या नावाखाली जनतेची तहान भागविण्याची जबाबदारी प्रशासनाने विसरली का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

> दुरुस्ती आणि नवीन जलवाहिनी जोडणीचे काम सुरू असून, त्यामुळे दोन दिवस पाणीपुरवठा बंद राहील. नागरिकांनी सहकार्य करावे.
>
> **प्रशांत बूरडे,** कार्यकारी अभियंता, मजिप्रा, वर्धा.

### आते बहिणीनेच लावला नात्याला ग्रहण

## मामेभावासह मित्राची १२ लाखांनी फसवणूक; हिंगणघाट ठाण्यात गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** नोकरीचे आमिष दाखवून नात्यातील माणसांनाच फसविण्याचा प्रकार हिंगणघाट शहरात उघडकीस आला आहे. आते बहिणीने स्वतःच्या मामे भावासह त्याच्या मित्राला तब्बल १२ लाखांनी गंडा घातल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. हिंगणघाट पोलिस ठाण्यात संबंधित दाम्पत्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अभिषेक राजेश ब्राह्मणे (रा. महात्मा फुले वॉर्ड, हिंगणघाट) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्याची आतेबहीण प्रियंका रामचंद्र पाटील व तिचा पती रामचंद्र पाटील (रा. छिंदवाडा, मध्यप्रदेश) यांनी सरकारी नोकरीचे आमिष दाखवले. प्रियंकाने पती दिल्लीतील गृहमंत्रालयात कार्यरत असल्याचे सांगत सरकारी नोकरीसाठी ५ लाख रुपयांची मागणी केली. नात्यावर विश्वास ठेवून अभिषेकने ती रक्कम दिली.यानंतर अभिषेकचा मित्र मयुर गणेश कापटे (रा. दत्तमंदिर वॉर्ड, हिंगणघाट) यालाही नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देत त्याच्याकडूनही पैसे घेतले. एकूण १२ लाख रुपये या दाम्पत्याने घेतले. नोकरभरतीचे फार्म भरून देण्यासाठी दोघांना दिल्ली व नंतर मुंबई येथे बोलावण्यात आले, मात्र काहीही निष्पन्न झाले नाही. शेवटी दाम्पत्याने केवळ ५० हजार रुपये परत केले.उर्वरित रकमेसाठी पाठपुरावा केल्यानंतर टाळाटाळ केल्याने अभिषेक व मयुर यांनी अखेर हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी प्रियंका आणि तिचा पती रामचंद्र पाटील यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## ट्रॅक्टर टँकर चालकास काठीने मारहाण

**वर्धा जनमाध्यम :** किरकोळ वादातून कारंजा शहरात ट्रॅक्टर टँकर चालकावर काठीने हल्ला केल्याची घटना १५ ऑक्टोबर रोजी इंदिरा नगर परिसरात घडली. ट्रॅक्टर बाजूला घे, असे सांगत झालेल्या बोलचालीतून वाद पेटला आणि थंड पाण्याचे कॅन वितरित करणाऱ्या मालवाहू वाहनचालकाने ट्रॅक्टर चालकावर हल्ला केला.या मारहाणीत रामेश्वर हरीभजन ढोबाळे (रा. कारंजा) हा जखमी झाला आहे. प्रफुल सातपुते (रा. इंदिरा नगर, कारंजा) याने हा प्रकार घडवून आणल्याचे तक्रारीत नमूद असून कारंजा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## राष्ट्रीय पातळीवर वर्ध्याचा गौरवः डॉ.मोहोड यांना 'इमिनन्ट इंजिनियर्स' पुरस्कार

**वर्धा जनमाध्यम :** देशातील नामवंत अभियंत्यांचा सन्मान करणाऱ्या दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स (इंडिया) या राष्ट्रीय संस्थेच्या 'इमिनन्ट इंजिनियर्स' पुरस्काराने वर्ध्याचे प्रा. डॉ. शरद वासुदेवराव मोहोड यांना सन्मानित करण्यात आले. केरळ स्टेट सेंटरच्या त्रिवेंद्रम येथे झालेल्या इलेक्ट्रिकल नॅशनल कन्व्हेन्शनमध्ये केरळचे ऊर्जामंत्री कृष्णकुट्टी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.या कार्यक्रमाला संस्थेच्या इलेक्ट्रिकल डिव्हिजन बोर्डचे अध्यक्ष आनंद जवंजाळ, केरळ स्टेट सेंटरचे अध्यक्ष बालकृष्ण नायर तसेच कोलकाता येथील डायरेक्टर चक्रवर्ती हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. एक शतकी



गौरवशाली परंपरा असलेल्या 'दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स' या बहुविद्याशाखीय व्यावसायिक संघटनेतर्फे यंदा विज निर्मिती, प्रसारण, वितरण आणि वापरातील आधुनिक प्रवृत्तीवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) प्रभाव या विषयावर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून चार नामवंत अभियंत्यांना 'इमिनन्ट इंजिनियर्स' सन्मान देण्यात आला. एम.आर. नारायणन, डॉ. टेसी थॉमस, ए.ए. नौशात यांच्यासह डॉ. मोहोड यांचा यात समावेश आहे.प्रा. मोहोड यांनी यापूर्वी इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स अमरावती लोकल सेंटरचे अध्यक्ष पद भूषविले आहे.

त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन लेख प्रसिद्ध केले असून अनेक पेटंट्स व कॉपीराइट त्यांच्या नावे नोंदविले गेले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्रात उत्कृष्ट यश मिळविले आहे. त्यांनी इंजिनिअरिंग क्षेत्रात विद्यार्थी हिताचे अनेक उपक्रम राबविले आहेत.मूळचे वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील अंतोरा गावचे असलेले डॉ. मोहोड यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

### अवघ्या एका तासात हरवलेली श्रेया सापडली

## पुलगाव पोलिसांची जलद मोहीम; आईने व्यक्त केला आभार

**पुलगाव जनमाध्यम :** हाउसिंग बोर्ड कॉलनी, जुना पुलगाव येथील ११ वर्षांची श्रेया किशोर फोंडे ही दुपारी शाळेतून परतल्यानंतर घरात आली नाही, म्हणून घाबरलेल्या अवस्थेत आईने पोलिस ठाण्यात धाव घेतली. पुलगाव पोलिसांनी तत्काळ मोहिम सुरू करत अवघ्या एका तासात हरविलेल्या श्रेयाचा शोध लावला.श्रेया ही ज्ञानभारती विद्यालयात पाचवीत शिकणारी विद्यार्थीनी आहे. दुपारी दोनच्या सुमारास घरात पोहोचली नसल्याने तिच्या आईची चिंता वाढली. ठाणेदार यशवंत सोळसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार विनोद रघाटाटे, अमोल बर्डे, राजू वैद्य, गोपाल बावनकर, उमेश बेले, सत्यप्रकाश इंगळे आणि इतर कर्मचाऱ्यांनी तातडीची कारवाई केली.अखेर श्रेया आर्वी परिसरात सुरक्षित अवस्थेत सापडली आणि तिला आईच्या ताब्यात सुपूर्त करण्यात आले. आपल्या मुलीचा सुखरूप शोध लागल्याने आईने दिलासा व्यक्त करत पुलगाव पोलिसांचे आभार मानले. पोलिसांच्या जलद कारवाईचे नागरिकांनी कौतुक केले.

## पॅकेज च्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक

### -सरकारच्या हेराफेरीला शेतकऱ्यांचा 'धरणे'

**वर्धा जनमाध्यम :** अतिवृष्टीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर सरकारने दिलासा नव्हे, तर आकड्यांचे मीठ चोळले आहे, ३१६२८ कोटींच्या पॅकेजचा गाजावाजा करून राज्य सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचा आरोप आज शेतकरी संघटनेने केला. संतप्त शेतकऱ्यांनी वर्ध्यात रस्त्यावर उतरून शासन निर्णयाची होळी केली आणि शेतकरीहिताच्या नावाने आकडेवारीचा बाजार मांडणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा निषेध केला. सोयाबीन पिकावर चारकोल रॉट व यलो मोझॅकचा तडाखा बसून शेतकरी दिवाळीच्या उंबरठ्यावर अडचणीत सापडले आहेत. अशा काळात सरकारचे पॅकेज हे केवळ डोळ्यात धूळफेक असल्याचा आरोप करत आंदोलनकर्त्यांनी हेक्टरी ५० हजारांची नुकसानभरपाई देण्याची मागणी केली.



या धरणे आंदोलनाचे नेतृत्व शेतकरी नेते माजी आमदार वामनराव चटप, शेतकरी संघटनेच्या नेत्या माजी आमदार सरोज काशीकर, स्वतंत्र भारत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मधुसूदन हरणे, महिला आघाडी प्रदेश प्रभारी शैला देशपांडे, शेतकरी संघटना जिल्हा प्रमुख उल्हास कोंटबकर, युवा आघाडी माजी प्रदेशाध्यक्ष सतीश दाणी यांनी केले. आंदोलनात नंदूभाऊ काळे, विजय राठी, वसंत व-हाडे, शांताराम भालेराव, नितीन भगत, राजू नगराळे, दामू वादाफळे, विजय धोटे, सुखदेव पाटील, सुनिल हिवसे, जिवन गुरनूले, बाबाराव दिवांजी, पुंडलीक हुडे, हेमराज ईखार, सचिन ठवरी, सारंग दरणे, डॉ. अनील पोफळे, प्रभाकर झाडे, गोविंद पेटकर, खुशाल हिवरकर, बाबाराव पठाडे, प्रकाश ढोक, श्याम मारघोडे, मिलींद देशपांडे, पिंटू महाजन, मधुकर येनकर, पदमाकर राऊत, दत्ता राऊत यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

## सावंगीतील दत्ता मेघे आयुर्वेदिक कॉलेजमध्ये वाहतूक नियमांची जनजागृती

**वाहतूक नियंत्रण शाखेचा उपक्रम**



**वर्धा :** अपघातांविषयी जागरूकता वाढविण्यासाठी वर्धा पोलीस विभागाच्या वाहतूक नियंत्रण शाखेतर्फे सावंगी (मेघे) येथील श्री दत्ता मेघे आयुर्वेदिक कॉलेजमध्ये जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या सूचनेनुसार हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमात वाहतूक पोलीस निरीक्षक विलास पाटील आणि सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रियाज खान यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. वाहन चालविताना हेल्मेटचा वापर अनिवार्य आहे, मोबाईल वा हेडफोनचा वापर टाळावा, अपघात झाल्यास जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करावे तसेच डायल ११२ वर त्वरित संपर्क करावा, अशा सूचना त्यांनी विद्यार्थ्यांना दिल्या. तसेच डायल १०८ अँब्युलन्स सेवा, सायबर फ्रॉड, सायबर क्राईम, पोस्को कायदा, महिला सुरक्षा आणि गुड टच-बॅड टच यासंदर्भात माहिती देण्यात आली. अलिकडेच वर्धा-नागपूर मार्गावरील अपघातात कॉलेजच्या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेनंतर विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमात सूचना मांडल्या असून पोलिसांनी त्या गांभीर्याने घेत कार्यवाही सुरूवात केली असल्याचे वाहतूक पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी सांगितले,

## बाल संगोपनच्या लाभासाठी आधारसोबत बँक खाते संलग्न आवश्यक

**वर्धा जनमाध्यम :** महिला व बाल विकास विभागाच्यावतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना राबविण्यात येत आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी बालकांच्या आधारकार्ड सोबत बँक खाते संलग्न असणे आवश्यक आहे. लाभासाठी आधार संलग्न करून योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बालसंगोपन योजनेचा लाभ घेण्यासाठी अनाथ किंवा ज्यांच्या पालकांचा पत्ता लागत नाही व जी बालके दत्तक देणे शक्य नाही असे बालक, एक पालक असलेली बालके त्यामध्ये एका पालकाचा मृत्यु तसेच घटस्फोट, पालक विमुक्तीकरण, परित्याग, अविवाहीत मातृत्व, गंभीर आजार, पालक रुग्णालयात असणे या कारणामुळे विघटीत असलेली बालके, कुटूंबातील तणाव, तंटे, वादविवाद यासारख्या कौटूंबिक संकटातीत बाधित बालके, कुष्ठरोग पालकांची बालके, जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची बालके, तुरुंगात पालकांची बालके, एचआयव्हीग्रस्त पालकांची बालके, कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने बाधित पालकांची बालके, तीव्र मतिमंद बालके, एचआयव्ही व कॅन्सरग्रस्त बालके, ४० टक्के पेक्षा अधिक अपंगत्व असलेली बालके, अंध, दिव्यांग, बालके, भिक्षा मागणारी बालके, पोक्सो अधिनियमांतर्गत बळी पडलेली बालके, तीव्र कुपोषित बालके, सॅमबालके, दुर्धर आजार असलेली बालके, व्यसनाधीन बालके, विविध प्रकारच्या दंगलीनी प्रभावित झालेली बालके, कोविड सारख्या रोगाच्या प्रादुर्भावाने दोन्ही किंवा एक पालक गमावलेली बालके, नैसर्गीक आपत्तीमध्ये दोन्ही किंवा एक पालक गमावलेली बालके, बालविवाहाला बळी पडू शकणारी बालके, विधी संघर्षग्रस्त बालके, दोन्ही पालक दिव्यांग असलेली बालके, रस्त्यावर राहणारी शाळेत न जाणारी, बालकामगार बालके, कौटूंबिक हिंसाचार प्रकरणात गुंतलेल्या पालकांची बालके, भिक्षेकरी गृहात दाखल पालकांची बालके पात्र राहणार आहे.

योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी २ हजार २५० रुपये प्रति महिना देण्यात येते. जिल्हात १० स्वयंसेवी संस्थामार्फत व कार्यालयामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे.

बाल संगोपन योजनेचा लाभ मिळण्यासाठी पालकांचा विहित नमुन्यातील अर्ज, पालकांचे संमतीपत्र व हमीपत्र, डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र, मुलांचे शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र (मुळ प्रत), पालकांचे रेशनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, आधारकार्डची छायांकीत प्रत, पालकांच्या मुलांचे, ग्रामसेवक, संरपच यांचे रहिवाशी प्रमाणपत्र, पालकांचा व मुलांचा घरासमोरील दर्शनी भागाचा फोटो, वडील, आई यापैकी कोणीही मृत्यू पावल्यास त्यांच्या मृत्यूचा दाखला, वडील, आई, बालक यापैकी कोणालाही गंभीर आजार असल्यास त्याबाबतचे वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, पालक विभक्तीकरणापुरत्तीकरण असल्याचा पुरावा, दिव्यांग प्रमाणपत्र तसेच पात्रतेनुसार आवश्यक कागदपत्रे, उत्पन्नाचे चालू वर्षाचे प्रमाणपत्र, बालकांचे किंवा पालकांचे आधार संलग्न असलेल्या बँक पासबुकची फोटो असलेली दोन प्रतित छायांकीत प्रत आवश्यक आहे.

## सालफळ घाटात रेती माफियांचा उच्छाद

**वर्धा जनमाध्यम :** पुलगाव पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील वर्धा नदीच्या सालफळ घाटावर सध्या रेती माफियांचा उच्छाद सुरू असून त्यांनी घाटावर आपला डेरा टाकला आहे. मनमानी पद्धतीने चालणाऱ्या रेतीच्या अवैध उत्खननामुळे शासनाचा मोठा महसूल बुडत आहे.दरम्यान, पुलगाव पोलिसांनी वायफड परिसरात नाकेबंदी करून रेती भरलेला ट्रॅक्टर पकडण्यात यश मिळविले. वाहनातील व्यक्तीकडून चौकशी करण्यात आली असता ही रेती सालफळ घाटावरून आणल्याचे उघड झाले. चोरीच्या रेतीची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्याने पोलिसांनी ट्रॅक्टर जप्त केला आहे. या प्रकरणी दिनेश पुरुषोत्तम देहारे (रा. महाकाळ) व सचिन वनकर (रा. नागठाणा रोड, वर्धा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सरन्यायाधीश भुषण गवई यांच्यावर हल्ल्याचा तीव्र निषेध

### भारतीय कम्युनिस्ट पक्षासह सामाजिक संघटनांचे राष्ट्रपतींना निवेदन

**वर्धा जनमाध्यम :** सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य सरन्यायाधीश मा. भूषण गवई यांच्यावर सुनावणीदरम्यान झालेल्या हल्ल्याच्या प्रयत्नाचा निषेध करत भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, संयुक्त कामगार आघाडी, आयटक, महिला फेडरेशन, शालेय पोषण आहार संघटना आदी सामाजिक संघटनांकडून गुरुवारी राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले.



दिल्लीतील सर्वोच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान राकेश किशोर नावाच्या वकिलाने 'सनातन धर्म की जय म्हणत आपल्या पायातील जोडा काढून मा. सरन्यायाधीशांवर फेकण्याचा प्रयत्न केला. सुरक्षा रक्षकांच्या तत्परतेमुळे अपमानास्पद प्रसंग टळला. मात्र, हा प्रकार न्यायव्यवस्था आणि संविधानावर थेट हल्ला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. त्या वकिलावर देशद्रोह, अट्रिसिटी तसेच अन्य गुन्हे दाखल करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.सदर निवेदन मा. जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले. या वेळी द्वारका इमडवार (एड्डु सचिव), गजेंद्र सुरकार (महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव), अनुराधा उटाणे (महिला फेडरेशन), गुणवंत डकरे (संयुक्त कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष), विनायक ननोरे (शालेय पोषण आहार संघटना), मारोतराव इमडवार (किसान सभा), मनोहर पचारे (आयटक अध्यक्ष), शाहिर धम्मा खडसे, रामभाऊ दाभेकर, राजु तेलतुमडे, निखिल जवादे तसेच इतर सदस्य उपस्थित होते.

## आजनसरात रा. स्व. संघाचा विजयादशमी उत्सव

**आजनसरा जनमाध्यम :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आजनसरा शाखेचा विजयादशमी उत्सव स्थानिक भोजाजी महाराज देवस्थान येथे साजरा झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आजनसरा येथील प्रसिद्ध उद्योजक रामाजी आष्टनकर यांची उपस्थिती होती.



यावेळी दंड, नियुद्ध, सांघिक गीत व रोमहर्षक प्रात्यक्षिक सादर केली. कार्यक्रमापुर्वी शहरातून निघालेल्या पथसंचलनाचे भोजाजी महाराज देवस्थानचे अध्यक्ष डॉ. विजय पर्बत, माजी सरपंच श्रावण काचोळे, विहिंप वडनेर प्रखंड अध्यक्ष डॉ. संदीप लोंढे, निलेश कोसूरकर, संदीप तिजारे, मोहन चौधरी, जयश कुंभलकर, अविनाश जौजाळ आदींनी गुलाब पुष्प उधळून स्वागत केले. कार्यक्रमाला येथील प्रतिष्ठित नागरिक मनोहर चांभारे, रामाजी कोपरकर, रामकृष्णा कोपरकर, राजेश्वर कोपरकर, निलेश कोसूरकर, जयश कुंभलकर, संदीप तिजारे, मोहन चौधरी, युवकांसह महिला व पुरुषांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.


## जाहीर सूचना

माझे पक्षकार उषा श्रीकांत मेश्राम हे मौझा अलोडी मौज क्रमांक ७ ता.- आणि जिल्हा-वर्धाचे सर्वे क्र. ३५/२ मधील उत्तरेकडे पार्ट प्लॉट क्रमांक ३६ क्षेत्रफळ ९१.८७ चौरस मीटर मालमत्ते चे मालक आहेत सादर प्लॉटची

चतुरसीम -

पूर्वेस- प्लॉट क्रमांक ३१

पश्चिमेस - Layout Road

उत्तरेस - प्लॉट क्रमांक ३५

दक्षिणेस - ह्याच प्लॉट चा उर्वरित भाग श्री. धनराजजी दंडुजी बदनाक यांनी सादर प्लॉट माझ्या पक्षकाराला दिनांक ३०/०८/२०१२ दस्त क्रमांक अन्वय ७०६५/२०१२ विक्री पत्रा द्वारे विकत दिलेले आहे . माझ्या पक्षकाराकडून मूळ लिंक विक्री पत्र दिनांक १९/०१/२००७ दस्त क्रमांक अन्वय ४७६/२००७ हरविलेले आहे . आणि पोलिस स्टेशनमध्ये एफआयआर देखील दाखल केला. माझ्या पक्षकाराने The Tata Capital Housing Finance Ltd. येथे कर्जासाठी अर्ज केला आहे. सर्व जनतेला सादर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल आणि जर कोणाला मूळ लिंक विक्री दस्तऐवज आढळला तर कृपया ही सूचना प्रकाशित केल्याच्या ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.त्यानंतर कोणताही आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**ॲड.आर.आर.तिवारी**
**रामनगर,वर्धा.**
**मो. ९८२२४२६१६८**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# इलेक्ट्रिक ट्रक निर्मितीसाठी राज्य शासन सर्व सहकार्य करेल-मुख्यमंत्री







## ■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ब्ल्यू एनर्जी मोटर्स ईव्ही ट्रकचा शुभारंभ ■ स्वॅपेबल बॅटरी असलेला इलेक्ट्रिक ट्रक म्हणजे रिव्होल्यूशन ऑन व्हील ■ दावोस येथे झालेल्या सामंजस्य कराराचे फलित

**पुणे/प्रतिनिधी :** ब्ल्यू एनर्जी मोटर्स निर्मित स्वॅपेबल बॅटरी असलेला इलेक्ट्रिक ट्रक म्हणजे रिव्होल्यूशन ऑन व्हील असून त्यातील तंत्रज्ञान आणि कार्यक्षमता लक्षात घेता येत्या काळात या क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विस्तार होईल. राज्य शासन मुंबई- पुणे इलेक्ट्रीक कारिडारसारखे अन्य कारिडोर करण्यासाठी सर्व सहकार्य करेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. निघोजे येथील ब्ल्यू एनर्जी मोटर्स ईव्ही ट्रकच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार अमित गोरखे, महेश लांडगे, बाबाजी काळे, पोलीस आयुक्तविनय कुमार चौबे, ब्ल्यू एनर्जी मोटर्सचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक अनिरुद्ध भुवलकर, धीरेंद्र शास्त्री बागेश्वरबाबा, प्रशांत रुईया, अंशुमन रुईया, अमित बाजाज, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे आदी उपस्थित होते.ब्ल्यू एनर्जी मोटर्सने इलेक्ट्रीक वाहन क्षेत्रात नवी क्रांती केली असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, माल वाहतूक करणा-या ट्रकद्वारे मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन होत असल्याने सार्वजनिक वाहतुकीच्या क्षेत्रात इलेक्ट्रिक ट्रकची आवश्यता होती. कार्गो वाहतूक करणा-या क्षेत्रात ब्ल्यू एनर्जीने अत्यंत उत्तम आणि 'मेड इन इंडिया' ट्रकची निर्मिती केली आहे. ही बाब देशाचे 'मेक इन इंडिया'चे स्वप्न साकार करण्यासारखी आहे. इलेक्ट्रिक ट्रकसाठी संपूर्ण क्लिष्ट अभियांत्रिकी तंत्रज्ञानाची संकल्पना आणि निर्मिती, तंत्रज्ञान देशातच त्यातही महाराष्ट्र आणि पुण्यात निर्माण होणे ही अभिमानाची बाब आहे. दावोस येथे याबाबतचा सामंजस्य करार करण्यात आला होता. त्यानंतर कंपनीने अत्यंत वेगाने प्रकल्प उभारणीचे काम केले आहे. महाराष्ट्र शासनाने ईव्ही क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे धोरण तसेच पर्यायी इंधन धोरण अशी शाश्वत धोरणे स्वीकारली असून या क्षेत्रातील उद्योगाला त्याचा फायदा व्हावा आणि पर्यावरणाचे या माध्यमातून रक्षण व्हावे हे आहे. महाराष्ट्र शासन मुंबई-पुणे इलेक्ट्रीक कारिडारसाठी तसेच अन्यत्रही बॅटरी स्वॅपिंग आणि चार्जिंगच्या कारिडारसाठी ब्ल्यू एनर्जीसोबत काम करेल. या ट्रकच्या किंमती डिझेल वाहनांशी स्पर्धा करणा-या असल्याने या वाहनांना चांगला प्रतिसाद मिळेल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, या इलेक्ट्रिक ट्रकसाठी तयार करण्यात आलेले तंत्रज्ञान भारतीय वातावरणाला अनुरूप आहे आणि बॅटरी स्वॅपिंग तंत्रज्ञान ईव्ही क्षेत्रातील मोठी क्रांती ठरणार आहे. बॅटरीच्या किंमती कमी होत असून बॅटरीच्या कार्यक्षमतेत, आयुर्मानात वाढ होत आहे. त्यामुळे येत्या काळात बॅटरीच्या साह्याने ट्रक २०० ऐवजी ४०० किलोमीटरपर्यंतचा प्रवास करू शकेल. हा केवळ ट्रक किंवा इलेक्ट्रीक वाहन नसून साफ्टवेअर ऑन व्हील्स आहे, जे तंत्रज्ञानाला स्मार्ट बनवण्याचे उद्धाहरण आहे. कार्गो वाहतुकीत ही टेस्ला चळवळीची सुरूवात आहे असे म्हणता येईल.हे तंत्रज्ञान किफायतशीर असण्यासोबत त्याची कार्यक्षमताही उत्तम आहे. ट्रकमध्ये बसवलेले सेन्सर आणि स्मार्ट तंत्रज्ञानामुळे अधिक भाराचे निदान होईल, ज्यामुळे वाहतूक नियमांचे पालन आणि अपघात नियंत्रण साधले जाईल. राज्यात सौर उर्जा निर्मितीला गती देण्यात येत असून २०३५ पर्यंत ७० टक्के उर्जेचा वापर सौर स्रोताद्वारे करण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

दावोस येथील सामंजस्य कराराचे फलित दावोस येथे जानेवारीत झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत ब्ल्यू एनर्जी कंपनीबरोबर सामंजस्य करार झाला होता. त्या करारानुसार ब्लू एनर्जी कंपनीचा आज प्रकल्प सुरू होत आहे. दावोस येथे झालेले करार प्रत्यक्षात येत आहेत. दहा हजार ट्रक पहिल्या टप्प्यात तयार होत आहेत.थोड्याच दिवसात ही संख्या वाढत जाणार आहे. महाराष्ट्र गुंतवणूकदरांचे पहिल्या पसंतीचे राज्य आहे. ब्ल्यू एनर्जी कंपनीचा प्रकल्प सुरू होउन उत्पादन सुरु झाले आहे आणि रोजगार निर्मिती झाली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधोरेखित केले.प्रास्ताविकात ब्ल्यू एनर्जीचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक अनिरु द्ध भुवलकर यांनी कंपनीविषयी माहिती दिली.

---

## संक्षिप्त

### 'गर्भवती असाल तर सुट्टी घ्या, पैसे कमावण्यासाठी येता व बैठकीला अनुपस्थित राहता'

### महिला अधिका-यावर काँग्रेसचे आमदार भडकले

**बंगळुरु/वृत्तसंस्था :** काँग्रेसचे कर्नाटकमधील आमदार शिवगंगा बसवराज यांनी एका महिला अधिका-याबाबत केलेल्या टिप्पणीमुळे मोठा वाद उफाळला आहे. शिवगंगा बसवराज यांनी एका गर्भवती वनअधिका-याबाबत केलेल्या आक्षेपार्ह टिप्पणीचा व्हिडीओ व्हायरल होत असून, त्यावरून महिला अधिकार संघटनांसह विरोधी पक्षातील भाजपाने आक्रमक भूमिका घेतली आहे.



काँग्रेसचेकर्नाटकमधीलआमदार शिवगंगा बसवराज यांनी एका महिला अधिका-याबाबत केलेल्या टिप्पणीमुळे मोठा वाद उफाळला आहे. शिवगंगा बसवराज यांनी एका गर्भवती वनअधिका-याबाबत केलेल्या आक्षेपार्ह टिप्पणीचा व्हिडीओ व्हायरल होत असून, त्यावरून महिला अधिकार संघटनांसह विरोधी पक्षातील भाजपाने आक्रमक भूमिका घेतली आहे. तर काँग्रेसने या प्रकाराबाबत मौन बाळगले आहे. कर्नाटक विकास कार्यक्रमाच्या तिमाही समीक्षा बैठकीमध्ये हा प्रकार घडला. या बैठकीला फारेस्ट रेंजर्स अधिकारी असलेल्या श्वेता ह्या अनुपस्थित राहिल्याने आमदार बसवराज संतापले. नंतर बैठकीला उपस्थित अधिका-यांना संबोधित करताना ते म्हणाले की, जर त्या गर्भवती असतील तर त्यांनी सुट्टी घेतली पाहिजे. काम करण्याची काय गरज? त्या केवळ पगार घेण्यासाठी येतात. मात्र बैठक असली की गर्भवती असल्याचा बहाणा करतात. त्यांना लाज वाटत नाही का, असा संताप त्यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, मातृत्व रजा आहे ना, शेवटच्या तारखेपर्यंत पगार आणि एक्स्ट्रा घ्यायचा आहे, मात्र कामासाठी बोलावलं तर बैठकीला येउ शकत नाही. गर्भवती असण हा केवळ बहाणा आहे. दरवेळी हाच बहाणा बनवतात. त्यांना लाज वाटत नाही का? दरम्यान, मी गर्भवती आहे, डॉक्टरकडे जात आहे, असे या महिला अधिका-याने बैठकीपूर्वी सांगितले होते. एवढंच नाही तर सदर महिला अधिकारी लाच घेण्यासाठी ऑफिसमध्ये येते, तिच्यावर तातडीने कारवाई झाली पाहिजे असा आरोपही बसवराज यांनी केला. दरम्यान, बसवराज यांनी आरोपांची फेर झाडण्यास सुरु वात केल्यावर बैठकीला उपस्थित असलेले अन्य अधिकारी अस्वस्थ झालेले दिसले, मात्र त्यांच्यापैकी कुणी विरोध केला नाही. दरम्यान हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून, महिला अधिकार कार्यकर्त्यांनी या व्हिडीओवरून काँग्रेसच्या महिला धोरणावर टीका केली आहे.

### एकाच वेळी 22 तृतीयपंथीयांचा आत्महत्येचा प्रयत्न

**इंदूर :** मध्य प्रदेशातील इंदूरमधून एक हादरवणारी घटना समोर आली आहे. इंदूर शहरातील नंदलालपुरा भागात बुधवारी संध्याकाळी २२ तृतीयपंथीयांनी एकाच वेळी फिनाईल पिउन सामूहिक आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.



तर चार जणांनी एमवाय हॉस्पिटलबाहेर स्वतःवर पेट्रोल ओतून जाळण्याचा प्रयत्न केला.घटनास्थळी असलेल्या पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आणि बाटल्या जप्त केल्या. सध्या, फिनाईल प्यायलेल्या सर्व तृतीयपंथीयांना एमवाय हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. सर्वांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात आले. मात्र सामूहिक आत्महत्येचा प्रयत्न करण्याचे कारण समोर आलेले नाही. इंदूरच्या नंदलालपुरा परिसरातील एका घरात सुमारे २२ तृतीयपंथीयांनी बंद खोलीत फिनाईल पिउन आत्महत्येचा प्रयत्न केल्याने खळबळ उडाली. त्यांनी घटनेचा व्हीडीओ रेकॉर्ड करून तो व्हायरल देखील केला. घटनेची माहिती मिळताच, पोलिस अधिकारी घटनास्थळी पोहोचले, त्यांनी दरवाजा उघडला आणि सर्वांना तात्काळ उपचारासाठी एमवाय हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तृतीयपंथीयांमध्ये झालेल्या वादानंतर एका गटाने सामूहिक आत्महत्येचे पाउल उचलले आहे. नंदलालपुरा येथे दोन तृतीयपंथी गटांमध्ये ब-याच काळापासून भांडण सुरू आहे. एका गटाचे नेतृत्व सपना गुरु आणि दुस-या सीमा आणि पायल गुरु करत आहेत. दोन्ही गटांमध्ये अनेकदा वाद होतात. मंगळवारी किन्नर आखाड्याचे महामंडलेश्वर लक्ष्मी त्रिपाठी इंदूरला येथे आल्या होत्या आणि त्यांनी या वादाबाबत अधिका-यांची भेट घेतली. या वादाची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक आधीच स्थापन करण्यात आली, पण तीन महिने उलटूनही टीम कोणताही निष्कर्षापर्यंत पोहोचू शकली नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याआधी एका तृतीयपंथीने दोन पत्रकारविरोधात गुन्हा दाखल केला होता. तक्रारदार तृतीयपंथीयाने सांगितले की, तिच्या आश्रमातील गुरूविरुद्ध २४ मे रोजी एफआयआर दाखल करण्यात आला होता. त्यानंतर, १२ जून रोजी, आरोपी पंकज जैन हा त्याचा साथीदार अक्षयसह तिच्या आश्रमात आला. त्या दोघांनी तिला धमकावले आणि नंतर पंकजने तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. तिने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिला बदनामीची धमकी देण्यात आली. या घटनेनंतर तिने तिच्या गुरु ला घडलेला प्रकार सांगितला आणि मंगळवारी पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध बलात्कार, हल्ला आणि धमकी देण्याच्या कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे आणि तपास सुरू केला आहे.

### सडन गेमर डेथ : मोबाईलवर गेम खेळतानाच मुलाचा मृत्यू

**लखनौ/ वृत्तसंस्था-**लखनौमध्ये १३ वर्षांचा एक मुलगा घरी मोबाईलवर फ्री फायर गेम खेळत होता आणि अचानक बेडवर झोपला. बहिणीला वाटलं की, तिचा भाउ झोपला आहे, पण तो बराच वेळ उठला नाही.



हालचालही केली नाही, वैद्यकिय तपासणीत त्याचा मृत्यू झाल्याचं समोर आलं. सडन गेमर डेथची ही घटना आहे. ज्यामध्ये मोबाईल किंवा संगणकावर गेम खेळताना गेमरचा मृत्यू होतो. यूएस नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थच्या नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनवर एक रिसर्च अपलोड करण्यात आला आहे. पेटेंमध्ये असं म्हटलं आहे की, जगभरात अनेक लोक मोबाईलवर गेम खेळताना मृत्युमुखी पडले आहेत. या घटनांमध्ये कोणताही हिंसाचार झालेला नाही आणि मृत्यू मोबाईल गेमशी संबंधित आहेत. त्याचा संबंध इंटरनेट गेमिंग डिसऑर्डरशी देखील जोडण्यात आला आहे. त्यास फ्री फायर गेम खेळण्याचे जणू व्यसन होते, असे त्याच्या बहिणीने सांगितले. सध्या पोलीस त्याच्या मोबाईल हिस्ट्रीचा तपास घेत आहेत. रिसर्चमध्ये असं दिसून आलं आहे की, मोबाईलवर गेम खेळताना अनेक लोकांचा मृत्यू झाला आहे. आतापर्यंत ही संख्या सुमारे २४ आहे. १९८२ मध्ये एकाचा मृत्यू झाला होता, त्यानंतर २००२ ते २०२१ पर्यंत २३ मृत्यू झाले होते, त्यापैकी बहुतेक पुरु ष होते. या व्यक्तींचे वय ११ ते ४० वयोगटातील होते. अर्ध्याहून अधिक रु ग्ण आग्नेय आशियातील होते, ज्यामध्ये सिंगापूर, मलेशिया आणि इंडोनेशिया सारख्या देशांचा समावेश होता.

### 110 वर्षातील तिसरी कडाक्याची यंदा थंडी;हिमालय बर्फाने आच्छादले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**देशभरात मुसळधार पावसाने कहर मांडलेला असतानाच ८६ टक्के हिमालयास बर्फाने आच्छादले आहे; परिणामी आता कडाक्याची थंडी ही देखील गेल्या १०० वर्षातील तिसरी सर्वात जास्त थंडीची लाट पसरणार आहे. स्वेटर, कानटोपी,



हातमोजे आणि ब्लँकेट आदी देखील कमी पडतील एवढा गारवा पडणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. यावर्षीचा हिवाळा हा मागील ११० वर्षातील तिसरा सर्वात थंड हिवाळा असण्याची दाट शक्यता हवामानतज्ञांनी दिला आहे.प्रशांत महासागरातील ला-निना या नैसर्गिक हवामान बदलाच्या पॅटर्नमुळे यंदा भारतात थंडीची लाट अधिक तीव्र आणि दीर्घकाळ टिकणारी असेल, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. ला-निना ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये प्रशांत महासागरातील पृष्ठभागाचे तापमान सामान्यपेक्षा थंड होते. याचा परिणाम जागतिक हवामान प्रणालीवर होतो आणि भारतात अनेकदा यामुळे कडाक्याची थंडी पडते. दिल्ली, पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या राज्यांसह उत्तर भारताच्या अनेक भागांत तसेच उत्तर आणि मध्य भारताच्या मैदानी प्रदेशातील तापमानात मोठी घट दिसून येईल. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, जर ला-निना पूर्णपणे विकसित झाला, तर तो हवामान बदलामुळे होणारा तापमानाचा वाढता परिणाम काही प्रमाणात संतुलित करेल आणि भारतात अनेक दशकांतील सर्वात तीव्र थंडी अनुभवायला मिळू शकतो. यामुळे शेती आणि जनजीवनावर याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता असल्याने, नागरिकांनी आणि प्रशासनाला या बदलांसाठी आतापासूनच तयारी करण्याचे आवाहन तज्ज्ञांकडून केले जात आहे.

---

## पायाभूत साक्षरता विकसित करण्यासाठी सर्वसमावेशक प्रयत्नांची गरज-मंत्री भुसे

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन, लेखन) व संख्याज्ञान विकसित करण्याच्या उद्देशाने नव भारत साक्षरता कार्यक्रम राबविण्यात येत आहे. केंद्र शासन पुरस्कृत या योजनेची राज्यात २०२२ ते २०२७ या कालावधीत अंमलबजावणी करण्यात येत असून पायाभूत साक्षरता विकसित करण्यासाठी शालेय शिक्षण विभागासह सर्व विभागांच्या सर्वसमावेशक प्रयत्नांची गरज असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले. नव भारत साक्षरता कार्यक्रमाच्या राज्यातील अंमलबजावणीचा मंत्री दादाजी भुसे यांनी आढावा घेतला. प्रधान सचिव रणजितसिंह देओल, उपसचिव तुषार महाजन, संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.भुसे म्हणाले, विविध कारणांमुळे काही व्यक्ती शिक्षणापासून दूर राहिले असू शकतात. समाजातील या घटकांना किमान लिहिता वाचता यावे यासाठी शासन प्रयत्नशील आहे. प्रौढ शिक्षणावरील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या शिफारशींसह संयुक्तराष्ट्रांच्या शाश्वत



विकास ध्येयांनुसार सुद्धा २०३० पर्यंत सर्वांनी साक्षरता आणि संख्याज्ञान संपादन करणे अपेक्षित आहे. याच उद्देशाने राज्यात केंद्र पुरस्कृत नव भारत साक्षरता कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करण्यास मोठा वाव असल्याचे सांगून शिक्षक, विद्यार्थी यांच्यासह आपण समाजाचे देणे लागतो असे मानणा-या प्रत्येकाने यासाठी योगदान देण्याची गरज आहे, असे आवाहन मंत्री भुसे यांनी केले.

## कौशल्य विकासाच्या माध्यमातून समर्थ भारताची उभारणी होणार- संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

**पुणे/प्रतिनिधी :** आज जग वेगाने बदलत असून प्रत्येक क्षणाला नवा विचार, नवी व्यवस्था, नवे तंत्रज्ञान समोर येत असताना अशा अनिश्चित जगात आपले कौशल्य आपल्या मदतीला येउ शकते. त्यामुळे सर्वांनी मिळून कौशल्याच्या माध्यमातून देशाला पुढे नेण्याची गरज आहे. कौशल्य विकासाच्या माध्यमातून समर्थ आणि स्वावलंबी भारताच्या उभारणीसाठी केंद्र सरकारसोबत महाराष्ट्र राज्य शासन देखील कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या सुविधा उभ्या करीत आहे आणि त्यांना प्रोत्साहनही देण्यात येत आहे. सिम्बायोसिस विद्यापीठदेखील या दिशेने काम करत असून नोकरी मिळविण्यासाठी नाही तर नोकरी देण्याची क्षमता निर्माण करणारे शिक्षण येथे देण्यात येत आहे, असे गौरवोद्गार संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काढले.सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या सहाव्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकातदादा पाटील, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले.जनरल धीरज सेठ, विद्यापीठाचे कुलपती डॉ.शां.ब. मुजुमदार, प्र-कुलगुरु डॉ. स्वाती मुजुमदार, श्रीमती संजीवनी



मुजुमदार, सिंम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या प्र-कुलगुरू डॉ.विद्या येरवडेकर आदी उपस्थित होते.कौशल्य शिक्षण देशाच्या उभारणीसाठी महत्त्वाचे असून कौशल्यप्राप्त व्यक्ती निर्मितीसाठी योगदान देतो. निर्मितीच माणसाचे महत्त्वाचे लक्षण असून निर्मितीत व्यग्र व्यक्तीच समाजाला दिशा देउ शकते, असे नमूद करून संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले, आजच्या युगात केवळ ज्ञान उपयुक्त नसून त्याचे उपयोजन करण्याची कला अवगत असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे शिकलेल्या बाबींना जीवनात कसे आणावे हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविणे हेच आजच्या शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे.नवभारताकडे देश जात असताना स्किल इंडीया, स्टार्ट अप इंडिया आणि मेक इन इंडियावर भर देण्यात येत आहे. केंद्र सरकारने कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन केले आहे. या मंत्रालयाने या क्षेत्रातील आव्हानांना संधीत रुपांतरित करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत १ कोटी ६३ लाख उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले आहे. जनशिक्षा संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण, आदिवासी आणि दुर्लक्षित घटकातील ३० लाखापेक्षा अधिक उमेदवारांना शिलाई, भरतकाम, हस्तकला, फळ प्रक्रिया आणि आरोग्य सेवा सहायकाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

## कुंभमेळा आयोजनाची कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत-मुख्य सचिव राजेश कुमार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७-२८ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित करण्यात येत आहे. मोठ्या संख्येने भाविक पर्यटक येणे अपेक्षित असून त्यादृष्टीने कुंभमेळा प्राधिकरणासह संबंधित विभागांनी आयोजनाची सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्य सचिव राजेश कुमार यांनी दिले.मुख्य सचिव राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत कुंभमेळा पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. यावेळी कुंभमेळ्याशी संबंधित सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.मुख्य सचिव राजेश कुमार म्हणाले, कुंभमेळा आयोजनासाठी प्राधिकरणास सक्षम प्राधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. यामुळे प्राधिकरणाने प्राधान्याची कामे आणि ती पूर्ण होण्यासाठी लागणारा कालावधी निश्चित करावा. त्यानुसार कामांची प्रशासकीय मान्यता, निविदा आणि कार्यादेश प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. कुंभमेळा यशस्वीरित्या पार पडण्याच्या दृष्टीने दळणवळण, परिवहन, पाणी पुरवठा, मलनिःसारण, घनकचरा व्यवस्थापन, राहण्याची



सोय, आरोग्य व्यवस्था, विद्युत व्यवस्था आदी महत्त्वाची कामे सर्व संबंधित विभागांनी वेळेत पूर्ण करावीत. यासाठी विभागांनी आणि प्राधिकरणाने विहित मार्गाने निधीची तरतूद होण्यासाठीची प्रक्रिया तात्काळ करावी.नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियमानुसार प्राधिकरणाने आवश्यकतेनुसार शिखर समिती आणि मंत्रिमंडळाची मान्यता घेउन कुंभमेळा नियोजनाचा आराखडा प्रसिद्ध करावा. त्यानुसार प्रत्येक विभागाने आपल्या अखत्यारितील कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत. केंद्र सरकारच्या यंत्रणांमार्फत जी कामे सुरू आहेत त्यासाठी प्राधिकरणाने केंद्रीय यंत्रणांसमवेत समन्वय ठेवावा. कुंभमेळा परिसर मोठा असल्याने आणि नाशिकबाहेरील अनेक कर्मचारी कामासाठी येणार असल्याने सर्व यंत्रणांच्या सोयीसाठी लहान लहान झोन तयार करु न त्यास नावे अथवा क्रमांक द्यावेत. कुंभमेळ्याच्या पूर्वतयारीचा नियमित आढावा आणि देखरेखीसाठी स्वतंत्र संकेतस्थळ तयार करण्यात यावे, असे निर्देशही मुख्य सचिव राजेश कुमार यांनी यावेळी दिले.

## राज्यातील 500 मंदिरे, संरक्षित 60 किल्ले आणि 1800 बारवा यांच्या संवर्धनासाठी बृहत आराखडा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील समृद्ध सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी राज्य शासनाकडून मोठा उपक्रम राबविण्यात येत आहे. राज्यातील ५०० मंदिरे, ६० राज्य संरक्षित किल्ले आणि १८०० बारवा (जलस्रोत) यांच्या संवर्धनासाठी बृहत आराखडा तयार करण्याच्या सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी दिल्या आहेत. या बृहत आराखड्यामध्ये त्यांच जतन, संवर्धन आणि यापुढे पर्यटक, फुटफ ?ल वाढवणे याचा समावेश असेल मैत्रीच्या सोबतीने पुरातत्व विभाग यांमध्ये नोडल एजन्सी म्हणून काम करेल, अशा पद्धतीचा निर्णय आज घेण्यात आला. शिवाय पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांतील ऐतहासिक स्थळे, मंदिरे, गडकिल्ले यांचा स्वतंत्र एकात्मिक बृहत् आराखडा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यातील मंदिरे, किल्ले आणि ऐतिहासिक वस्तू संवर्धनाविषयी मंत्रालयात मंत्री आशिष शेलार यांनी बैठक घेतली. बैठकीला मैत्रीचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, सांस्कृतिक विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, सांस्कृतिक कला संचालनालयाचे संचालक विभिषण चवरे, पु. ल. देशपांडे कला अकदामीच्या संचालिका मीनल जोगळेकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आपला महाराष्ट्राला समृद्ध वारसा लाभला आहे. महाराष्ट्राचा इतिहास, ऐतिहासिक मूल्य असलेल्या वास्तू, मंदिरे, गड-किल्ले, बारव हा आपला अभिमान आहे. त्यामुळे जतन संवर्धनाबाबत योग्य नियोजनासाठी बृहत् आराखड्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने ही बैठक घेण्यात आली. त्यामुळे या आराखड्यात राज्य संरक्षित वारसा स्थळांबरोबरच राज्य संरक्षित नसलेल्या ३५० किल्ल्यांचा देखील समावेश करण्यात यावा. आराखड्यानंतर प्रत्यक्ष संवर्धनाच्या कामांसाठी आवश्यक निधीची तरतूद करावी, तसेच खासगी भागीदारी विचारात घ्यावी. गरज असल्यास खासगी भागीदारीसाठी स्वतंत्र धोरणही तयार करण्यात यावे, अशा सूचना मंत्री शेलार यांनी यावेळी केल्या.

## आरोग्य सेवेत काम करणा-या कंत्राटी अधिकारी-कर्मचा-यांचे वेतन वेळेत देण्याचे निर्देश

### ■ दर्जेदार आरोग्यसेवेसाठी युद्ध पातळीवर काम करा

### ● सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर

**मुंबई/प्रतिनिधी :** आरोग्य सेवा हा लोकांच्या आरोग्याशी संबंधित संवेदनशील विषय आहे. ही सेवा तत्पर ठेवण्याची जबाबदारी आरोग्य यंत्रणेत काम करणा-या सर्वांचीच आहे. आरोग्य सेवा अधिक दर्जेदार देण्यासाठी या यंत्रणेत अधिकारी व कर्मचारी यांनी युद्ध पातळीवर काम करावे, अशा स्पष्ट सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज दिल्या.

सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी नियमित, कंत्राटी सेवेतील अधिकारी कर्मचारी यांच्या नियमित वेतनाचा आढावा घेतला. बैठकीस आरोग्य सेवा आयुक्त कादंबरी बलकवडे, संचालक (लेखा) अभिजीत पाटील यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तर राज्यातील आरोग्य उपसंचालक, जिल्हा शल्य चिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासन विविध योजना व उपक्रम राबवित आहे. या सेवा देण्यासाठी शासकीय रु ग्णालयात आरोग्य सेवा बजावणा-या कंत्राटी डॉक्टर्स, कर्मचारी यांचे वेतन विहित वेळेत झाले पाहिजे. या ड?क्टर्स- कर्मचा-यांचे वेतन देण्यात जे अधिकारी दिरंगाई, कुचराई करतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असा इशारा सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिला.मंत्री आबिटकर म्हणाले, आरोग्य सेवेत काम करणा-या सर्व ड?क्टर्स, अधिकारी- कर्मचा-यांना विहित वेळेत वेतन दिले दिले पाहिजे. वेतन वेळेत न देणे ही गंभीर बाब असल्याचे सांगत मंत्री आबिटकर म्हणले, किमान महिन्याच्या सात तारखेपर्यंत कंत्राटी सेवेतील ड?क्टर्स, अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन झाले पाहिजे. यासाठी आवश्यक अनुदानाची मागणी संबंधित आरोग्य उपसंचालक यांनी १५ तारखेपर्यंत शासनास सादर करावी. मंत्री श्री. आबिटकर म्हणाले, प्रत्येक अधिका-यांनी कंत्राटी ड?क्टर्स, कर्मचा-यांचा वेतनाचा विषय प्राधान्याने घ्यावा. शासनाकडून वेतनासाठी देण्यात आलेल्या अनुदानाचा नियमित आढावा घ्यावा. वेतन नियमित देण्यासाठी ७ ऑक्टोबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही झाली पाहिजे. जिल्ह्यात ड?क्टर्स, कंत्राटी सेवावरील अधिकारी-कर्मचारी यांच्या वेतनासाठी प्राप्त झालेले अनुदान, झालेला खर्च याचा नियमित आढावा संबंधित आरोग्य उपसंचालकांनी नियमितपणे घ्यावा. वेतनासाठी देण्यात आलेले अनुदान खर्ची न झाल्यास त्याची जबाबदारी निश्चित केली जाईल. वेतनासाठी शिल्लक अनुदान पुढील आठ दिवसात खर्च झाले पाहिजे. भविष्यात या विषयी कोणत्याही प्रकारची तक्रार आल्यास संबंधित अधिका-यांवर कडक कारवाई केली जाईल, असेही आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सांगितले.

बैठकीत आशा स्वयंसेविकांच्या मानधनासंदर्भातही आढावा घेण्यात आला. आशा स्वयंसेविकांसाठी ऑक्टोबर महिन्याचे ८४ कोटी रु पयांचा मानधनासाठीचा निधी शासन स्तरावरून वितरित केला जाणार आहे. दीपावली सणानिमित्त असल्याने हे मानधन संबंधित आशा स्वयंसेविकांच्या खात्यावर त्वरित जमा करण्याचे निर्देश आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिले. तसेच एनएचएम कर्मचा-यांचे पैसे तत्काळ त्यांच्या खात्यावर जमा करावेत. या कामी कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## बदललेली विचारधारा

पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये निवडणुका होणार आहे. त्यामुळे या राज्यात पुन्हा एकदा तापले आहे.येणाऱ्या विधानसभा निवडणुकांमुळे ते होणारच होते; मात्र यावेळी मुद्दा विचारसरणीचा नाही, तर विश्वासाचा आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या सरकारवरील भ्रष्टाचार, हिंसाचार आणि प्रशासकीय अपयशाच्या आरोपांमुळे राज्यातील जनतेचा विश्वास डळमळीत झाला आहे. २०१६ मधील शालेय सेवा आयोग घोटाळ्यानेही ममता सरकारवरील विश्वासाला तडा गेला होता. सर्वोच्च न्यायालयाने २६,००० शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द केल्या.हा निर्णय तृणमूल सरकारच्या विश्वासार्हतेवरील नैतिक डागही होता. आता ममता बॅनर्जी तो डाग पुसून टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. नवीन रिक्त पदांची घोषणा करून परीक्षा घेण्यात आल्या; परंतु जुने डाग कायम आहेत. नवीन निवडीमध्येही कलंकित व्यक्तींना संधी दिल्याचे आरोप होत आहेत. पश्चिम बंगालच्या राजकारणात भ्रष्टाचारासोबत हिंसाचार ही एक कायमची परंपरा बनली आहे. निवडणुकीवेळी बूथ ताब्यात घेणे, कार्यकर्त्यांवर हल्ले, मतदारांना धमकावणे आणि निकाल जाहीर झाल्यानंतर सुडाचे राजकारण हे बंगालच्या निवडणूक परिदृश्याचा अविभाज्य भाग बनले आहेत. डाव्या राजवटीच्या हिंसक राजकारणावर एकेकाळी टीका करणाऱ्या ममता बॅनर्जी आता त्याच पद्धतीने जाताना दिसतात. राज्यपाल सी. व्ही. आनंद बोस यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रपतींना पाठवलेल्या अहवालात राज्य प्रशासकीयदृष्ट्या लकवाग्रस्त झाल्याचे म्हटले आहे. पश्चिम बंगालमध्ये मतदार यादीची विशेष सखोल पडताळणी (एसआयआर) सुरू होणार असल्याने पुन्हा हिंसाचार उफाळण्याची भीती आहे. बंगालमध्ये निवडणूक आयोगाची प्रत्येक कृती राजकीय संघर्षाचे कारण ठरते. एसआयआरदरम्यान हिंसाचार झाला, तर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यासाठी केंद्र सरकारवर दबाव वाढेल; परंतु हे पाऊल राजकीयदृष्ट्या धोकादायक ठरेल. कारण, ममता बॅनर्जी ते 'केंद्र विरुद्ध बंगाल' या मुद्द्यात बदलू शकतात. यामुळे त्यांना सहानुभूती मिळेल. दरम्यान, राज्याला हादरवून टाकणाऱ्या दुर्गापूर वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थिनीवर बलात्कार आणि हत्येच्या घटनेने पुन्हा ममता सरकारला अडचणीत आणले आहे. देशभर या क्रूर अत्याचाराची चर्चा झाली असली, तरी सरकारची प्रतिक्रिया सौम्य आहे. हे प्रकरण केवळ गुन्हा नाही, तर राज्याच्या वाढत्या असंवेदनशील राजकारणाचे प्रतीक बनले आहे. महिलांच्या मतपेढीला इतके प्रिय असलेले सरकार महिला सुरक्षेबाबत इतके गप्प का आहे, असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला आहे.'माँ-माटी-माणूष' या घोषणेवर बांधली गेलेली ममता बॅनर्जी यांची प्रतिमा आता त्या शब्दांइतकीच आकर्षक आहे; पण तितकीच कठीण बनली आहे.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात पक्षाला ऐतिहासिक विजय मिळवून देणारे भूपेंद्र यादव यांना भाजपने बंगालचे निवडणूक प्रभारी नेमून रणनीती स्पष्ट केली आहे. यादव 'बूथ निवडणुका' या रणनीतीवर काम करत आहेत. भाजपने सातत्याने पराभव पत्करलेले बूथ मजबूत करण्यासाठी तळागाळापर्यंत काम सुरू झाले आहे. महाराष्ट्रात विजयासाठी हे तंत्र महत्त्वाचे ठरले. भाजप बंगालमध्येही हाच प्रयोग करू इच्छित आहे. तथापि, तेथे संघटनात्मक समस्या आहे. राज्यातील ३० टक्के बूथवर भाजपकडे अजिबातच संघटन नसल्याचे लोकसभा निवडणुकीनंतर पक्षाच्या अंतर्गत अहवालात स्पष्टपणे दिसून आले आहे. भाजपचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या उत्तर बंगालमध्येही पक्षाची पकड कमकुवत होत चालली आहे. जलपाईगुडीतील नागरा कोटा येथे भाजप खासदार खगेन मुर्मू आणि आमदार शंकर घोष यांच्यावरील हल्ला हे वास्तव अधोरेखित करतो. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी रुग्णालयात त्यांची वैयक्तिक भेट घेतली. 'तो परिसर भाजपचा आहे, मग हल्ला का', असे त्यांनी केलेले वक्तव्य भाजपच्या घटत्या संघटन क्षमतेवर थेट हल्ला होता. भाजपमध्येही एक अदृश्य फूट आहे. पक्ष तीन गटांमध्ये विभागलेला दिसतो. जुना भाजप, नवीन भाजप आणि सध्याचा भाजप. जुना भाजप म्हणजे अगोदरपासून संघटनेसोबत असलेले लोक. या तिन्ही प्रवाहांमधील समन्वयाअभावी पक्षाची मुळे कमकुवत झाली आहेत. काँग्रेस आणि डाव्यांची परिस्थिती आणखी भयानक आहे. दोघेही एकत्र आहेत; परंतु त्यांचा प्रभाव कमी आहे. डाव्यांचे कार्यकर्ते कमी झाले आहेत. ते तृणमूल काँग्रेसकडे गेले आहेत. काँग्रेसची पकड काही जागांपर्यंत मर्यादित आहे. विशेष म्हणजे, एकेकाळी लाल झेंडे घेऊन रस्त्यावर उतरलेले जुने डावे कार्यकर्ते आता भाजपच्या रॅलींत दिसतात.म्हणूनच बंगालच्या रस्त्यांवर 'वाम फेंके राम' असा नारा दिला जात आहे. याचा अर्थ असा की, डावे विचारधारा सोडून रामाकडे वळले आहेत. ममता बॅनर्जींना सत्तेवरून हटवण्यास फक्त भाजपच सक्षम आहे, असा त्यांचा विश्वास आहे. ममता बॅनर्जींना हे बदलते वातावरण जाणवले आहे. म्हणूनच त्या प्रत्येक हल्ला बाह्य कटाचा भाग असल्याचे सांगतात. त्यांचे राजकारण बंगाल विरुद्ध केंद्र, धर्मनिरपेक्षता विरुद्ध सांप्रदायिकता आणि महिला नेतृत्व विरुद्ध पुरुषी वर्चस्व असे आहे. त्यातून त्या स्वतःला नेतृत्वस्थानी ठळकपणे सादर करतात. त्यांना अजूनही मजबूत पाठिंबा आहे. भावनिक राजकारणात त्या पारंगत आहेत, तरीही बंगालचे राजकारण आता विचारसरणीची लढाई राहिलेली नाही, तर अस्तित्वाची लढाई झाली आहे.एका बाजूला भ्रष्टाचार आणि हिंसाचार आणि दुसरीकडे सत्तेच्या हव्यासात अडकलेले पक्ष आहेत. बंगालचा मतदार या दोघांमध्ये विभागलेला आहे. कोणाची निवड करावी आणि कोणाला टाळावे, या गोंधळात मतदार आहेत; पण जेव्हा येथील लोक सत्ता परिवर्तनाचा निर्णय घेतात तेव्हा त्यांना वेळ लागतो; पण सत्तापरिवर्तन होते हा बंगालचा इतिहास आहे. 'वाम फेंके राम' हे आता फक्त एक वाक्य राहिलेले नाही, तर बंगालच्या हृदयात वाढत असलेल्या वृत्तीचे लक्षण बनले आहे. डाव्यांचा जुना केडर, ममतांवर निराश झालेली जनता आणि अस्थिर भाजप संघटन हे सर्वजण एका नव्या समीकरणाच्या शोधात आहेत, अशी ही वेळ आहे. आता काय करायचे ते मतदार ठरवतील.

# भारतानेही 'राष्ट्रीय हित'च जपायला हवे

**ज्याप्रमाणे रशिया आपल्या युद्धखर्चाची पूर्तता करण्यासाठी केवळ आपल्या राष्ट्रीय आणि आर्थिक हिताला प्राधान्य देत आहे, त्याचप्रमाणे भारतानेदेखील 'प्रथम राष्ट्रहित' (घ्र्ंर्ी ईंर्ू) हे धोरण ठेवावे. व्यावसायिक व्यवहारांमध्ये भावनिक संबंधांपेक्षा किंमत (झ्rम) आणि सुरक्षितता (एार्ल्ीूब र्द एल्ज्जत्ब) याला महत्त्व द्यावे. आंतरराष्ट्रीय संबंधात 'राष्ट्रीय हित' हेच सर्वोच्च असते. रशियाप्रमाणेच भारतानेही आपले आर्थिक हित जपण्यासाठी उपलब्ध असलेल्या स्वस्त पर्यायांचा वापर करण्यास कचरू नये.**

रशियाकडून आलेल्या दोन अत्यंत महत्त्वाच्या बातम्या खरोखरच परस्परविरोधी (Contradictory) वाटतात आणि त्या रशियाच्या गुंतागुंतीच्या परराष्ट्र धोरणाकडे निर्देश करतात. पहिल्या बातमीचा अर्थ : रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी पंतप्रधान मोदींचे कौतुक केले. कारण भारताने अमेरिकेच्या दबावाला न जुमानता रशियाकडून स्वस्त दरात तेल खरेदी करणे सुरू ठेवले. यातून रशियाला दोन गोष्टी साध्य करायच्या आहेत. भारताचे समर्थन : जागतिक स्तरावर भारतासारख्या मोठ्या अर्थव्यवस्थेकडून मिळालेले आर्थिक आणि धोरणात्मक समर्थन जाहीर करणे. त्यामुळे पाश्चात्त्य देशांनी रशियावर लादलेले निर्बंध कमी प्रभावी ठरतात हे दाखवणे.

आर्थिक हित : तेलाच्या विक्रीतून मोठा महसूल (Revenue) मिळवणे, जो युक्रेन युद्धामुळे आलेल्या आर्थिक दबावाला तोंड देण्यासाठी आवश्यक आहे. दुसऱ्या बातमीचा अर्थ : भारताने विनंती करूनही रशिया पाकिस्तानच्या 'व्ह्-१७ थंडर ब्लॉक III' लढाऊ विमानांसाठी RD-९३MA इंजिनचा पुरवठा सुरू ठेवणार आहे. यामागे रशियाचे व्यावसायिक आणि भू-राजकीय हित आहे.

आर्थिक लाभ : हा इंजिन पुरवठा एक मोठा आणि महत्त्वाचा व्यावसायिक करार आहे. युक्रेन युद्धामुळे आलेल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी रशियाला शस्त्रास्त्रे विक्रीच्या कोणत्याही संधीकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. चीनसोबतचे संबंध : 'व्ह्-१७' हे विमान चीन आणि पाकिस्तानने संयुक्तपणे विकसित केले आहे. पाकिस्तानला इंजिन पुरवठा करणे म्हणजे रशिया आपल्या जवळचा मित्र असलेल्या चीनच्या संरक्षण उद्योगाला आणि त्यांच्या धोरणात्मक हिताला मदत करत आहे. पाश्चात्त्य देशांपासून दूर गेल्यानंतर चीन हा रशियासाठी सर्वात महत्त्वाचा भागीदार ठरला आहे. या दोन्ही कृतींमध्ये रशिया आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये केवळ स्वतःचे राष्ट्रीय हित (National Intereू) जपत आहे. रशियासाठी भारत अजूनही सर्वात मोठा आणि विश्वसनीय संरक्षण ग्राहक आहे. पुतीन भारताचे कौतुक करतात. कारण त्यांना भारताकडून तेल खरेदीचा आर्थिक फायदा (Oil Revenue) आणि भविष्यात शस्त्रास्त्रे विक्रीचा मोठा बाजार गमवायचा नाही. भारताचे कौतुक करून रशिया जुने संबंध जपण्याचा प्रयत्न करत आहे. त्याच वेळी अमेरिका आणि युरोपकडून वाढलेल्या तणावामुळे, रशिया चीनच्या जवळ जात आहे. पाकिस्तानला इंजिन पुरवठा करणे हे चीनसोबतचे आपले धोरणात्मक सहकार्य वाढविण्याचे लक्षण आहे. या व्यवहारात भारताच्या संवेदनशीलतेपेक्षा चीनला खूश करणे आणि लगेच मिळणारा आर्थिक फायदा रशियाला अधिक महत्त्वाचा वाटत आहे.



आंतरराष्ट्रीय राजकारणात ही 'राष्ट्रीय हिताची दुहेरी चाल' (Double Game of National Interest) म्हणून पाहिली जाते.रशियाने पाकिस्तानच्या 'व्ह्-१७ थंडर ब्लॉक III' लढाऊ विमानांसाठी 'D-९३MA' इंजिन पुरवठा करण्याची भारताची विनंती फेटाळण्यामागे अनेक आर्थिक आणि धोरणात्मक (Geopolitical) कारणे आहेत. रशिया एक जागतिक शक्ती म्हणून आता केवळ एका जुन्या मित्रावर (भारतावर) अवलंबून न राहता आपल्या राष्ट्रीय हितांना आणि बदलत्या जागतिक समीकरणांना अधिक महत्त्व देत आहे. गेल्या काही वर्षांत भारताने अमेरिका, फ्रान्स आणि इस्रायल यांसारख्या पाश्चात्त्य आणि गैररशियन स्रोतांकडून संरक्षण उपकरणे खरेदी वाढवली आहे. फ्रान्सकडून ३६ राफेल लढाऊ विमाने खरेदी केली आहेत आणि अमेरिकेसोबत जवळचे संरक्षण सहकार्य करण्याचा प्रयत्न केला आहे, ज्यामध्ये GE-HAL भागीदारीअंतर्गत जेट इंजिनांच्या सहविकासावर चर्चा समाविष्ट आहे. ज्यामुळे भारताला AMCA स्टेल्थ फायटर आणि तेजस Mk-II सारख्या स्वदेशी कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करताना प्रवृत्त करेल. त्यामुळे रशियाला आपल्या सर्वात मोठ्या आणि ऐतिहासिक संरक्षण ग्राहकावरील अवलंबित्व कमी करण्याची गरज वाटत आहे. पाकिस्तानला पुरवठा करून रशिया भारताला एक संदेश देत आहे की, त्यांच्याकडे पर्यायी बाजारपेठा आहेत.

जर रशियाने RD-९३MA चा पुरवठा थांबवला तर चीन व्ह्-१७ मध्ये आपले स्वदेशी बनावटीचे 'ए-१३' इंजिन बसवेल, ज्यामुळे रशियाला हे बाजार कायमचे गमवावे लागेल. त्याऐवजी, रशिया पुरवठा सुरू ठेवून बाजारातील आपले अस्तित्व टिकवून ठेवत आहे आणि आर्थिक लाभ मिळवत आहे. क्षमतेत वाढ : RD-93MA हे इंजिन जुन्या आवृत्तीपेक्षा जास्त जोर (Thrust) आणि उत्कृष्ट कार्यक्षमता देते. या इंजिनामुळे व्ह्-१७ ब्लॉक III ची लढाऊ क्षमता (Combat Capability), विशेषतः उंचीवरील (Hot-and-High Altitude) उड्डाणांमध्ये, लक्षणीयरीत्या वाढेल. त्यामुळे पाकिस्तानला भारतीय हवाई दलाच्या विरोधात आपली हवाई क्षमता वाढवता येईल. भारत सध्या रशियाकडून सवलतीच्या दरात (Discounted Price) स्वस्त तेल विकत घेत आहे. अमेरिका आणि युरोपीय महासंघाने यावर विरोध दर्शविला असला तरी भारताने आपल्या राष्ट्रीय आर्थिक हिताचे रक्षण केले आहे. जर अमेरिका किंवा इराण, आखाती देश (Gulf Nation) यांसारखे अन्य देश रशियापेक्षा कमी किमतीत तेल पुरवठा करण्यास तयार असतील तर भारताने नक्कीच त्यांच्याकडून तेल खरेदी करून आपले आर्थिक हित जपले पाहिजे.

**ब्रिगेडियर हेमंत महाजन**

# शिक्षकांवर टांगती तलवार का?

**देशात पहिली ते आठवीपर्यंतच्या वर्गाचे शिक्षक सध्या मानसिक तणावाचा सामना करत आहेत. कारण, सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच 'टीईटी' उत्तीर्ण करण्याचा दिलेला आदेश.**

गेल्या काही काळापासून केंद्र आणि राज्य सरकारे ज्ञानदान करण्याव्यतिरिक्त शिक्षकांकडून असंख्य कामे करून घेत आहेत. हे करत असतानाच अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात म्हटल्यानुसार पहिली ते आठवीपर्यंत अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण करणे गरजेचे आहे. ज्या शिक्षकांची सेवा पाच वर्षांपेक्षा अधिक राहिलेली आहे, त्यांना दोन वर्षांच्या आत टीईटी उत्तीर्ण व्हावे लागेल. या काळात टीईटी परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना नोकरीवर पाणी सोडावे लागणार किंवा त्यांना सक्तीची निवृत्ती घ्यावी लागेल. अर्थात, ज्यांची सेवा पाच वर्षांपेक्षा कमी राहिली आहे, त्यांना टीईटीचे बंधन घातलेले नाही; मात्र बढतीसाठी ते अपात्र राहतील. हा नियम सरकारी आणि खासगी या दोन्ही प्रकारच्या शिक्षकांवर लागू राहील. तूर्त अल्पसंख्याक विद्यालयांना यातून वगळले आहे. अल्पसंख्यांक प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या मोठ्या पीठाकडे सोपविले आहे; पण एकुणातच या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी केली जाणार असल्याचे म्हटले आहे.

शिक्षकांच्या मते, भरतीच्या वेळी संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करूनच सेवेत दाखल झालो. नियुक्ती होताना सर्व नियम आणि अटींचे पालन झाले. त्यामुळे आता सेवेच्या शेवटच्या टप्प्यात टीईटी उत्तीर्ण करण्याबाबतचा आदेश न्यायसंगत राहू शकतो का? प्रत्यक्षात ५० ते ५५ वर्षांपेक्षा अधिक वयोगटातील शिक्षकांना तुम्ही उत्तीर्ण झाला नाहीत, तर नोकरी गमवावी लागेल, असे सांगितले, तर त्यांच्या मानसिक ताणात आणखी भर पडेल. या कारणामुळे शिक्षक हैराण झाले आहेत.

शिक्षकांसाठी वेळोवेळी रिफ्रेशर अभ्यासक्रम सुरू असतात. त्यापेक्षा सरकारने शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण दिले असते, तर आणखी बरे झाले असते. याप्रकारचा अतार्किक निर्णय शिक्षकांवर थोपविणे अन्यायकारक आहे. टीईटीसंबंधी हा निर्णय तार्किक नाही. शाळेत मोठ्या संख्येने एमपीएड, बीपीएड, एमएड, बीएड, डीएड, बीटीसी (बेसिक ट्रेनिंग सर्टिफिकेट) अभ्यासक्रम पूर्ण केलेले शिक्षक आहेत. अनेक शिक्षक अनुकंपा तत्त्वावर रुजू झालेले असतात आणि तेही नियमांच्या चौकटीतच. शिवाय भरतीचे निकष वेगवेगळ्या काळात वेगळे आहेत. उत्तर प्रदेशात १९९८ च्या अगोदर बारावी उत्तीर्ण आणि बीटीसीच्या आधारावर शिक्षकांची भरती केली जात असे. १९९९ पासून ही पात्रता पदवीवर आणली आणि यात काही बीएड आणि बीपीएड मंडळीदेखील दाखल झाली. म्हणजे तत्कालीन काळातील निकषांचे पालन करत उमेदवार शिक्षक क्षेत्रात दाखल झाला आहे. यातील एक व्यावहारिक अडचण म्हणजे, एखाद्या बारावी उत्तीर्ण शिक्षकाला टीईटी उत्तीर्ण व्हायचे असेल, तर त्याला अगोदर पदवी परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल आणि नंतर बीटीसीचे प्रशिक्षण घ्यावे लागेल. म्हणजेच यात बराच काळ जाऊ शकतो. दुसरीकडे टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी केवळ दोनच वर्षांची मुदत दिली आहे.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांच्या निर्देशानुसार उत्तर प्रदेशात टीईटीच्या बंधनाबाबत पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यांनी म्हटल्यानुसार, राज्यातील शिक्षक अनुभवी असून त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण दिले जात आहे. अशावेळी त्यांची पात्रता आणि सेवेकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही. हिमाचल प्रदेश हे राज्यही याच मुद्द्यावर पुनर्विचार याचिका दाखल करण्याचा विचार करत आहे. एकंदरीत, नियम आणि कायद्याच्या चौकटीतच भरती झालेली असताना टीईटीसारखा निर्णय लादणे अन्याय करण्यासारखे आहे. त्यामुळे याबाबत पुनर्विचार व्हायलाच हवा.

**विधिषा देशपांडे**

## हवेच्या प्रदुषणावर नियंत्रण केव्हा?

देशात काही उत्सवांच्या निमित्ताने जे प्रदूषण होत. त्याबाबत नेहमीच चर्चा सुरु असते.अलीकडेच अमेरिकेतील शिकागो विद्यापीठातील एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूटने तयार केलेल्या अहवालावर नजर टाकली तर भारतातील प्रदूषणाची पातळी एवढी वाढली आहे.यावर्षी त्यांनी जो अहवाल सादर केला आहे त्यामध्ये हवेच्या प्रदूषणाला अधिक महत्व देण्यात आले असून भारतात प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात असूनही या प्रयत्नांना अपेक्षित असे यश अजूनही मिळत नाही असेच दिसते.गेल्या काही वर्षांमध्ये भारतात हवेच्या प्रदूषणाच्या माध्यमातून घातक धूलिकांचे प्रमाण वाढल्याने त्याचा थेट परिणाम मानवी आरोग्यावर होत आहे. जवळपास १४५ कोटी लोकसंख्या असलेल्या भारतामध्ये जवळजवळ तेवढीच वाहने रस्त्यावरून धावत असतात. या वाहनातून निघणारा धूर नेहमीच हवेची गुणवत्ता खराब करत असतो.गेल्या काही वर्षांपासून भारत सरकारने जाणीवपूर्वक पेट्रोल, डिझेलवरील वाहनांना पर्याय म्हणून इलेक्ट्रिक वाहने समोर आणली असली तरी जेवढा प्रतिसाद इलेक्ट्रीक वाहनांना मिळायला पाहिजे तेवढा मिळत नाही हेसुद्धा खरे वास्तव आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

## भटक्या कुत्र्यांची दहशत

गेल्या काही दिवसांपासून देशात तसेच राज्यात धार्मिक परंपराणी भूतदयेच्या नावाखाली भटक्या प्राणिमात्रांना खाऊ-पिऊ घालण्याचा भावनिक मुद्दा चर्चेत आहे. एकीकडे मुंबईतील जैन धर्मीय कबुतरांना दाणापाणी घालण्यासाठी टोकाला पेटलेले असताना तिकडे राजधानी दिल्लीत भटक्या कुत्र्यांनी अक्षरशः थैमान घातले. या सर्व गल्लीबोळातील भटक्या कुत्र्यांना पकडून जेरबंद करण्याचा अत्यंत महत्वाचा निकाल अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. या निकालामुळे कुत्र्यांच्या दहशतीने त्रस्त सर्वसामान्य दिल्लीकरांना मोठा दिलासा मिळाला होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल दिवसरात्र आपल्या मांडीवर कुत्री खेळणाऱ्या उच्चभ्रू श्वानप्रेमींना मान्य नव्हता. भटक्या कुत्र्याचा कळवळा येणाऱ्यांच्या आर्जवाची दखल खुद्द सरन्यायाधीशांना घ्[illegible] लागली. अखेर भटक्या कुत्र्यांच[illegible] ज्वलंत विषयावर नव्याने विशे[illegible] खंडपीठ स्थापन करण्यात आले. या खंडपीठाने नुकत[illegible] आपला निकाल दिला. भट[illegible] कुत्र्यांची नसबंदी करून त्यांना [illegible] त्याच जागी सोडण्याचा खंडपीठाने दिलेला निकाल श्वानप्रेमींना आनंदात भर टाकणारा असला तरी, सर्वसामान्यांची पूर्ती निराशा करणाराच आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आपलाच निकाल फिरवला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापुढे आता कुणीही जाऊ शकणार नाही, हेदेखील वास्तव आहे. विशेष म्हणजे हा निकाल सर्वच राज्यांना लागू होणार आहे. हे प्रकरण भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात असले तरी त्याची व्याप्ती मोठी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आता राज्य सरकारांनी व स्थानिक प्राधिकरणांनी कुत्रे पकडून त्यांचे निर्बिजीकरण करण्याची मोहीम गांभीर्याने हाती घेण्याची अत्यंत गरज आहे. निर्बिजीकरण मोहीम सुरु होऊन कुत्र्यांची संख्या नियंत्रणात येण्यासाठी काही वर्षांचा कालावधी लागू शकतो. तोपर्यंत रस्त्यावरून रात्री पायी घरी चालत जाणाऱ्या सर्वसामान्यांना कुत्र्यांच्या दहशतीमुळे जीव मुठीत घेऊन घरी जावे लागणार आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

## प्रदूषण विरहित दिवाळी साजरी करा

दिपावली म्हणजे दिप आवली अर्थातच दिव्यांची ओळ किंवा दिव्यांची रांग अंधारावर प्रकाशाने मात करण्याचा दिवस हा सण संपूर्ण देशाच्या विविध भागात विशेषतः महाराष्ट्रात मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा केला जातो दिवाळी हा सण म्हणजे एक औचित्य [illegible]धणारा सण आहे या सणाला मोठमोठ्या आवाजाचे महागडे, रोषणाई करणारे फटाके फोडले जातात त्यामुळे ध्वनीप्रदूषण, वायुप्रदूषण होते माप फटाके फोडल्यामुळे विविध महानगरांच्या हवेचा स्तर प्रचंड खालावते.त्यामुळे श्वासोच्छवास, डोळ्यांना गंभीर इजा होणे किंवा फटाक्यांनी भाजणे यासारखे प्रकार घडतात असले प्रकार घडू नयेत म्हणून विविध संस्था, पर्यावरणवादी, मंडळे, शासन हे दर वर्षी आवाहन करतात मात्र त्याला हरताळ फासल्याचे दिसून येते सरकारच्या नियमांकडे कान्हाडोळा करुन अनेक व्यापारी काळाबाजारांने फटाके विक्री करतात यावर कोणाचाच अंकुश नाही त्यामुळे फटाके मोठ्या प्रमाणात वाजवले जात असल्याचे दिसून येते वाढदिवस, थर्टी फर्स्ट, राजकारण्यांच्या विजयी मिरवणुका साजऱ्या करतांना मोठ्या प्रमाणात मोठ्या आवाजाचे फटाके फोडून मोठा उन्माद दाखवतात हे थांबले पाहिजे सद्या ध्वनीप्रदूषण, वायुप्रदूषणचे प्रमाण वाढत असल्याने विविध आजारांनी जनतेला ग्रासल्याचे वास्तव आहे तरीपण अनेकजण फटाके फोडण्यात धन्यता मानतात त्यासाठी सरकारने अशा कार्यक्रमावेळी फटाके फोडण्यावर निर्बंध घालून कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे फटाके ऐवजी पर्यावरण समतोल राखण्याचे व सामाजिक स्वास्थ जपण्याचे कार्य करणे महत्वाचे ठरेल

**राजू जाधव**

## हेन्ली पासपोर्ट इंडेक्सच्या क्रमवारीत भारताची स्थिती

लंडनस्थित इन्व्हेस्टमेंट मायग्रेशन कन्सल्टन्सी असलेल्या हेन्ली अँड पार्टनर्स या कंपनीने प्रकाशित केलेल्या 'हेन्ली पासपोर्ट इंडेक्स'च्या ताज्या क्रमवारीनुसार सिंगापूरचा पासपोर्ट हा जगातील सर्व देशांत शक्तिशाली पासपोर्ट ठरला असून सिंगापूरच्या पासपोर्ट धारकांना जगभरातल्या १९३ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवेश करता येणार आहे. या यादीत जगातील २२७ देश आणि १९९ पासपोर्टचा समावेश करण्यात आला आहे. तर जपान दक्षिण कोरिया या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहेत. भारताचा पासपोर्ट हा २०२५ मध्ये ८० व्या क्रमांकावरून ८५ व्या क्रमांकावर घसरला आहे. भारतीय पासपोर्टधारक आता ५७ देशांमध्ये व्हिसा-फ्री प्रवास करू शकतील. गेल्या वर्षी ही संख्या ५९ देश इतकी होती. या क्रमवारीत तळाशी असलेला अफगाणिस्तानचा पासपोर्ट हा जगातील सर्वात कमकुवत पासपोर्ट ठरला आहे.

**प्रदीप मोरे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# “ऑपरेशन प्रस्थान” अंतर्गत ‘आदर्श नवदुर्गा उत्सव मंडळ स्पर्धा-२०२५’ सन्मान सोहळा पार पडला

जनमाध्यम प्रतिनिधी



जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या संकल्पनेतून जनजागृतीसाठी उपक्रम यशस्वी; जिल्ह्यातील ३८१७ मंडळांचा उत्स्फूर्त सहभाग

यवतमाळ - “सांस्कृतिक उत्सवात शिस्त, स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारी” या संकल्पनेला मूर्त स्वरूप देत यवतमाळ जिल्हा पोलिस दलाने यंदा दुर्गोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राबवलेले “ऑपरेशन प्रस्थान” हे उपक्रमात्मक अभियान मोठ्या उत्साहात पार पडले. या मोहिमेअंतर्गत “आदर्श नवदुर्गा उत्सव मंडळ स्पर्धा 2025” आयोजित करण्यात आली होती.

२२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत यवतमाळ जिल्ह्यात साजरा झालेल्या दुर्गोत्सवात एकूण ३८१७ मंडळांनी सहभाग नोंदविला, त्यापैकी ३२०३ दुर्गा मंडळे आणि ६१४ शारदा मंडळे होती. जिल्हा पोलिस अधीक्षक मा. कुमार चिंता यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश दुर्गा उत्सव जनताभिमुख आणि संस्कारप्रधान बनविणे हा होता. स्पर्धेच्या पारदर्शक मूल्यांकनाकरिता मंडळांच्या विविध निकषांवर तपासणी करण्यात आली. यात डीजे-मुक्त मिरवणुका, पारंपरिक वाद्यांचा वापर, स्वच्छता, वाहतूक व्यवस्थापन, व्यसनमुक्ती, रक्तदान, आरोग्य शिबिरे, पर्यावरणपूरक सजावट, महिला व ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग, शासकीय योजनांचा प्रचार आणि सामाजिक संदेश अशा दहा महत्त्वाच्या बाबींना प्राधान्य देण्यात आले. या निकषांनुसार जिल्हा पातळीवर सर्वोत्तम ठरलेल्या मंडळांचा गौरव सन्मान सोहळा जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन, यवतमाळ येथे पार पडला. पारितोषिक विजेते मंडळे: प्रथम पारितोषिक कंवर नगर दुर्गादेवी उत्सव मंडळ, सिंधी कॅम्प, यवतमाळ – २५,००० रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र.,द्वितीय पारितोषिक: सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळ, उमरखेड – २१,००० रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र., तृतीय पारितोषिक: शिवशक्ती दुर्गा उत्सव मंडळ, विठ्ठलवाडी – १५,००० रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र. तसेच, हरिविष्णु दुर्गा उत्सव मंडळ, पांढरकवडा आणि शिवराय दुर्गा उत्सव मंडळ, यवतमाळ या दोन मंडळांना प्रत्येकी ११,००० चे प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात आले. याशिवाय १६ नवदुर्गा मंडळांना प्रत्येकी २,००० देऊन गौरविण्यात आले. एकूण २१ मंडळांना प्रशस्तिपत्रक, रोख रक्कम व सन्मानचिन्ह प्रदान करून जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. निवड समितीचे मोलाचे योगदान दिले आहे. आदर्श मंडळांची निवड करताना निवड समिती सदस्य म्हणून डॉ. प्रशांत गावंडे, प्रा. घनशाम दरणे, प्रा. माणिक मेहरे, नितीन पखाले, प्रा. सुवर्णा ठाकरे, अनंत कौल्गीकर, संजय सांबजवर, अमोल ढोणे, विनोद दोन्दल, प्रा. डॉ. ताराचंद कंठाळे, रवी ठाकुर व कोशव बने यांनी कार्य केले. या समिती सदस्यांनी विविध तालुक्यातील मंडळांना भेटी देऊन गुणांकन करून आदर्श नवदुर्गा मंडळांची निवड केली. या सोहळ्यात जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, ASP पुसद बी. जे. हर्षवर्धन, ASP पांढरकवडा बन्सल सर, SDPO दारव्हा भोरे, SDPO यवतमाळ दिनेश बैसाणे, SDPO वणी दळवी, SDPO उमरखेड गायकवाड उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन यवतमाळ जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत कावरे, पोलिस निरीक्षक (कल्याण शाखा, यवतमाळ) आणि त्यांच्या टीमने केले. कार्यक्रमाचे संचालन सपोनि शुभांगी गुल्हाने यांनी केले, प्रस्तावना अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांनी सादर केली, तर आभार प्रदर्शन SDPO दिनेश बैसाणे यांनी केले. या सन्मान सोहळ्याने समाजात शिस्त, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत पोलिस प्रशासनाच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीचा आणखी एक यशस्वी नमुना सादर केला.

# पांढरकवडा येथे शहर उपजीविका केंद्राचे उद्घाटन

जनमाध्यम प्रतिनिधी



पांढरकवडा - नगर परिषद पांढरकवडा मार्फत दीनदयाळ जन आजीविका योजना (शहरी) अंतर्गत गुरुवार १६ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११.००० वाजता उपजीविका केंद्राचे उद्घाटन मंगलमय वातावरणात करण्यात आले. सदर केंद्र महिला समाज शाळेजवळ, अग्रेसन भवन रोड पांढरकवडा येथे उभारण्यात आलेले असुन या केंद्रामध्ये शहरातील विविध बचत गटांद्वारे तयार करण्यात येणाऱ्या हस्तकला वस्तू, गृहउद्योग उत्पादने, खाद्यपदार्थ, हस्तनिर्मित साहित्य, कपडे, सजावटी वस्तू, तसेच रिटेल वस्तू आदींचे प्रदर्शन व विक्री केली जाणार आहे. यामुळे स्थानिक स्तरावर शहरी गरीब महिला बचत गटामार्फत तयार होणाऱ्या उत्पादनांना ओळख मिळेल तसेच महिलांना त्यांच्या श्रमाचे योग्य आर्थिक मूल्य प्राप्त होईल.

सदर केंद्राचे उद्घाटन मा. रोहिदास दोरकुळकर, सह आयुक्त, नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मा. पंकज गावंडे, मुख्याधिकारी तथा प्रशासक, नगर परिषद पांढरकवडा हे होते, तसेच दीनदयाळ जन आजीविका योजना वणी न.प. च्या व्यवस्थापिका ॲड. पोर्णिमा शिरभाते, व्यवस्थापक उत्तम हापसे, समुदाय संघटक विनोद मनवर, अश्रफ शेख शाखा व्यवस्थापक बँक ऑफ महाराष्ट्र पांढरकवडा, सयजाद विराणी, कार्यालय अधीक्षक, कल्याणी सोळंके, पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता, दुर्गा अन्नेरवार अध्यक्षा दक्षता शहर स्तर संघ या मंचावर उपस्थित होते. वणी न.प. क्रांतीज्योती शहर स्तर संघाचे सर्व पदाधिकारी तसेच सामूह संसाधन व्यक्ती यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचप्रमाणे शहरातील स्वयंसहायता गटातील ५०० हून अधिक बचत गटातील महिला, न.प. चे सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम प्रसंगी उदघाटनीय भाषण करताना मा. रोहिदास दोराकूळकर साहेबानी शहर उपजीविका केंद्राची संपूर्ण संकल्पना सर्वांना कळेल इतक्या सहज व सोप्या भाषेत महिलांना समजावून सांगितली. बचत गटाचा कश्या प्रकारे उद्योजक गट म्हणून वाटचाल करताना गटांनी तयार होणा-या वस्तूची गुणवता व बाजारपेठेतील दर यामध्ये समन्वय ठेऊन उत्पादन करण्यावर भर दिला. शहर उपजीविका केंद्र हे शहरी गरीब महिलांचे बचत गट व त्यांनी तयार कलेल्या उत्पादन किंवा त्यांच्याकडून रिटेल करण्यात येणा-या वस्तू याकरिता एक समन्वय केंद्र म्हणून कार्य करेल असे मत मांडले. अध्यक्षीय भाषणात मा. मुख्याधिकारी तथा प्रशासक यांनी महिला बचत गटाला सर्वोतपरी मदत करण्याचे आश्वासित केले. याप्रसंगी मा. मा. रोहिदास दोराकूळकर सर व मा. गांवडे साहेबांच्या हस्ते या शहर उपजीविका केंद्र उभारण्यासाठी व महिलांना प्रेरित करून एकत्रित संगठन कार्यान्वित ठेवण्यासाठी कार्य करीत असलेले शिरीष क्षिरसागर, सहा. प्रकल्प अधिकारी व रितेश लाभसेटवार यांचे विशेष कौतुक करून सन्मानित केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. पंकज गावंडे, मुख्याधिकारी न प पांढरकवडा यांनी केले संचालन शिरीष क्षीरसागर शहर अभियान व्यवस्थापक यांनी केले. तसेच रितेश लाभसेटवार समुदाय संघटक यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता दक्षता शहर स्तर संघाच्या समूह संसाधन व्यक्ती प्रणाली झाडे, सुषमा गोलेलवार व सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतेले.

# शेतकरी अतिवृष्टी मदत कमी केल्याचा निषेध..! यवतमाळ जिल्ह्यात शेतकरी संघटनेचे आंदोलन

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - राज्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीनंतर जाहीर केलेली मदत कमी केल्याच्या निषेधार्थ आज शेतकरी संघटना, यवतमाळ जिल्हा यांच्या वतीने आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन पाठविण्यात आले असून तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र झोटींग यांनी सांगितले की “दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्य सरकारने अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांसाठी मदतीचा शासन निर्णय निर्गमित केला. मात्र त्यात कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी मदत मागील वर्षीच्या तुलनेत ५१०० रुपयांनी कमी करून ८५०० रुपये करण्यात आली आहे. बागायती शेतकऱ्यांची मदतही ३६,००० रुपयांवरून ३२,५०० रुपयांवर आणली आहे. महागाई वाढत असताना अशी कपात अन्यायकारक आहे.” झोटींग यांनी पुढे सांगितले की केंद्र सरकारच्या धोरणांमुळे आधीच शेतमालाचे दर कोसळले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे राज्य सरकारने बाधित शेतकऱ्यांना प्रति हेक्टर किमान ५०,००० रुपयांची मदत देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. सरकारच्या निर्णयाचा निषेध म्हणून आंदोलनस्थळी शासन निर्णयाची प्रतीके होळी करून निदर्शने करण्यात आली. या वेळी विजय निव्वल, मिलिंद दामले, सोनाली भरगडे, प्रज्ञाताई बापट, अक्षय महाजन, गिरीष तुरके, कुणाल देठे यांच्यासह अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उच्च न्यायालयाचा निकाल राजलक्ष्मी पतसंस्थेच्या बाजूने निर्णय

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - राजलक्ष्मी मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीला मोठा दिलासा देणारा ऐतिहासिक निकाल उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती निवेदिता पी. मेहता यांच्या खंडपीठाने जिल्हा न्यायालयाचा निकाल रद्द करत लवादनामा वैध ठरवला.

2014 मध्ये पतसंस्थेने सदस्य गजानन शिरभाते व दीपक डेहनकर यांना 5.50 लाखांचे कर्ज मंजूर केले होते. थकबाकी झाल्याने हे प्रकरण मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट 2002 च्या कलम 84 अंतर्गत लवादाकडे पाठविण्यात आले. ॲड. अरुण गुप्ता यांनी लवाद म्हणून काम करत 27 एप्रिल 2019 रोजी एकतर्फी निर्णय देत 6,32,473 रक्कम वसुलीचा आदेश दिला होता. या निर्णयाविरोधात कर्जदारांनी जिल्हा न्यायालयात दाद मागितली होती. न्यायालयाने लवादाची नियुक्ती संमतीशिवाय झाल्याचे कारण देत निकाल रद्द केला. मात्र, राजलक्ष्मी पतसंस्थेने हा निकाल उच्च न्यायालयात आव्हान दिला. ॲड. ओंकार देशपांडे यांनी संस्थेची बाजू मांडताना सांगितले की मल्टिस्टेट पतसंस्थांवरील वाद “वैधानिक लवाद” अंतर्गत येतात आणि संमतीची आवश्यकता नसते. उच्च न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य करत सांगितले की लवादाची नियुक्ती वैध असून व्याजावर व्याज आकारले गेलेले नाही. त्यामुळे ‘Public Policy’चा भंग झाला नाही. या निर्णयामुळे राजलक्ष्मी पतसंस्थेच्या कर्जवसुली प्रक्रियेला न्यायालयीन बळकटी मिळाली आहे. पतसंस्थेच्या वतीने ॲड. ओंकार देशपांडे तर कर्जदारांच्या वतीने ॲड. जितेंद्र बारडकर यांनी काम पाहिले.

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी शिवरामजी मोघे महाविद्यालयातील एनएसएस स्वयंसेवकांचा पुढाकार

जनमाध्यम प्रतिनिधी



पांढरकवडा : महाराष्ट्रातील सोलापूर आणि मराठवाडा विभागातील अनेक जिल्ह्यांमध्ये अलीकडील पुरामुळे नागरिकांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शिवरामजी मोघे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) समितीच्या स्वयंसेवकांनी पूरग्रस्तांसाठी मदत निधी संकलन मोहिमेचा उपक्रम सुरू केला आहे.

पूरग्रस्त नागरिकांना अन्न, वस्त्र, औषधे आणि जीवनावश्यक वस्तूंची कमतरता भासत असल्याचे लक्षात घेऊन स्वयंसेवकांनी जनजागृती आणि निधी संकलन मोहिमेला वेग दिला आहे. शहरातील प्रमुख चौक, व्यापारी प्रतिष्ठाने आणि गावातील परिसरात जाऊन विद्यार्थी प्रत्यक्ष जनसंपर्कातून निधी गोळा करत आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके म्हणाले, “विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची भावना निर्माण होणे, हीच शिक्षणाची खरी फलश्रुती आहे.” एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अमर वंजारी यांनी सांगितले की, “स्वयंसेवकांनी अत्यंत उत्साहाने समाजाशी संवाद साधत मदत मिळवण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. हा उपक्रम मानवी सहकार्याचे आणि एकतेचे उत्कृष्ट उदाहरण ठरेल.” पूरग्रस्तांना अधिक प्रमाणात मदत करण्यासाठी अठरा ऑक्टोंबर पर्यंत मदत द्यावी असे जाहीर आवाहन करण्यात आले आहे. स्थानिक नागरिक, व्यापारी आणि सामाजिक संस्थांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक करत या मोहिमेमुळे तरुण पिढीत समाजसेवेबाबतची जाणीव आणि जबाबदारी अधिक दृढ होत असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. हा उपक्रम यशस्वी करण्याकरिता रास येऊ कार्यक्रम अधिकारी डॉ. अमर वंजारी यांच्या मार्गदर्शनात निकिता झाडे, अनुष्का इंगोले, साक्षी भोयर श्रेयांश राठोड, अंकिता झाडे, तेजस्वीनी बनकर आणि इतर स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## वेचक

### दिर्घायु केशव राऊत यांची आंतरराष्ट्रीय नाणेनिधी वाशिंग्टन येथे सल्लागार म्हणून नियुक्ती



पुसद - तालुक्यातील मौजे इनापूर येथी[...] केशव गुणाजी राऊत यांचे ज्येष्ठ चिरंजी[...] संचालक (ग्रेड 'डी'), (आरबीआय),भ[...] येथे सध्या कार्यरत आहेत. त्यांची वॉशि[...] अमेरिका येथे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, ([...] भारताच्या कार्यकारी संचालकांचे सल्ल[...] करण्यात आली आहे. दिर्घायु केशव राऊत हे अतिशय गरीब कुटुंबातून आहेत. प्राथमिक शिक्षण आपल्या गावातील जिल्हा परिषद शाळेत गेल्यानंतर माध्यमिक शिक्षण त्यांनी पुसद येथे केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना अतिशय अथक परिश्रम करून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथून बी ए,एम,ए आणि एम.फिल ह्या पदव्या अर्थशास्त्र या विषयात मिळवल्यात. त्यानंतर पाटकर महाविद्यालय गोरेगाव मुंबई येथे त्यांनी अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून तीन वर्ष काम केले. मुंबई विद्यापीठामध्ये त्यांनी अर्थशास्त्र या विषयात पीएचडी सुद्धा प्राप्त केलेली आहे. फेब्रुवारी २००९ मध्ये भारतीय रिझर्व बँकेमध्ये संशोधन अधिकारी म्हणून त्यांचे नियुक्ती झाली. सध्या ते भारतीय रिझर्व बँक, मुंबई येथे संचालक या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी आतापर्यंत अमेरिका, इंग्लंड, स्विझर्लंड,चीन, इथोफिया, श्रीलंका, कंबोडिया अशा अनेक देशांना अभ्यास दौरे सुद्धा केलेले आहेत. केशव गुणाजी राऊत यांनी आपल्या दोन्ही मुलांना आर्थिक परिस्थिती बेताची असून सुद्धा योग्य उच्चशिक्षण देऊन एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांचे कनिष्ठ चिरंजीव जळगाव जिल्ह्यातील जामनेर येथे वाणिज्य विषयाचे प्राध्यापक आहेत. डॉ. दिर्घायु राऊत यांच्या नियुक्ती बद्दल अनेक क्षेत्रातून त्यांचे तालुक्यात सर्वत्र कौतुक होत असुन ठिक ठिकाणी त्यांचे अभिनंदन ही करण्यात येत आहे.



### पैगंबर मुहम्मद (स.अ.व.) यांच्या अवमानाविरोधात यवतमाळात निवेदन

यवतमाळ - अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली पैगंबर हजरत मुहम्मद (स.अ.व.) यांच्या अवमानाच्या घटनांविरोधात कुल जमात विफाक (सर्वदलीय महासंघ) महाराष्ट्र शाखा यवतमाळतर्फे तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. बुधवारी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले. निवासी जिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी हे निवेदन स्वीकारले. संघटनेने आपल्या निवेदनात नमूद केले की, प्रेषितांचा अपमान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तीला आळा घालावा. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा दुरुपयोग थांबवून कायद्याची समान अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी करण्यात आली. या प्रसंगी ॲड. इमरान देशमुख, डॉ. मुजीब शेख, ॲड. नासीर खिलजी, ॲड. जुनेद खान, मौलवी सैय्यद शारीक अली, मुफ़्ती एजाज़ शम्सी, हाफिज मुमताज़ यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

### भांब येथील शेकऱ्याची विष प्राशन करून आत्महत्या



महागाव : महागाव तालुक्यातील मौजे भांब येथील शेतकरी जयवंतराव रामु राठोड यांनी दि .१५/१०/२५ रोजी रात्री आर्थिक परिस्थितीला कंटाळून विष प्राशन केले. त्यामुळे त्यांना तातडीने यवतमाळ येथील रुग्णालयात दाखल करून त्यांच्यावर उपचार चालू केले परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला असून त्यांच्या पश्चात पत्नी विमलबाई मुलगा दत्ता जयवंता राठोड, राम जयवंता राठोड ,दोन मुले आहेत. मृतकाच्या नावाने १ हेक्टर ५१ आर शेती असून सेंट्रल बँकेचे पिक कर्ज आहे . अतिवृष्टीमुळे शेतातील पीकही हातचे गेल्यामुळे त्यांनी टोकाचा निर्णय घेत विष प्राशन करून आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे.

# पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर

## मोकळ्या जागेत मध्येपान करणाऱ्या व ट्रिपल सीट चालकांवर कारवाई!

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - कायदा व सुव्यवस्था बळकट करण्यासाठी तसेच जनतेच्या सुरक्षितेच्या दृष्टीने दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ चे रात्री ८ ते १२.०० वाजेपर्यंत हर्षवर्धन बी.जे. सहा.पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,उपविभाग पुसद यांचे मार्गदर्शनाखाली अधिनस्त असलेल्या आरसीपी पथकाने पुसद शहरातील सायंकाळने वेळेस जास्त वर्दळ नसलेल्या मोकळया जागेत धुम्रपान तसेच मदयपान करणा-या इसमांवर कारवाई राबविण्यात आली.

सदरची कार्यवाही करीत असतांना आरसीपी पथक यांनी पुसद शहरातील मोकळया सामसुम असणारे सार्वजनिक जागेवर बसुन धुम्रपान तसेच सदर ठिकाणी मदयपान करुन असभ्य वर्तन करणा-या व रात्रीच्या वेळी ट्रीपल सीट मोटार सायकल चालविणा-या इसमांवर मुंबई पोलीस अधिनियम तसेच मोटार व्हेईकल ॲक्ट नुसार एकुन १६ इसमांवर कार्यवाही करण्यात आली आहे. या कार्यवाहीचे वरीष्ठ अधिकारी यांनी निरीक्षक करुन वरील इसमांना धुम्रपान तसेच मदयपान न करण्याबाबत समुपदेशन करुन त्यांनी अश्या प्रकारचे परत कृत्य करु नये याबाबत त्यांनी ताकीद देण्यात आली असुन जिल्हा पोलीस दल हे नागरीकांच्या सुरक्षेसाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सदैव तत्पर असुन अश्या प्रकारचे कोणत्याही मोकळया व सार्वजनिक जागेवर कोणी वरील प्रकारचे वर्तन करीत असल्यास जवळच्या पोलीस स्टेशन अथवा डायल ११२ ला कॉल करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# पुसद येथे विविध मागण्यांसाठी जन आक्रोश रॅली

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद : पुसद येथे विविध सामाजिक संघटनांच्या वतीने आज,१५ ऑक्टोबर रोजी पुसद शहरात 'जन आक्रोश रॅली'चे आयोजन करण्यात आले होते. 'भारत मुक्ती मोर्चा', 'राष्ट्रीय पिछडावर्ग मोर्चा', 'राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा', 'बहुजन क्रांती मोर्चा' आणि 'बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क, पुसद' या संघटनांनी संयुक्तपणे ही रॅली काढली.

शहरातील 'तीन पुतळा' येथून या रॅलीला सुरुवात झाली आणि उपविभागीय अधिकारी कार्यालय पर्यंत जनसामान्यांच्या समस्यांना न्याय मिळावा,EVM ऐवजीं बॅलेट पेपर वर निवडणूका घेण्यात यावे, ओबीसी ची जाती आधारीत जनगणना करावी, शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळावा,महाबोधी महाविहार टेंपल ॲक्ट 1949 रद्द करून महाविहार ब्राम्हण मुक्त करावे, विद्यार्थ्यांच्या समस्या, बेरोजगारीची समस्या, आदिवासी विस्थापन, मुस्लिम मॉबलिंचिग अशा विविध समस्यांना न्याय मिळावा म्हणून मुलनिवासी बहुजनांचा आक्रोश सरकारच्या विरोधात या रॅलीच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आला.हि रॅली अतिशय संविधानिक पध्दतीने आणि शांततेत काढण्यात आली. या जन आक्रोश रॅलीमध्ये वरील प्रमुख संघटनांसह अनेक स्थानिक संघटनांनी सक्रिय सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे, पुसद शहर आणि परिसरातील तसेच ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने महिला व पुरुषांनी उत्स्फूर्तपणे या रॅलीत सहभाग नोंदविला यावेळी उपविभागीय कार्यालयासमोर भारत मुक्ती मोर्चाचे किशोर नगारे, दिपक कांबळे, बुध्दिस्ट इंटरनँशनल नेटवर्क चे बंडु गंगावणे,शरद कांबळे,आदिवासी एकता परिषद चे गणपत गव्हाळे, राष्ट्रीय किसान मोर्चा चे प्रमोद जाधव, ज्ञानेश्वर मस्के,पंडीतराव घुमनर,लहुजी क्रांती मोर्चाचे विनोद बनसोडे,संजय बनसोडे, आदिवासी छात्र संघाचे गजानन गंडाळे, भारतीय विद्यार्थी मोर्चा चे रोहित कांबळे, राज पडघणे भारतीय बेरोजगार मोर्चाचे विकास गडदने,शुभम खंदारे, राज वाढे,इत्यादी मान्यवरांनी उपस्थिती आंदोलनकारी महिला व पुरूष यांना शासनाचे लक्ष वेधून मागण्यांची पूर्तता करण्यासाठी विषयानुसार मार्गदर्शन केले आणि शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत महामहिम राष्ट्रपती यांना निवेदन देण्यात आले. या विविध मागण्यांना समाधानकारक न्याय न मिळाल्यास यापुढे उग्र जनआंदोलन करण्याचा इशारा सुध्दा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सरकारला दिला. शेवटी आभार व्यक्त करून आणि अल्पोपहार घेऊन या जनआक्रोश रॅली ची सांगता करण्यात आली.

# दिग्रसमध्ये आढळला अत्यंत दुर्मिळ जाड रेती साप

जनमाध्यम प्रतिनिधी



दिग्रस : आज दिनांक १३/१०/२०२५ रोजी वाइल्ड फॉर नेचर क्लब च्या सदस्यांना एक फोन आला की आमच्या घरा जवळ एक साप दिसून येत आहे अशी माहिती वाइल्ड फॉर नेचर क्लब च्यां सदस्यांना मिळाली असता ग्रुप चे प्रथमेश जाधव, राहुल रोडे, सौरभ अंबोरे , कपिल कटकोज्वर , रवी गोरे , पियूष चौधरी , जय पिठल्लवर , ऋषिकेश भलगे, शिवम ढोले, शुभम ढोले यांनी काहीही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली व तिथे जाऊन पाहणी केली असता इंग्रजी नावे (स्टाउट स्नेक) मराठी नावे (जाड रेती साप) आढळून आला व त्या सापाला योग्य रित्या पकडुन काहीही इजा न पोहचता त्या सापाला जेरबंद केले व या सापाची माहिती दिग्रस वनविभागाला देली व त्या सापाला निसर्गमुक्त करण्यात आले.

त्यावेळी सर्पमित्र योगेश जाधव , ओम राठोड , आशिष भस्मे , संकेत ढोरे,अर्जुन राठोड , जय जाधव , सागर जाधव ,चंदन जाधव नागेश शेळके , इत्यादी उपस्थित होते. स्टाउट साप म्हणजे स्टाउट सँड साप हा एक सौम्य विषारी प्रजाती आहे जो कोरड्या, मध्य-पश्चिम भारतात आढळतो आणि त्याला लाँग सँड रेसर असेही म्हणतात. इतर वाळूच्या सापांपेक्षा त्याची बांधणी जास्त घट्ट असते, त्याचा रंग राखाडी-तपकिरी असतो आणि त्याच्या खालच्या बाजूस काळ्या किनारी खवले असतात आणि खालचा भाग साधा ऑफ-व्हाइट किंवा राखाडी असतो. आणि कुठेही साप किव्हा वन्यजीव धोक्यात आढळून आल्यास 7038030312 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा . व साप दिसल्यास त्याला बिना प्रशिक्षण त्याला पकडण्याचा किंवा मारण्याचा प्रयत्न करू नका साप मारणे किंवा सापाचा छळ करणे अधिनियम 1972 अंतर्गत कायद्याने गुन्हा आहे.

# बाभूळगाव येथील किराणा व्यापाऱ्याला लुटण्याचा प्रयत्न

जनमाध्यम प्रतिनिधी

बाभूळगाव - येथील किराणा व्यापारी आसिफ हाजी अबूबकर घाची हे आपले दुकान बंद करून रात्री नऊ वाजता च्या दरम्यान पैशाची थैली घेऊन घरी जात असताना अज्ञात आरोपीने त्यांच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून लुटण्याचा असफल प्रयत्न केला.

येथील किराणा व्यापारी आसिफ हे नेहमी प्रमाणे रात्री पैशाची थैली घेऊन घरी जात असताना घराच्या जवळ तोंडाला फडके बांधून असलेल्या अज्ञात इसमाने रात्री नऊ वाजताच्या दरम्यान त्यांच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून लुटण्याचा प्रयत्न केला मात्र प्रसंगावधान राखून त्यांनी आरडा ओरड केली व घरात पळून गेले चोरट्याने जी मिरची पावडर त्यांच्या डोळ्यावर टाकली होती ती पावडर त्यांच्या डोळ्यात गेली नाही. आणि चोरटा अंधाराचा फायदा घेत पळून गेला घटनेची माहिती पोलिसांना मिळतात त्यांनी तात्काळ घटनास्थळ गाठले व शोध घेतला सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून अज्ञात चोरट्याचा शोध घेतला जात आहे. आसिफ घाची यांचे गावातील वस्ती मधील बस स्थानकावर मोठे किराणा दुकान आहे. घर मात्र गावात आहे यामुळे ते दिवसभराचा दुकानाचा गल्ला रात्री सोबत घेऊन जातात याची चोरट्याला कल्पना असावी असे दिसते रात्री 9 वाजता दरम्यान ते किराणा दुकान बंद करून घरा जवळ आले असता गल्लीतून जात असताना ही घटना घडली आसिफ घाची यांनी या घटनेची तक्रार बाभुळगाव पोलिसां कडे केली असून पोलीस अधिक तपास करीत आहे.

# उपविभागातून आदर्श दुर्गोत्सव मंडळ राळेगावची निवड

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - आज यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत जिल्ह्यातील नवदुर्गा उत्सव मंडळाची आदर्श दुर्गा उत्सव मंडळ स्पर्धा - 2025 राबविण्यात आली. यामध्ये 4 हजार मंडळानी सहभाग घेतला असून यापैकी 21 मंडळ पात्र ठरले. या पुरस्कार वितरण सोहळ्याला जिल्हाधिकारी विकास मिना व जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी मंचावर उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी यांनी सामाजिक भान ठेऊन धार्मिक उत्सव साजरा केला पाहिजे ते आपण उपस्थित मंडळानी केले ही जिल्ह्यासाठी कौतुकास्पद बाब आहे आणि विशेष म्हणजे या स्पर्धेचं ज्यांनी मुल्यांकन केलं त्या सर्व परीक्षकांनी आणि विशेषतः व्यस्त कार्यक्रम असतांनाही पोलीस विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी दुर्गा मंडळाला भेटी देण्याचं काम चोख बजावलं त्याबद्दल त्यांच कौतुक करून सर्व मंडळानी यापुढेही सामाजिक भान ठेऊन उत्सव साजरा केल्याबद्दल त्यांचेसुद्धा अभिनंदन केले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी सांगितले की, नवदुर्गा उत्सव म्हणजे नवचैतन्याचा उत्सव हा नवचैतन्य समाजातील दुःखी कष्टकरी व दिशा भटकंलेल्यांनाही अंधारातून दूर करण्यासाठी समाजभान लक्षात घेऊन आपण सण उत्सव साजरे केले पाहिजे त्याकरिता मंडळाला प्रोत्साहित करण्यासाठी ही स्पर्धा राबविली यामध्ये ज्या मंडळानी सहभाग घेतला. त्या सर्वांचे आभार जिल्हा पोलीस अधिक्षक कुमार चिंता यांनी मानले. त्यामध्ये राळेगाव शहरातील नावलौकिक असलेल्या मंडळापैकी असलेल्या आदर्श दुर्गा उत्सव मंडळ राळेगाव मंडळाला उपविभाग पांढरकवडा अंतर्गत प्रोत्साहनपर बक्षीस व प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व दोन हजार रुपये रोख प्राप्त झाले. पुरस्कार स्वीकारतांना आदर्श मंडळाचे फिरोज लाखाणी, सुरेश गहरवाल, शेख रऊप, अमोल पंडित, वैभव बोभाटे, अंकित बोटरे व राळेगाव पोलीस स्टेशन च्या पोलीस निरीक्षक शितल मालटे उपस्थित होत्या.

# शिक्षक व प्राचार्यांचे सेवानिवृत्ती वय ६५ करा

## शैक्षिक महासंघाची राज्यसरकारकडे मागणी; राज्यपाल, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**
शालेय ते महाविद्यालयीन शिक्षण क्षेत्रात काम करणारी राष्ट्रीय स्तरावरील सर्वात मोठी संघटना असलेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ (ए.बी.आर.एस.एम.)'शैक्षिक महासंघ' द्वारा राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमधील शिक्षक व प्राचार्यांचे सेवानिवृत्ती वय ६५ वर्षे करण्याची मागणी करीत महामहीम राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री (वित्त) आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांना सविस्तर निवेदन सादर केले. राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी २०२०) प्रभावी करण्यासाठी अनुभवी प्राध्यापकांचे सलग नेतृत्व, ग्रामीण-दुर्गम भागांत शिक्षक-स्थैर्य, आणि विद्यार्थीकेंद्रित गुणवत्तावृद्धी या तिन्ही कारणांनी हा निर्णय तातडीने घ्यावा, असे निवेदनात नमूद आहे.

निवेदनात केंद्र सरकारच्या सातव्या वेतन आयोगच्या चौकटीतील युजीसी आणि एआयसीटीई ची मार्गदर्शक तत्त्वे प्राध्यापक आणि प्राचार्यांना ६५ वर्षे सेवानिवृत्ती वय (आणि पात्रतेनुसार ७० पर्यंत करारनियुक्ती) देण्याची मागणी करण्यात आली आहे. पश्चिम बंगाल, बिहार, मध्य प्रदेश इत्यादी राज्यांच्या सकारात्मक निर्णयांचा देखील संदर्भ देण्यात आला आहे.

'राज्यात आज बहुतेक शिक्षक ६० वर्षी, प्राचार्य ६२ व्या वर्षी सेवानिवृत्त होतात, तर अनेक ठिकाणी प्राचार्यांना ६५ पर्यंत सेवा दिली जाते; या दुहेरी व्यवस्थेमुळे विसंगती निर्माण होते. एकसंध शासन निर्णय जाहीर करून सर्व शिक्षक संवर्गाला ६५ वर्षांचा मानदंड राज्यभर समान पद्धतीने लागू करणे ही काळाची गरज आहे,' असे महासंघाने स्पष्ट केले.

महासंघाने (१) राज्यातील सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित संस्थांतील शिक्षक व प्राचार्यासाठी ६५ वर्षे सेवानिवृत्ती वय जाहीर करणे, (२) वार्षिक कार्यप्रदर्शन-पुनरावलोकन प्रणालीमध्ये गुणवत्ता-निकष स्पष्ट करणे, (३) नियत भरती-कॅलेंडर जाहीर करणे, (४) विद्यापीठांचे नियम एकसंध करण्यासाठी युनिफॉर्म स्टॅट्युट प्रकाशित करणे आणि (५) निर्णयासोबत इम्पॅक्ट नोट प्रासिद्ध करून आर्थिक पारदर्शकता सुनिश्चित करणे, या मागण्या केल्या आहेत. महासंघाने सरकारकडे चर्चेसाठी वेळ मागितला असून 'सकारात्मक संवादातून सर्वमान्य तोडगा निघेल,' असा विश्वास व्यक्त केला आहे.

'मा. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी यापूर्वी सूचित केलेल्या दिशेला आता शासन निर्णय द्वारे मूर्त रूप मिळावे,' असे महासंघाने म्हटले आहे.

## संक्षिप्त



### सावर्डी येथे 'वाचन प्रेरणा दिन' साजरा

**अमरावती -** मुख्यमंत्री पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत सावर्डी (पंचायत समिती अमरावती) तर्फे भारताचे माजी राष्ट्रपती व सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ग्रामस्थ, विद्यार्थी व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. कलाम यांच्या प्रेरणादायी विचारांचा व जीवनातील आदर्शांचा गौरवपूर्वक उल्लेख केला. त्यांनी तरुणाईला वाचन आणि विज्ञानाच्या माध्यमातून नवे स्वप्न बघण्याची प्रेरणा दिली.' यावेळी मुख्याध्यापक मिलिंद वाहुरवाघ, तायवाडे मॅडम ,अंगणवाडी सेविका सयाबाई मेश्राम, मदतनीस कुसुम थोरात, किरण मेश्राम, विजय मेश्राम व शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.



### श्री गुरुदेव महिला सेवा मंडळातर्फे ग्राम स्वच्छता अभियान

**कुऱ्हा-**तिवसा तालुक्यातील गुरूकुंज मोझरी येथील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यतिथी निमित्त घोटा गावात ग्रामपंचायत अंतर्गत शासनाच्या नियमाने श्री गुरुदेव महिला सेवा मंडळातर्फे ग्राम स्वच्छता अभियान गावांमध्ये राबविण्यात आला. या अभियानामध्ये सर्व घोटा गावातील महिलांनी सहभाग होता तर श्री गुरुदेव सेवा मंडळ घोटा यांनी गावातून पालखी ची शोभायात्रा काढून आम्हाला सहकार्य केले.यामध्ये रंजना सुलताने,प्रमिला चौके, ज्योत्स्ना राऊत, उज्वला चौके,गडूकनी निकोते सुमनबाई कडे, शकुंतला शिरकरे, शोभा मुंडे,रेखा बिलेवार प्रभा सैरीसे,शालु शिरकरे व समस्त गावकरी महिला व श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सदस्य भजनी मंडळ उपस्थित राहुन ग्राम अभियान राबविण्यात आले.



### कस्तुराबाई जैन विद्यालयात आकाश कंदील निर्मिती कार्यशाळा

**शिराळा -** महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा व्दारा संचालित कस्तुराबाई जैन विद्यालय शिराळा येथे दिवाळी निमित्त विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार शिकवण व्हावी या दृष्टीकोनातून आकाश कंदील निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कला शिक्षक चव्हाण सर यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी घरगुती वस्तूचा वापर करून सुंदर आकाश कंदील तयार केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकाश कंदीलाचे प्रदर्शन भरविण्यात आले. काही शिक्षक व पालकांनी आकाश कंदीलाची खरेदी सुध्दा केली. सर्व विद्यार्थ्यांचे महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा अध्यक्ष मनोजभाऊ देशमुख मुख्याध्यापक डॉ सचिन देशमुख व सर्व शिक्षकांनी कौतुक केले आहे.



### वाघोली ग्रा.पं.च्यावतीने स्वच्छता

**लेहेगाव-**मोर्शी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत वाघोली येथे मुख्यमंत्री ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी वृक्षारोपण सुद्धा करण्यात आले. वाघोली ग्रामपंचायतचे सरपंच आकाश विनोद तायवाडे,ग्रामपंचायत अधिकारी व्ही.बी.बदुकले,रोजगार सेवक अमोल वानखडे ग्रामपंचायत कर्मचारी निलेश तायवाडे व सर्व गावकरी मंडळी यांचे नेतृत्वात गावात प्रभात फेरी काढून ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी मंदिराच्या परिसरात सुद्धा ग्राम वासियांनी ग्रामस्वच्छता अभियान केले. आणि संपूर्ण गाव स्वच्छ करून मुख्यमंत्री पंचायत राज ग्रामस्वच्छता अभियान राबवून कार्यक्रम साजरा केला.

## दक्षिण पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ ज्युडो स्पर्धेकरिता संघ घोषित

**अमरावती-** सागे युनिर्व्हसिटी, भोपाल येथे होणा-या दक्षिण पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ ज्युडो (पुरुष व महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे संघ घोषित करण्यात आले आहे. पुरुष संघ (ज्युडो)-चमूंमध्ये बी.बी. आर्टस्, एन.बी. कॉमर्स ॲन्ड बी.पी. सायन्स कॉलेज दिग्रसचा सागर जाधव, श्री विठ्ठल रुख्मिणी कला व वाणिज्य महाविद्यालय, सावनाचा निनाद अरसोड, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा केशव तितराम, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा राज नंदवंशी व वेध बुंदेले, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा ओमसिंह चौहान, गो.सी. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा यश पिढेकर यांचा समावेश आहे. महिला संघ (ज्युडो)-महिला चमूंमध्ये डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची सिध्दी धार्मिक, बी.बी. आर्टस्, एन.बी. कॉमर्स ॲन्ड बी.पी. सायन्स कॉलेज दिग्रसची अश्विनी जाधव व वैष्णवी मुधोळकर, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीची प्रियंका डोंगरे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीची जस्मित कौर राहल, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची श्रावणी साखरे व श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूरची आरुषी सूर्यवंशी हिचा समावेश आहे.

# डॉ.कलाम हेच खरे प्रेरणास्त्रोत-डॉ.मीनल ठाकरे

## महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

**अमरावती/का.प्र.**
आजच्या या युगात वाचनाची कमी होत असलेली रुची बघता शासनाने डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्याचे जे धोरण राबविले आहे, त्याला आता यश प्राप्त होतांना दिसून येत असल्याचे मत प्रमुख अतिथी प्रा. डॉ. पी.पी. देशमुख यांनी व्यक्त केले. वाचन, संशोधन यातून प्रेरणा घेऊन देशाचे मिसाईल मॅन ते राष्ट्रपती पदापर्यंत चा प्रवास साधणारे डॉ. कलाम हेच खरे प्रेरणास्त्रोत होऊ शकतात असा विश्वास कार्यक्रमाच्या अध्यक्ष व महाविद्यालयाच्या प्राचार्य



डॉ.मीनल ठाकरे (भोंडे) यांनी व्यक्त केला व विद्यार्थ्यांनी कलाम यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन वाचनाच्या माध्यमातून आपल्या जीवनाला योग्य दिशा द्यावी असे आवाहन त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ अमरावती द्वारा संचालित, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहाने संपन्न झाला.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल ठाकरे (भोंडे) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. पी.पी. देशमुख, ग्रंथपाल, फुलसिंग नाईक महाविद्यालय पुसद,कार्यक्रमाचे आयोजक महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. अतुल वानखडे उपस्थित होते.

प्रास्ताविकाच्या माध्यमातून ग्रंथपाल डॉ. अतुल वानखडे यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकून त्यांच्या प्रेरणादायी जीवनाचा थोडक्यात प्रवास मांडला तसेच वाचन प्रेरणा दिवसा मागील उद्देश व भूमिका विस्तृतपणे समजून सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व आभार महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. अतुल वानखडे यांनी केले. या कार्यक्रमाला विविध विषयांचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गजानन काकडे यांना ग्रामगीताचार्य पदवी



**अमरावती-**वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५७ वा पुण्यतिथी महोत्सव गुरुकुंज मोझरी येथे संपन्न झाला.माणिकग्राम धोत्रा येथील गजानन काकडे यांना ग्रामगीता पदवीदान समारंभात कार्यक्रमाच्या अध्यक्षा पुष्पाताई बोंडे उद्घाटक लक्ष्मण गमे यांचे हस्ते ग्रामगीताचार्य पदवी व सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सुरेंद्र भुयार संचालक, उपसर्वाधिकारी दामोदर पाटील, प्रचारप्रमुख प्रकाश वाघ, सरचिटणीस जनार्दनपंत बोथे, ग्रामगीता जीवन विकास परीक्षा विभागाचे अध्यक्ष गुलाब खवसे, ताराचंद कंठाळे, काशीनाथ फुटाणे, रामदास सदार, रामदास देशमुख, महादेव राघोर्ते, पौर्णिमा सवाई, विजया दहेकर, शोभा कऊटकर, डॉ. पाळेकर, डॉ.सूर्यकांत जयस्वाल, विलास महाराज साबळे, निलेश गावंडे, गोपाल कडू, विठ्ठल उमप सर्व मान्यवर उपस्थित होते.

# श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस

**अमरावती/का.प्र.**
स्थानिक श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये नुकतेच भारताचे मिसाईल मॅन, थोर वैज्ञानिक, माजी राष्ट्रपती भारतरत्न स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार भांगडिया हे होते. तर प्रमुख अतिथि ग्रंथालय सल्लागार समितीचे सदस्य तसेच नंक समन्वयक डॉ.कांतेश्वर ढोबळे, तसेच डॉ. तीर्थराज राय व ग्रंथपाल डॉ. दिनेश साखरे व्यासपीठावर उपस्थित होते.

सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विजयकुमार भांगडिया यांनी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन केले.

सदर कार्यक्रमाला गणेशदास राठी छात्रालय समितीचे अध्यक्ष वसंतकुमारजी मालपाणी व सचिव डॉ. गोविंद लाहोटी यांच्या शुभेच्छा लाभल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालय विभागप्रमुख डॉ. दिनेश साखरे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात वाचन प्रेरणा दिवसाचे महत्व आणि डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे विचार विषद केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी नंक समन्वयक डॉ. कांतेश्वर




ढोबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे वक्तव्य केले की,'वाचन प्रेरणा दिवस' हा एक स्तुत्य उपक्रम आहे, वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो.कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विजयकुमार भांगडीया यांनी आपल्या अध्यक्षीय वक्तव्यामध्ये विद्यार्थ्यांना संबोधून वाचन म्हणजे केवळ एक सवय नाही, तर ती एक जीवनशैली आहे. ती आपल्याला ज्ञानाने समृद्ध करते, मानसिक शांती देते, कल्पनाशक्तीला पंख लावते आणि आपल्याला एक चांगला नागरिक बनवते. वाचन ही एक अशी गुंतवणूक आहे, जी आयुष्यभर आपल्याला परतावा देत राहते. चला, आपण सर्वजण वाचनाची ही सुंदर सवय जोपासूया आणि ज्ञानाच्या या प्रवासात सामील होऊया तसेच दुर्दम्य इच्छाशक्ती तसेच ठाम आत्मविश्वास असणाऱ्या डॉ. कलामांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू विद्यार्थ्यांना सांगून वाचन प्रेरणा व संस्कृतीचा विकास ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे, ज्ञानसंपन्न व माहिती समृद्ध समाजाची घडण, व्यक्तिमत्व विकास आणि भाषा विकास यासाठी वाचन संस्कृतीचा विस्तार आणि विकास होणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

संचालन आनंदी शेंडे हिने तर आभार तेजस जगदाळे याने केले. या कार्यक्रमाला डॉ. गजेंद्र रघुवंशी, प्रा.वाघ, प्रा. अभय पवार, प्रा. प्रफुल जैन, प्रा. खैरे इत्यादी प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता ग्रंथालयीन कर्मचारी संगीता जवंजाळ, लाहोटी आरती नाईक तसेच लायब्ररी रीडर्स क्लबचे सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले.

# रा.सू.गवई स्मारक उद्घाटनासाठी सज्ज

**अमरावती/का.प्र.**
रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या स्मारकाचे काम गतीने पूर्ण करण्यात आले आहे. दादासाहेबांचा पुतळा, संग्रहालय आणि सभागृहाचे काम पूर्णत्वास आले असून हे भव्य स्मारक उद्घाटनासाठी सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज स्मारकस्थळी भेट देऊन सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. तसेच स्मारकाबाबत महत्वपूर्ण सुचना केल्या.

दादासाहेब गवई यांच्या स्मारकाचे उद्घाटन ३० ऑक्टोबर रोजी नियोजित आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांकडून कामाचा आढावा

उद्घाटनाला मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे हा कार्यक्रम भव्यदिव्य होणार आहे.उद्घाटनाच्या अनुषंगाने सर्व परवानगी आणि ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले आहेत. तसेच उद्घाटन कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

स्मारक ठिकाणी वीज, पाणी आणि स्वच्छतेची कामे प्राधान्याने करण्यात आली आहेत. याबाबींचा सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. वीज वितरण सुरळीत सुरू राहावी, पाण्याचा पुरवठा व्यवस्थित राहावा, तसेच स्वच्छतेसाठी मनुष्यबळ नेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी येरेकर यांनी केल्या.भेटी दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, मुख्य अभियंता गिरीश जोशी, कार्यकारी अभियंता प्रतिक गिरी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे आदी अधिकारी उपस्थित होते.

## महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात मानसशास्त्रातील व्यवसाय संधी या विषयावरील कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**
अस्मिता शिक्षण मंडळ अमरावती द्वारा संचालित स्थानिक महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात मानस प्रबोधिनी,अमरावती व महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाचा मानसशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मानसशास्त्र, व्यवसाय,संधी, आवश्यक तंत्र आणि कौशल्य' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेचे उद्घाटक अमरावती येथील प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.श्रीकांत देशमुख, प्रमुख मार्गदर्शक म्हणून अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर येथील मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रीतम बेदरकर,प्रमुख अतिथी म्हणून अमरावती येथील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.उषा देशमुख व मानस प्रबोधिनीचे डॉ.पंकज वसाडकर तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.मीनल भोंडे उपस्थित होत्या. कार्यशाळेचे



प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ.प्रीतम बेदरकर यांनी सांप्रतकालीन स्पर्धात्मक युगाचा विचार करू जाता प्रत्येक क्षेत्रामध्ये जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे .

कार्यशाळेच्या यशस्वीतेकरिता मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ.गजानन रत्नपारखी, प्रा.विद्या अंभोरे, प्रा. उज्वला गोडबोले तसेच प्रा. जुबेर खान व मानसशास्त्र अभ्यास मंडळाच्या कार्यकारिणीने प्रयत्न केले. या कार्यशाळेला विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# रखडलेल्या वेतनाकरीता मजिप्राचे कंत्राटी कर्मचारी कामबंद करणार

**अमरावती/का.प्र.**
दिवाळीसारखा सण अगदी काही दिवसांवर येऊन ठेपलेला असतानाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मालटेकडी (अमरावती) येथे कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना मागील दोन महिन्यांपासून पगार मिळालेला नाही. पगार न मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून त्यांनी अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

या संदर्भात आज कंत्राटी कर्मचाऱ्यांनी कार्यालयासमोर बैठे आंदोलन करत आपली मागणी प्रशासनापर्यंत पोहोचवली. १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत थकीत पगार अदा न



झाल्यास कामबंद आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.या कामबंद आंदोलनामुळे संपूर्ण अमरावती शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांची गैरसोय होऊ शकते.



सणासुदीच्या काळात कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी वेळेवर पगार मिळणे अत्यावश्यक आहे. मात्र दोन महिने होत आले तरी पगार रखडलेला आहे. वेळेत पगार न मिळाल्यास कामबंद आंदोलनाशिवाय पर्याय उरणार नाही, असे स्पष्ट मत कर्मचाऱ्यांनी व्यक्त केले. कर्मचाऱ्यांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार उद्याच्या कामबंद आंदोलनाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे, अन्यथा त्याचे गंभीर परिणाम शहराच्या दैनंदिन पाणीपुरवठ्यावर होऊ शकतात.

## पंचफुला जामोदकर यांचे निधन

**अमरावती-** येथून जवळच असलेल्या टाकळी (जहांगिर)



येथील रहिवासी श्रीकृष्ण जामोदकर यांच्या मातोश्री पंचफुलाबाई महादेवराव जामोदकर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे वय ९० वर्ष होते. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, जावई, स्नुषा, नातवंड व बराच मोठा आप्त परिवार आहे. हिंदू स्मशानभूमिमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सणासुदीत धोका 'एआय' गैरवापराचा

सध्याच्या फेस्टिव्ह सिझनमध्ये एआयचा वापर करून ग्राहकांची सहजगत्या फसवणूक केली जाण्याची शक्यता आहे. आर्थिक आणि डिजिटल सुरक्षा जपणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. फेस्टिव्हल ऑफरचा मोह ठेवावा; पण फेस्टिव्हल फ्रॉडपासून सावध राहावे. कारण, सावधगिरीच खरी सुरक्षितता आहे.

सणासुदीचा काळ आला की, बाजारपेठा आकर्षक ऑफर्स, डिस्काऊंटस् आणि कॅशबॅकच्या मोहात रंगून जातात. प्रत्येक ई-कॉमर्स साईट, बँक आणि ब्रँड ग्राहकांना बिग सेल, मेगा ऑफर किंवा लिमिटेड टाईम डील अशा घोषणांनी खरेदीकडे खेचतात; पण या डिजिटल उत्सवाच्या आड एक गुप्त, धोकादायक उत्सवही सुरू असतो, तो म्हणजे 'फेस्टिव्हल फ्रॉड!' आणि आता या फसवणुकीला नव्या पिढीचं हत्यार मिळालं आहे कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय'.




सायबर गुन्हेगार एआयच्या मदतीने अगदी वास्तवासारखे दिसणारे आवाज, व्हिडीओ आणि संदेश तयार करू लागले आहेत. डीपफेक ही संकल्पना याचे जिवंत उदाहरण आहे. गुन्हेगार तुमच्या नातेवाईकांचा किंवा मित्रांचा आवाज आणि चेहरा हुबेहुब क्लोन करून मला आता पैसे हवे आहेत, अडकलो आहे, असे भावनिक कॉल किंवा व्हिडीओ पाठवतात. अनेकदा लोकभावनेच्या भरात पैसे ट्रान्स्फर करून बसतात आणि नंतर कळते की, तो संदेश बनावट होता.

एआयमुळे फिशिंग मेल्स आणि फसवे संदेश अधिक बुद्धिमान झाले आहेत. आधी जिथे फसव्या मेलमध्ये भाषेची चूक किंवा संशयास्पद लिंक दिसायची, तिथे आता एआय चॅटबॉटस्च्या मदतीने अगदी व्यावसायिक दर्जाचे, खरी बँक किंवा सरकारी विभागाकडून आल्यासारखे मेल तयार होतात. वापरकर्त्याने फक्त एकदा क्लिक केलं की, त्याची वैयक्तिक माहिती, कार्ड डिटेल्स किंवा पासवर्ड हॅकर्सच्या हाती जातात. फसवणुकीचा आणखी एक धोकादायक प्रकार म्हणजे टार्गेटेड स्कॅम. सोशल मीडियावरून गुन्हेगार तुमचे फोटो, आवडीनिवडी, खरेदीच्या सवयी आणि पोस्टस् विश्लेषित करतात. मग, ते तुमच्यासाठी खास ऑफर तयार करतात. उदा. तुम्ही अलीकडे मोबाईल शोधत असाल, तर ते तुम्हाला फेस्टिव्हल सवलत नावाने फेक लिंक पाठवतात. त्या लिंकवर क्लिक केल्यावर डेटा चोरी किंवा पेमेंट फसवणूक घडते.

काही गुन्हेगार फेक कस्टमर केअर या नव्या तंत्राचाही वापर करत आहेत. ते एआय-चॅटबॉटस्द्वारे बनावट हेल्प डेस्क तयार करतात. तुम्ही तक्रार नोंदवायला फोन किंवा चॅट केल्यावर ते तुमच्याकडून बँक माहिती, ओटीपी किंवा कार्ड क्रमांक मागतात आणि क्षणार्धात खाते रिकामे होते. एआयचा वापर करून बनवलेले क्यूआर कोड स्कॅम्सदेखील वेगाने वाढत आहेत. दिसायला जेन्युइन वाटणारे क्यूआर कोड प्रत्यक्षात फसवे असतात. तुम्ही स्कॅन करून पेमेंट करता; पण पैसे ज्या खात्यात जायला हवेत तिथे न जाता थेट स्कॅमरच्या खात्यात पोहोचतात.

या सर्व फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी ग्राहकांनी काही सोपी पण महत्त्वाची पावले उचलली पाहिजेत. प्रथम 'टू गुड टू बी टू' अशा ऑफरवर कधीही लगेच विश्वास ठेवू नका. कोणतीही ऑफर अत्यंत मोहक वाटत असेल, तर ती बहुतेक वेळा फसवणुकीची असते. दुसरे म्हणजे मल्टिफॅक्टर ऑथेंटिकेशन वापरा. फक्त ओटीपीवर विसंबून न राहता सिक्युरिटी ॲप्स किंवा डिव्हाईस व्हेरिफिकेशन सक्षम ठेवा. तिसरे, खरेदीसाठी फक्त अधिकृत वेबसाईटस् किंवा ॲप्सचाच वापर करा. गुगल सर्चवर दिसणाऱ्या जाहिरातींवर क्लिक करू नका. कारण, त्या जाहिरातींच्या मागे अनेकदा बनावट साईटस् दडलेल्या असतात. चौथे, क्यूआर कोड स्कॅन करण्यापूर्वी तो कोणी पाठवला आहे हे तपासा. अनोळखी व्यक्तीकडून आलेला कोड कधीही स्कॅन करू नका. कस्टमर केअर नंबरसाठीही विशेष काळजी घ्या. गुगलवर शोधण्याऐवजी थेट संबंधित कंपनीच्या अधिकृत साईटवरूनच संपर्क क्रमांक मिळवा. सोशल मीडियावर वैयक्तिक माहितीचे अतिरेकी प्रदर्शन टाळा. जितकी माहिती कमी, तितका धोका कमी.

डीपफेक तंत्रज्ञानामुळे वास्तव आणि बनावटपणाच्या सीमारेषा धूसर होत आहेत. एआयच्या युगात खरा स्मार्ट ग्राहक तोच, जो प्रत्येक व्यवहारापूर्वी विचारपूर्वक पाऊल टाकतो. डिजिटल साक्षरतेचा अर्थ फक्त मोबाईल किंवा संगणक चालवता येणे एवढाच मर्यादित नाही. ती म्हणजे तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर कसा करायचा, माहितीचे मूल्यमापन कसे करायचे, फसवणूक कशी ओळखायची आणि डिजिटल नैतिकतेची जाणीव कशी ठेवायची या सर्व गोष्टींची समज. ॲप इन्स्टॉल करा, क्यूआर कोड स्कॅन करा किंवा ओटीपी द्या या वाक्यांमागे कोणता धोका दडलेला आहे, हे अनेकांना समजत नाही. त्यामुळे सायबर फसवणुकीचे सर्वाधिक बळी हे प्रामुख्याने विश्वासाने प्रत्येक डिजिटल सूचना पाळणारे ग्राहक असतात.

यासाठी सर्वप्रथम गरज आहे ती शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर डिजिटल साक्षरता हा विषय अनिवार्य करण्याची. सरकारने सायबर सुरक्षा जागरूकता सप्ताह, राष्ट्रीय डिजिटल साक्षरता मिशन यांसारख्या उपक्रमांद्वारे योग्य दिशेने प्रयत्न सुरू केले आहेत; परंतु हे उपक्रम ग्राम पातळीपर्यंत पोहोचले पाहिजेत. प्रत्येक जिल्ह्यात सायबर प्रशिक्षण केंद्रे, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष कार्यशाळा, शेतकऱ्यांसाठी सुरक्षित ऑनलाईन बँकिंग या विषयांवर प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जाऊ शकतात. एखाद्या जाहिरातीमागील फसवणूक ओळखणे, ऑनलाईन व्यवहारातील अटी व शर्ती समजून घेणे किंवा खूप चांगली ऑफर असली, तरी तिची सत्यता तपासणे हे कौशल्य विकसित करण्यासाठी सामुदायिक प्रशिक्षण वर्ग सुरू केले पाहिजेत. सोशल मीडियावर येणाऱ्या प्रत्येक बातमीवर किंवा व्हिडीओवर विश्वास ठेवणं धोकादायक ठरू शकतं. डीपफेक तंत्रज्ञानामुळे बनावट व्हिडीओ आणि ऑडिओ इतके वास्तव वाटतात की, सामान्य नागरिकांना फसवले जाणे सहज शक्य होते. त्यामुळे 'शेअर करण्याआधी तपासा' ही सवयप्रत्येक नागरिकात रुजली पाहिजे. सायबर फसवणुकीविरोधात त्वरित कृती करणे हेही ग्राहक शिक्षणाचा भाग आहे.

संशयास्पद कॉल, ई-मेल किंवा ट्रान्सॅक्शन झाल्यास ताबडतोब तक्रार नोंदवणे हे नुकसान टाळण्याचे पहिले पाऊल ठरते. कुठला कॉल किंवा संदेश संशयास्पद वाटला, तर त्वरित तक्रार नोंदवा. भारत सरकारची राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन १९३० वर कॉल करून फसवणुकीची माहिती द्या, पैसे ट्रान्स्फर झाले असल्यास खाते गोठवण्याची विनंती करा. महाराष्ट्रातील नागरिकांनी १९४५ या राज्य सायबर हेल्पलाईनवर कॉल करून ईएफआयआर दाखल करावा किंवा 'सायबर क्राईम डॉट जीओव्ही डॉट इन'वर ऑनलाईन तक्रार नोंदवावी.

**ॲड. प्रशांत माळी**

# 'शहाण्या माणसांचा क्लास'



'अरे, पण गरज काय आहे याची?'

हे वाक्य ज्यांना योग्यवेळी, योग्य ठिकाणी, योग्य गोष्टीविषयी आणि योग्य व्यक्तीशी बोलताना वापरता येते ना, ती माणसे शहाणी असतात. जपून वागतात, जपून जगतात आणि जगताना इतरांनाही जपतात.

ऊठसूठ हॉटेलात जाऊन खाणार नाहीत, सतत बाहेरून पार्सल मागवणार नाहीत, सारखी खरेदीही करणार नाहीत. रेल्वे स्टेशन किंवा एसटी स्टॅन्डवर पहाटे साडेचार किंवा पाच वाजता एकटे उतरले तर अर्धा तास तिथंच थांबतील. भल्या पहाटे जाऊन घरच्यांच्या साखरझोपेचा विचका करणार नाहीत आणि दुप्पट-तिप्पट पैसेही खर्च करणार नाहीत. अर्धा तास थांबतील, बसेस सुरू झाल्या की शांतपणे घरी पोचतील. सकाळचा पहिला चहा घरीच घेतील, सात वाजता आलेला वर्तमानपत्राचा ताजा अंक वाचतील. अर्धा तास वाचवण्यासाठी जिवाचा आटापिटा करून तिप्पट पैसे खर्च करणार नाहीत.पण कुटुंब असेल, लहान बाळ असेल तर असे वागणार नाहीत. रिक्षा करतील, थोडीफार घासाघीस करतील, आणि घरी जातील. हे जगण्यातले व्यावहारिक शहाणपण पिढ्यानपिढ्या रक्तात मुरलेला एक वर्ग आपल्या समाजात आहे. अनेकजण त्यांना मिडलक्लास म्हणतात, पण माझ्या लेखी ती खरी शहाणी माणसे असतात. त्यांना 'मजेत जगावे कसे?' हे समजायला पुस्तक वाचावे लागत नाही, ते मजेतच जगत असतात. किंबहुना, जगण्याचा आस्वाद घेण्याची कला त्यांना जन्मजात अवगत झालेली असते.

आपले मूल अनवाणी शाळेत जाणार नाही याची काळजी त्यांना असते. ती काळजी वूडलँड, क्रॉक्स, ली कूपर, बाटा यांनी शांत करण्याचा उद्योग ते करत बसत नाहीत. लखानी किंवा पॅरागॉन ते आनंदाने निवडतात, आनंदानं वापरतात, गरजा पूर्ण करतात आणि मस्त राहतात.

स्वत:ची वाहने ते स्वत: धुतात, पुसतात. सायकलला स्वत:च ऑईलिंग करतात. घरातल्या पंपाने सायकलच्या टायरमध्ये हवा भरतात. सुटी फुले आणतील, देवाच्या पूजेचे हार स्वत: तयार करतील. बुटांना पॉलिश स्वत:च करतील. ते रोज जमणार नसेल तर बाहेरून आल्यावर बूट काढले की, मोज्यानंच ते बूट स्वच्छ पुसतील, आत ठेवतील आणि मग मोज्यांचा जोड धुवायला टाकतील. हे काटकसरीचे जगणे नसते, हे योग्य जगणे असते.

ज्या खोलीत कुणी नसेल तिथले लाईट्स आणि पंखे बंद ठेवतात. गरज नसताना घरभर दिवे आणि पंखे विनाकारण चालू ठेवण्याचा शौक त्यांना नसतो. रात्री खिडक्या उघड्या ठेवून झोपतात, एसीची गरज पडत नाही. गरज नसताना 'बाय वन गेट वन फ्री' च्या शंभर जाहिराती पाहिल्या तरीही त्यांना काहीही फरक पडत नाही. पण गरज असेल तेव्हा रेमण्ड, सियाराम, अरविंद मिल्स, विमल असंच कापड घेतील. रेडिमेड घेण्यापेक्षा शिवून घेतील. मस्तपैकी चार-पाच वर्षं तरी सहज वापरतील.

घरी कुणी आले की, पोह्याचा चिवडा, भडंग, खोबऱ्याची वडी किंवा शेंगादाण्याचा-रव्याचा-बेसनाचा लाडू मनापासून देतील आणि नंतर आलं घातलेला कपभर चहा.. (हे सगळे पदार्थ घरीच स्वहस्ते केलेले असतात आणि चहापत्ती घाऊक मार्केटमधून आणलेली असली तर आले, गवतीचहा, चिमूटभर सुंठ घालून तिला फक्कड रंगत कशी आणायची, हे तंत्र बरोब्बर समजलेलं असते.)आल्यागेल्याचा, पै-पाहुण्यांचा पाहुणचार मस्त करतात, रिटर्न गिफ्ट म्हणून उगाचच महागड्या गोष्टी देऊन इंप्रेशन मारायला जात नाहीत.

सणावाराला घरी गोड पदार्थ तर होणारच. घरच्या तुपातला शिरा, खीर, चक्का आणून घरी केलेले श्रीखंड (अनेकदा चक्कासुद्धा घरीच करतात) हे पदार्थ पेटंट असतात. अचानकच गोड खाण्याची हुक्की आलीच तर केळ्याचे शिकरण दोन मिनिटांत तयार..!

घरात कुणी नसेल आणि एकटाच मुलगा किंवा पुरूष जरी असेल तरी स्वत:च्या वेळेपुरती मुगाची खिचडी त्याला करून खाता येते. दुपारच्या उरलेल्या पोळ्यांची वरणफळे त्याला बरोबर जमतात. कालचा उरलेला भात फोडणी देऊन सकाळी खाता येतो. किंवा वेळप्रसंगी दहीपोहे करूनही उदरभरणाची सोय करता येते. त्यासाठी हॉटेलची पायरी चढण्याची गरजच पडत नाही. ह्या जगण्याला लो प्रोफाईल, मिडलक्लास किंवा चिक्कूपणा म्हणणारी माणसे बिनडोक असतात. कारण, हे परफेक्ट आत्मनिर्भर जगणे आहे. यांच्या घरातले पुरूष दळण आणतात, वाणसामान आणतात, भाजी आणतात, इस्त्रीचे कपडे लॉन्ड्रीत नेऊन देतात आणि घेऊनही येतात. रद्दीवाल्याकडे स्वत:च रद्दी घेऊन जातात. स्वत: पाने घेणे आणि जेवण झाल्यानंतर स्वत:चे ताट स्वत: घासणे, फरशी पुसणे यात त्यांना काहीही गैर वाटत नाही. पहिल्या पगारात घेतलेले घड्याळ ते रिटायर होईपर्यंत छान वापरतात. पाच-सात वर्षं चष्म्याची फ्रेम बदलत्या नंबरनुसार काचा बदलून वापरतात. याच्यात त्यांना कसलाही कमीपणा वाटत नाही.

मुलाचा पहिला वाढदिवस, पाचवा वाढदिवस खाजगी हॉल किंवा पार्टी हॉल घेऊन साजरा-बिजरा करत नाहीत. असल्या कृत्रिम आनंदाची त्यांना गरज नसते. पण मुलांच्या शिक्षणाविषयी मात्र अजिबात तडजोड नसते. अगदी निगुतीने मुलांना शिकवतात. महागड्या ब्रॅन्डेड गोष्टी चांगल्या असतातच असे नाही, यावर त्यांचा पूर्ण विश्वास असतो. त्यामुळे, चांगली शाळा ते बरोबर निवडतात आणि मुलांना शिक्षण देतात. मुलांना खाऊनही माजू देत नाहीत आणि टाकूनही माजू देत नाहीत. सापशिडीतल्या ९८ आकड्यावरच्या सापाला घाबरायचं नाही, हे आपल्या मुलांना शिकवायला त्यांना कुठल्याही मोटिव्हेशनल ट्रेनरची गरज भासत नाही, ते स्वत:च खंबीर असतात. आवश्यक तेवढी यथाशक्ती बचत करून, साधी सरळ भरवशाची गुंतवणूक आणि साधा जीवनविमा एवढ्यावर त्यांना सुरक्षित वाटते. गडगंज श्रीमंत होण्याचा हव्यास ते धरत नाहीत. अनैतिक मार्गानं काहीही कमावण्याचा विचारही करत नाहीत. 'जोडोनियां धन उत्तम व्यवहारें, उदास विचारें वेच करीं' या तुकोबारायांनी सांगितलेल्या पक्क्या धारणेनं जगतात. म्हणून त्यांची वखवख होत नाही, त्यांना भस्म्या होत नाही. षड्रिपूंचा त्रास तर अजिबात नाही.. हेच तर खऱ्या अर्थाने निरामय आयुष्य आहे ना..!

घरात महागडे इंटिरिअर नसले तरी, घरी कामाला येणाऱ्या बाईंच्या मुलांच्या वह्यापुस्तकांसाठी मात्र बरोबर पैसे दिले जातात, अगदी न चुकता. सकाळी दारी आलेल्या वासुदेवाला किंवा समर्थ संप्रदायातल्या माधुकरी मागणाऱ्यांना तांदळाचे माप मिळतंच. दरवर्षी दिवाळीला पोस्टमनला शंभराची नोट मिळते. सगळ्या रेषा कशा अगदी समांतर..कशाचंही तंगडे कशातही अडकत नाही, कसला गुंता नाही, वैचारिक गोंधळ नाही. बेष्ट आयुष्य..!

समंजस आयुष्य..! विनाशर्त विनातक्रार संपूर्ण स्वीकारलेले आयुष्य..!

'क्रेझ' या गोष्टीशी यांचा लांबून-लांबून संबंध नसतो. म्हणून यांचे व्याप मर्यादित असतात. आयुष्याकडून फार अपेक्षा नसतात,हट्ट-दुराग्रह तर अजिबातच नाहीत. वर्षाकाठी दिवाळी सारख्या एखाद्-दुसऱ्या प्रसंगी कापड खरेदी वगैरे होते, जमल्यास गुरूपुष्यामृता च्या दिवशी एक ग्रॅम सोने घरी येते आणि देवघरात देवासमोर ठेवले जाते. अट्टाहास कुठलाच नाही. ह्या जगण्याला ते

**'हा माझा मार्ग एकला'**

असे म्हणू शकतात, पण

**'मैं जिंदगी का साथ निभाता चला गया'**

हे म्हणणे त्यांना साधलेले असते. ह्या जगण्याला काय म्हणाल? मिडलक्लास? नाही.

हा तर खरा वरचा क्लास.. विषमभुज त्रिकोणाला सुद्धा समभुज करण्याची अफाट विलक्षण शक्ती ज्यांच्या दृष्टीकोनात ठासून भरली आहे असा क्लास...!

मला फार आनंद आहे की, मी याच क्लासमधला आहे..

मग कुणी त्याला मिडलक्लास म्हणो किंवा मध्यमवर्गीय..

पण हाच आहे खऱ्या शहाण्या माणसांचा क्लास...!

**मयुरेश उमाकांत डंके**
मानसतज्ञ,पुणे

# स्त्रीत्वाची प्रखर ज्योत : स्मिता पाटील



स्मिता पाटील या भारतीय चित्रपटसृष्टीला लाभलेल्या एका अद्वितीय, तेजस्वी, विलक्षण प्रतिभे च्या धनी होत्या. सामाजिक व राजकीय भान जपणाऱ्या कुटुंबात वाढलेल्या स्मिताजींनी साहित्यात शिक्षण घेतले. स्त्री-पुरुष समानता, लिंगभेद, समाजरचना यांसारख्या प्रश्नांमध्ये त्यांची आंतरिक रुची होती. फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिटय़ूट (एफ.टी.आय.आय.)मध्ये घेतलेल्या प्रशिक्षणाने त्यांच्या कलात्मक प्रवासाची पायाभरणी झाली. श्याम बेनेगल दिग्दर्शित चरणदास चोर (१९७५) या चित्रपटातून त्यांनी अभिनयक्षेत्रात पदार्पण केले आणि लगेचच समांतर चित्रपटसृष्टीतील एक दैदीप्यमान नक्षत्र ठरल्या.

स्मिता पाटील काय चिज होती हे कळायला तीचे चित्रपटच बघावे लागतात. मग ती त्याही लोकांना आवडते ज्यांना ती आवडत नाही. तीचा कोणताही सिनेमा असो,प्रेक्षकांना मंथन करावयास भाग पाडणाराच होता. स्मिता पाटीलचे प्रत्येक चित्रपट अबला स्त्रीचे शक्तीची बलस्थाने अधोरेखित करणारे होते. तिच्या अभिनयाचं गारुड एव्हढं की एक समर्थ स्त्रीची स्त्रीप्रधान भूमिका जीव ओतून त्या साकारण्यात तीचा हातखंड होता. चक्र, जैत रे जैत, मीर्च मसाला, अर्थ, अमृत ,मंथन, भूमिका, उंबरठा यासारख्या प्रत्येक चित्रपटात एक समर्थ जीवन जगणारी स्त्रीची ताकद ,निर्णय शक्ती,दर्शविणारी क्रांतिकारक स्त्री म्हणून ती दिसली.या चित्रपटांमधून त्यांनी कितीतरी विविधांगी भूमिका अक्षरशः जिवंत केल्या आहेत.

त्यांनी आपल्या सामर्थ्यवान अभिनयाची, स्त्रीच्या मनातील गूढतेची आणि वेदनांची अशी छटा उलगडून दाखवली की प्रेक्षकच नव्हे तर समीक्षकसुद्धा स्तिमित झाले. त्यांचा अभिनय हा केवळ साकारलेला नव्हता,तर तो जगलेला अनुभव होता ज्यात स्त्रीचे असहाय्य मौन, तिचे दडपलेले अस्तित्व आणि तिचा उन्मुक्त आविष्कार यांचे चित्रण जणू जीवनाच्या पानांवर कोरले गेले.स्मिता पाटील या फक्त अभिनेत्री नव्हत्या; त्या अंतःकरणाने एक कार्यकर्ती होत्या. त्यांनी पडद्यावरील प्रत्येक भूमिकेला स्त्रीस्वातंत्र्याचे, स्त्रीच्या संघर्षाचे प्रतीक केले. समाजातील पितृसत्ताक चौकटीला धक्का देणारी त्यांची प्रत्येक भूमिका ही स्त्रीच्या आत्ममुक्तीची सशक्त अभिव्यक्ती होती.

१९७०-८० च्या दशकात समांतर चित्रपटांची लाट आली. समाजातील अनेक प्रश्नांना डोळ्यासमोर ठेवून चित्रपट बनू लागले. मुळात स्मिता या एका सुशिक्षीत तसेच समाजवादी कुटुंबातून आल्यामुळे त्यांना सामाजिक प्रश्नांविषयी कळवळा होता.१९७७हे वर्ष स्मिता पाटील यांच्या करियरमधील टर्निंग पॉईट ठरले.यावर्षी 'भूमिका' आणि 'मंथन' हे दोन चित्रपट यशस्वी झाले. या कलात्मक चित्रपटांतून त्यांनी नसिरुदीन शाह, शबाना आजमी, अमोल पालेकर आणि अमरीश पुरी सारख्या कसदार कलाकारांसोबत काम करून अभिनयात आपला वेगळा ठसा उमटविला. तिच्या स्मरणीय भूमिकांपैकी एक जब्बार पटेल दिग्दर्शित उंबरठा (१९८२) या मराठी चित्रपटात स्मिता पाटीलने साकारलेली सुलभा महाजन ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा स्वतःच्या स्थिर आयुष्याविरुद्ध बंड करण्याची भूमिका लक्ष वेधून गेली.जैत रे जैत हा आदिवासी ठाकर जमातीचे जिवनावर डॉ जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित चित्रपट मैलाचा दगड ठरला.

स्त्री ही केवळ भोगवस्तू असा समज ज्या काळात होता त्या काळात स्त्रीच स्वतंत्र अस्तित्व, आणि याचसाठी झगडणाऱ्या सोनबाईचा प्रवास 'मिर्च मसाला' चित्रपटात पाहायला मिळतो. हाती कोयता घेऊन उभी सोनबाई निशब्द नजरेने अन्यायी ब्रिटिश सुभेदार ला पाहत राहते. या क्षणाला सोनबाईचे नजरेला जी धार आहे ती त्या कोयतालाही नाही.डोळ्यांची आणि अंगाची आगीने लाही लाही होत लालबुंद तिखटाचे आगीने तडफडत सुभेदार तडफडत खाली पडतो. तिचे पांढरे शुभ्र डोळ्यातील अंगार मिरचीच्या लाल रंगापेक्षाही भयंकर प्रकटते आणि स्मिता पाटीलच्या त्या बोलक्या डोळ्यांमधल्या त्या अंगारातच प्रेक्षक गुंतवून जातो.

असं म्हणतात की, स्मिता यांचे डोळे खूप बोलके होते. तिच्या नजरेत वेगळी चमक होती. वाचिक अभिनयाबरोबरच डोळ्यांच्या माध्यमातून सांकेतिक अभिनय करण्यातही त्यांचा हातखंडा होता.'चक्र'मधील अम्मा ह्या भूमिकेबद्दल अभिनया साठी स्मिता यांना 'सुवर्णकमळ' मिळाले होते. त्यांना अभिनया बद्दल राज्य व राष्ट्रीय पुरस्कार दोन वेळा प्राप्त झाले होते. भूमिका या चित्रपटातील अभिनया साठी त्यांना मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार हा त्यांच्या अद्वितीय प्रतिभेचा साक्षीदार ठरला.

समांतर चित्रपटांच्या धारेबरोबरच त्यांनी व्यावसायिक चित्रपटांतही आपली छाप उमटवली.नमक हलाल (१९८२), शक्ती (१९८२) यांसारख्या लोकप्रिय चित्रपटांतून त्यांनी आपल्या सर्वसमावेशक अभिनयकौशल्याचा प्रत्यय दिला. मात्र त्यांचे खरे वैभव हे समांतर चित्रपटांतील ग्रामीण स्त्रियांच्या, वंचित समाजघटकांच्या भूमिका होत्या. त्यांनी त्या पात्रांना ज्या वास्तवदर्शीपणे, ज्या करुणा आणि कणखरतेने साकारले, ते भारतीय सिनेमातील एक ऐतिहासिक पर्व ठरले.

आजही स्मिता पाटील या केवळ अभिनेत्री म्हणून नव्हे, तर एक स्त्रीवादी प्रतीक, सत्यतेचे, धैर्याचे आणि तेजस्वी प्रतिभेचे मूर्तिमंत रूप म्हणून स्मरणात राहतात. त्यांच्यामुळे भारतीय चित्रपटसृष्टीतील स्त्रीचे चित्रण एका नवीन उंचीवर पोहोचले. आज अनेक पिढ्यांतील अभिनेत्री त्यांना प्रेरणास्थान मानतात.स्मिता पाटील म्हणजे स्त्रीत्वाच्या जाज्वल्य ज्वालेचे, कलेतील प्रामाणिकतेचे आणि जीवनाच्या गूढतेशी झुंज देणाऱ्या एका थोर आत्म्याचे प्रतीक.

वयाच्या विसाव्या वर्षी रुपेरी पडद्यावर पदार्पण करणा-या स्मिता या जवळजवळ ७५ चित्रपटांच्या अनभिषिक्त महाराणी ठरल्या होत्या. १९८४ मध्ये त्या आंतरराष्ट्रीय नायिका बनल्या.फ्रान्समधील रॉशेला शहरातील हाऊस ऑफ कल्चर मध्ये त्यांच्या चक्र, बाजार, मंथन, भूमिका ह्या चित्रपटांचा महोत्सव भरविण्यात आला होता. सत्यजित रायनंतर हा बहुमान स्मिता यांना मिळाला होता.

आयुष्याच्या केवळ १० वर्ष इतक्या कमी कालावधीत आपल्या सशक्त अभिनयाच्या जोरावर समांतर तसेच व्यावसायिक सिनेमातही यश संपादन केले. दोन राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या या अभिनेत्रीला भारतीय सिनेमातील अमूल्य योगदानासाठी राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांचे हस्ते पुरस्कार देऊन त्यांना 'पद्मश्रीने' सम्मानित करण्यात आले होते.स्मिता पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ त्याचा गौरव म्हणुन भारत सरकारने २०१३ला त्यांचा नावे डाक तिकिट हि प्रदर्शित केले .हा राष्ट्रीय सन्मान मिळवणाऱ्या त्या प्रथम मराठी कलावंत ठरल्या. विलक्षण अभिनय, सुंदर डोळे, अतिशय हुशार, सामाजिकतेचे भान जपणा-या स्मिता पाटील यांचा आदर्श आजची प्रत्येक अभिनेत्री जपण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण, 'अशी स्मिता पाटील आता होणे नाही'.

**इंजि. वा पां जाधव**
अमरावती.

# आर्थिक व्यवहाराअभावी घरकुलाचा हप्ता रखडला

## पिंपळखुटा येथील प्रकार : कुटुंबाचा संसार उघड्यावर



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत पिंपळखुटा येथे घरकुल योजनेतील गंभीर अनियमिततेचा प्रकार उघड झाला आहे. येथील लाभार्थी युसुफ शाह अय्युब शाह यांचे घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतरही दुसरा हप्ता अडीच महिन्यांपासून रखडलेला आहे. दलालामार्फत अभियंत्याच्या नावावर पाच हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचा गंभीर आरोप लाभार्थ्यांकडून करण्यात आला आहे.

युसुफ शाह यांना १४ जुलै २०२५ रोजी घराचा पाया बांधण्यासाठी पंधरा हजार रुपयांचा पहिला हप्ता मिळाला होता. त्या रकमेवर त्यांनी काही दिवसांतच घराचा जोता पूर्ण केला. त्यानंतर पुढील बांधकामासाठी दुसरा हप्ता मिळणे अपेक्षित होते. मात्र गावातील एका दलालाने 'अभियंत्याच्या नावावर पाच हजार रुपये दिल्यासच दुसरा हप्ता जमा होईल' अशी मागणी केल्याचा आरोप आहे.

लाभार्थ्यांनी ही मागणी नाकारल्यानंतर, घराचे बांधकाम पूर्ण झालं असतानाही अडीच महिन्यांपासून दुसरा हप्ता खात्यात जमा करण्यात आलेला नाही. परिणामी युसुफ शाह यांच्या कुटुंबाचा संसार अक्षरशः उघड्यावर आला आहे.

**घरकुल योजनेत घोळ : संबंधितांचे दुर्लक्ष :** पिंपळखुटा येथे अनेक लाभार्थ्यांनी घराचे बांधकाम कागदोपत्री दाखवून दलालामार्फत पैशांची देवाणघेवाण केली असल्याची माहिती पुढे आली आहे. ज्यांनी मागणीप्रमाणे रक्कम दिली, त्यांच्या खात्यात हप्ते जमा झाले, तर युसुफ शाह यांनी बांधकाम पूर्ण करूनही मागणी न मानल्याने त्यांचा हप्ता रखडला आहे. या प्रकारातून घरकुल योजनेत गंभीर घोळ आणि संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष स्पष्ट होत आहे.

> 'मला १४ जुलै रोजी पहिला हप्ता मिळाला आणि त्या पैशांत मी घराचा जोता बांधकाम पूर्ण केले. मात्र दुसरा हप्ता देण्यासाठी अभियंत्याच्या नावावर दलालामार्फत पाच हजार रुपयांची मागणी करण्यात आली. मी पैसे देण्यास नकार दिल्याने माझा हप्ता रखडला. ज्यांनी पैसे दिले, त्यांचे हप्ते त्वरित जमा झाले. त्यामुळे माझे घरकुल थांबले आणि संसार उघड्यावर आला.'
>
> **युसुफ शाह अय्युब शाह,**
> घरकुल लाभार्थी, पिंपळखुटा

## अकोट शहरात वंचित बहुजन आघाडीचे चर्चासत्र

### सुजात आंबेडकरांची उपस्थिती



**अकोट :** वंचित बहुजन आघाडीचा चर्चा दौऱ्या दरम्यान १७ ऑक्टोबरला अकोट शहरातील नरसिंग महाराज मंदिरा मध्ये कार्यकर्ते व पदाधिकारी यांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष बांधणीच्या दृष्टीने दुपारी ३ वाजता हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले असून, यात वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर हे मार्गदर्शन करणार आहेत. तरी तालुक्यातील कार्यकर्ते व पदाधिकारी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आव्हान तालुका अध्यक्ष चरण इंगळे व महासचिव रोशन पुंडकर यांनी केले आहे.

## पूरग्रस्तांना दिलासा : अकोला अर्बन बँकेकडून ४.५१ लाखांचा मदतीचा हात

### अकोला अर्बन बँकेकडून पूरग्रस्तांसाठी अर्थसहाय्य

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याच्या विविध भागांमध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या व्यापक नुकसानीच्या पार्श्वभूमीवर पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मा. मुख्यमंत्री निधी करिता अकोला मा. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत बँकेला मदतीचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला तर्फे मुख्यमंत्री सहाय्यता निधीस आर्थिक योगदान देण्यात आले आहे.



दि. अकोला अर्बन बँकेच्या वतीने एकूण ४,५१,०००/- (अक्षरी – चार लाख एक्कावन्न हजार रुपये फक्त) रक्कमेचा धनादेश अकोला जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. बँकेच्या ४६६ कर्मचाऱ्यांनी व संचालक मंडळाच्या सदस्यांनी आपले योगदान देत ही रक्कम उभारण्यात आली आहे. ही मदत बँकेचे अध्यक्ष शंतनु जोशी व मुख्य कार्यकारी अधिकारी राजन सोनटक्के यांच्या हस्ते अकोला जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना प्रदान करण्यात आली.

दि अकोला अर्बन बँक ही केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित न राहता समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखून सामाजिक कार्यातही नेहमीच पुढाकार घेत असते, याचेच हे एक उत्तम उदाहरण ठरले आहे. बँकेच्या या सामाजिक उत्तरदायित्वाच्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, पूरग्रस्त नागरिकांच्या पुनर्वसनासाठी हे आर्थिक योगदान उपयुक्त ठरणार आहे. या प्रसंगी बँकेचे अधिकारी महेश जोशी व समीर थोडगे हे उपस्थित होते.

## वृक्ष संगोपनाच्या नावावर लाखो रुपयांची उधळपट्टी

### सावरगाव येथे रोजगार सेवक व अभियंत्यांचा कारनामा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील अतिदुर्गम सावरगाव येथे शासनाच्या रोजगार हमी योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या वृक्ष लागवड आणि संगोपन कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचाराचा प्रकार समोर आला आहे.

गावठाण व स्मशानभूमी परिसरात लावण्यात आलेल्या शेकडो वृक्षांच्या संगोपनाच्या नावाखाली शासनाला लाखो रुपयांचा चुना लावल्याचे वृत्त आहे. प्रत्यक्षात मोजकेच वृक्ष जिवंत असताना, कागदोपत्री मात्र शेकडो वृक्ष जिवंत असल्याचे दाखवून रोजगार सेवक आणि अभियंता यांनी संगोपन कामाला हिरवा कंदील देत, मजुरांच्या नावावर लाखो रुपयांची बोगस उपस्थिती दाखवून निधी गिळंकृत केल्याचा आरोप आहे.



संगोपनासाठी दररोज मजूर उपस्थित असल्याचे दाखवण्यासाठी खोटे फोटो, बनावट जिओटॅगिंग आणि कागदोपत्री नोंदी तयार केल्या गेल्याचे समजते. अभियंत्याची जबाबदारी असताना, प्रत्यक्ष पाहणी न करता फक्त कागदांवर सही करून शासन निधीची उधळपट्टी करण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधित रोजगार सेवक व अभियंता यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व वृक्षप्रेमी संघटनांकडून होत आहे.

**हडप केलेल्या लाखो रुपयांची वसुली करा! :** सावरगाव येथील स्मशानभूमी व गावठाण परिसरात कागदोपत्री दाखवलेल्या शेकडो वृक्षांच्या संगोपनासाठी मजुरांच्या नावावर लाखो रुपयांची उधळपट्टी करण्यात आली आहे. संबंधित रोजगार सेवक व अभियंता यांच्याकडून या रकमेची तात्काळ वसुली करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी होत आहे.

**रोजगार हमी योजनेचा बट्ट्याबोळ! :** शासनाने ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने रोजगार हमी योजना सुरू केली; मात्र सावरगाव येथील प्रकारामुळे या योजनेचा बट्ट्याबोळ झाल्याचे चित्र आहे. मजुरांना रोजगार न देता त्यांच्या नावावर लाखो रुपयांची अफरातफर केल्याने शासनाच्या हेतूवरच पाणी फिरले आहे.

## गुरुदेव नगरातील नागरिकांना दुर्गंधीयुक्त दुषित पाणीपुरवठा; आरोग्य धोक्यात



■ प्रतिनिधी | अकोट ■

संतनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथे जीवन प्राधिकरणामार्फत पाणीपुरवठा करण्यात येतो आणि ग्रामपंचायतीच्या माध्यमातून तो नागरिकांपर्यंत पोहोचविला जातो. मात्र, येथील गुरुदेव नगरातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून दुर्गंधीयुक्त व दुषित पाणी प्यावे लागत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून पाण्याची स्थिती अत्यंत बिकट असून, प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या कालावधीत एकदाही पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविले नाहीत, अशी नागरिकांची तक्रार आहे.

या पार्श्वभूमीवर गुरुदेव नगरातील नागरिकांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांना दुर्गंधीयुक्त पाण्याचा वास देत तत्काळ तपासणी करून उपाययोजना करण्याचे लेखी निवेदन वैद्यकीय अधिकारी डॉ. वालसिंगे यांना दिले. तसेच, याच आशयाचे निवेदन ग्रामपंचायत कार्यालयात सुद्धा देण्यात आले आहे. जर ग्रामपंचायतीकडून लवकरात लवकर शुद्ध पाण्याची सोय करण्यात आली नाही, तर ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप लावण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. या निवेदनावर विजय आखरे, गजानन वारकरी, नितीन खोकले, महादेव आखरे, सुधा गावत्रे, गोपाल कुसलकार, आरीफ पठाण, चेतन राठोड, सुधाकर तायडे, महेश गव्हाळे, संजय खडसने, मनीष फुरसुले, अशोक फुरसुले, रमेश आखरे, रमेश रावणकर, गणेश गव्हाळे, शिवाजी भराटे, श. गयधर, अमर तळे, राजेश तळे, वनमाला थारकर, मंगेश मानकर, आकाश काळे आदींसह असंख्य नागरिकांच्या सह्या आहेत.

## जि. प. व पं. स. निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

■ प्रतिनिधी | अकोला ■



जि. प. व पं. स. निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात पंचायत समितीनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी याबाबतचा आदेश जारी केला. पातूर पंचायत समिती क्षेत्रासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी जोगेंद्र कट्यारे व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार डॉ. राहूल वानखडे, अकोटसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर व सहायक अधिकारी म्हणून तहसीलदार डॉ. सुनील चव्हाण, तसेच मूर्तिजापूरसाठी उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपकुमार अपार व तहसीलदार शिल्पा बोबडे यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. डॉ. शरद जावळे हे निवडणूक निर्णय अधिकारी व तहसीलदार सुरेश कव्हळे हे सहा. नि. नि. अधिकारी असतील. बाळापूर क्षेत्रासाठी निखिल खेमनार व सहायक अधिकारी म्हणून वैभव फरतारे, बार्शिटाकळीसाठी उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेश परंडेकर, तहसीलदार राजेश वझिरे व तेल्हा-यासाठी सहायक अधिकारी म्हणून समाधान सोनवणे यांना जबाबदारी देण्यात आली आहे.

## संत तुकाराम महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस साजरा



**अकोट :** श्री संत तुकाराम महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय किनखेड (पूर्णा) येथे. देशाचे माजी राष्ट्रपती व थोर शास्त्रज्ञ ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंती दिन पूर्ण भारतभर वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात येत असतो व याच कार्यक्रमचे आयोजन शिक्षण संकुलामध्ये करण्यात करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य देवानंद गावंडे यांनी भूषविले तर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्वेक्षक प्रा. संतोष वाघ यांनी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होते. सर्वप्रथम डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम म्हणजेच भारताचे माजी राष्ट्रपती थोर शास्त्रज्ञ संत तुकोबाराय यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवराच्या हस्ते करण्यात आले दीप प्रज्वल करून वाचन प्रेरणा दिन या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तर प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा संध्या खोले, प्रा राधिका इंगोले , प्रा सचिन देवर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संघपाल खंडेराव यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. सचिन बाळापुरे यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.राहुल खंडारे प्रा. मोहन देऊळकार प्रा.प्रकाश जांभळे , प्रा. गजानन तराळे क.म.वी प्रयोगशाळा सहाय्यक उमेश पहुरकर व जयाताई गावंडे इत्यादींनी सहकार्य केले. वाचन प्रेरणा दिन या कार्यक्रमानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. यामध्ये खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. विज्ञान विषय समूह व गणित विषय समूहाची स्थापन करण्यात आली. कार्यक्रमास विद्यार्थी उपस्थित होते.

## लोहारी खु. येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

■ प्रतिनिधी | अकोट ■



महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय व आवड निर्माण करण्यासाठी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन १५ ऑक्टोबर हा 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतलेला आहे. डॉ. कलाम हे एक महान वैज्ञानिक, लेखक आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी विद्यार्थ्यांना नेहमी वाचन, ज्ञान आणि स्वप्न पाहण्याची प्रेरणा दिली.

अकोट पंचायत समिती अंतर्गत जि. प. व. प्राथ शाळा लोहारी खु येथे डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या दिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी मिळून वाचनाचे महत्त्व जाणून घेतले. कार्यक्रमाची सुरुवात भारताचे माजी राष्ट्रपती व महान वैज्ञानिक भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक नितीन धोरण यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, 'डॉ. कलाम यांनी वाचन आणि शिक्षणाला दिलेले महत्त्व आजच्या प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या जीवनात अंगीकारले पाहिजे.' यानंतर विद्यार्थ्यांनी वाचन स्पर्धा आणि प्रेरणादायी पुस्तकांचे वाचन सत्र आयोजित केले. सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी विविध प्रेरणादायी पुस्तकांचे वाचन करत आदरांजली वाहिली. याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जपण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक नितीन धोरण, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश वानखडे, सहाय्यक शिक्षक भास्कर भुरके, सोनाली उज्जैनकर, रुपाली ढवळे, सोनाली निचळ, पोषण आहार कर्मचारी भूजिंगराव इंगळे व सर्व व्यवस्थापन समिती सदस्य आदींनी परिश्रम घेतले.

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८६४/२०२५ — प्रोसेस नं.१६९८३/२०२५
चौ.ता. २५/११/२०२५ — दिनांक : ०८/१०/२०२५

**अर्जदार :** १. अजाबराव उत्तम इंगळे रा. मु. पो. खरप बु. ता. जि. अकोला. २. प्रभावती देविदास गवई रा. मु. शिवर, पो. शिवणी, ता. जि. अकोला. ३. अंतकला विश्राम वाकोडे रा. मु. सातारगाव, पो. मनारखेड, ता. बाळापूर जि. अकोला. ४. शेषराव उत्तम इंगळे रा. मु. पो. खरप बु. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. उत्तम सिताराम इंगळे २. पार्वताबाई उत्तम इंगळे
**पत्ता :-** रा. खरप बु. अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत उत्तम सिताराम इंगळे यांचे दि. १५/०८/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत पार्वताबाई उत्तम इंगळे यांचे दि. २५/०२/२०२२ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८५३/२०२५ — प्रोसेस नं.१७३५२/२०२५
चौ.ता. १९/११/२०२५ — दिनांक : १५/१०/२०२५

**अर्जदार :** १. तुकाराम बकाराम सहारे २. राजु बकाराम सहारे ३. अशोक बकाराम सहारे ४. संतोष बकाराम सहारे क. १ ते ४ रा. मासा, ता. जि. अकोला. ५. रत्नकला महादेवराव शेंद्रे रा. कोठारी वाटिका क. ५, गणपती मंदिराजवळ, खडकी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : बकाराम पांडुरंग सहारे
**पत्ता :-** रा. मासा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बकाराम पांडुरंग सहारे यांचे दि. २०/०६/२००४ रोजी मासा, ता. जि. अकोला येथे निधन झाले. आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/१० / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**05R 20 प्रमाणे**
**अकोला येथील वि. ०८ वे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांच्या न्यायालयात**
**'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'**
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५)
अनुसूची एक, परिशिष्ट ब,क्र. २

दावा रु. /- — आर.सी.एस.कं. ९०७ / २०१२
चौ. ता.: ०४ / ११ / २०२५

**किशोर ... वि .... कमिशनर**

**बनाम :- अशोककुमार गोपालदास लोहाणा**
रा. फलॅट नं. २०२ ब्रम्हचैतन्य अपार्टमेंट एस. बी. आय. कॉलनी जवळ जठारपेठ अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी 'SUIT FOR PERMANENT AND MANDATORY INJUNCTION' यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक ०४ / ११ / २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पुष्ट्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दिनांक १४/१०/२०२५ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व. स्तर.), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७४४/२०२५ — प्रोसेस नं.१६५६३/२०२५
चौ.ता. ३०/१०/२०२५ — दिनांक : ०१/१०/२०२५

**अर्जदार :** १. वंदना संतोष लंगोटे रा. अंध विद्यालय रोड, मलकापूर ग्रामपंचायत मागे मलकापूर अकोला ता. जि. अकोला. २. अमृता संतोष लंगोटे रा. अंध विद्यालय रोड, मलकापूर अकोला ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : संतोष वासुदेव लंगोटे
**पत्ता :-** रा. अंध विद्यालय रोड, मलकापूर ग्रामपंचायत मागे मलकापूर अकोला.ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संतोष वासुदेव लंगोटे यांचे दि. ११/०९/२०२४ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला**

**मुर्तिजापूर रोड, अकोला - ४४४००१**
**वेब पत्ता** : mjp.maharashtra.gov.in
**ई-मेल** : eemjpda@rediffmail.com

जा.क्र./निविदा/२५०५/ २०२५ — दिनांक : १६/१०/२०२५

**निविदा सुचना**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला या कार्यालयाकडुन खालील निविदा सुचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | निविदा सुचना क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत (रुपये) |
| --- | --- | --- | --- |
| १ | क्रमांक ३४ सन २०२५-२६ | जल जीवन मिशन अंतर्गत तेल्हारा ६९ गावे प्रादे. पा.पु. योजना जलशुध्दीकरण केंद्र येथील विद्युत पुरवठयाकरीता आवश्यक L. T. पोल, केबल व आवश्यक साहित्य पुरविणे. | रु.८,४३,४७६/- |

या उपरोक्त सर्व कामांची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडुन मागविण्यांत येत आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. १७.१०.२०२५ पासुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला येथील निविदा शाखेत पाहण्यास निशुल्क उपलब्ध आहेत.

**कार्यकारी अभियंता**
म.जी.प्रा. विभाग, अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३१९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# सखोल गृहपाठ आणि परिश्रमातून उत्तम छायाचित्रण करता येते

## ज्येष्ठ छायाचित्रकार संगीता महाजन

### माहिती व जनसंपर्क विभागाची विभागस्तरीय छायाचित्रण कार्यशाळा

**वर्धा/जनमाध्यम**

शासकीय योजना, उपक्रम जनतेपर्यंत पोचवणारा छायाचित्रकार हा शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा असतो. त्यामुळे सखोल गृहपाठ आणि परिश्रम यातून छायाचित्रण करणे गरजेचे आहे.आपल्या व्यवसायाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी सतत मेहनत करावी, अशा शब्दात ज्येष्ठ छायाचित्रकार संगीता महाजन यांनी मार्गदर्शन केले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर संचालक कार्यालयातर्फे विभागाच्या नागपूर व अमरावती विभागातील शासकीय छायाचित्रकारांसाठी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या प्रसंगी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. नागपूर -अमरावती विभागाचे संचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे अध्यक्षस्थानी होते.



छायाचित्रकार हा विचार शक्तीनुसार कॅमेराची कळ दाबून उत्तमोत्तम छायाचित्र चित्रित करीत असतो. सृजनशील व संवेदनशील छायाचित्रकारीतेसाठी दृष्टिकोन असावा लागतो व तो वाचन, निरीक्षण व सतत अभ्यासाने तयार होतो. शासकीय छायाचित्रकारांची विश्वसनीयता आणि जबाबदारीचे महत्व समजावून सांगताना वेळेत उपस्थित राहणे, आवश्यक साधन सामुग्री बाळगणे, शिस्त व नम्रता, निवडक छायाचित्रांची निवड व साठवण याबाबत माहिती दिली. छायाचित्रातील अचूक कॉम्पोजिंग व सिमीट्री यासोबतच कॅमेरा अँगलस, प्रकाशाच्या विविध छटा, रूल ऑफ थर्ड, डेफ्थ ऑफ फिल्ड, आयएसओ, अपार्चर, लेन्स आदी तांत्रिक बाबींवर विविध छायाचित्रे व सादरीकणाद्वारे महाजन यांनी मार्गदर्शन केले. तत्पूर्वी, संचालक डॉ. गणेश मुळे यांनी कार्यशाळे मागील भूमिका सांगताना छायाचित्रकार हा समाजाचा महत्वाचा घटक असल्याचे सांगून शासनात छायाचित्री कारीते च्या विविध अंगांचे महत्व उदाहरणासहीत विशद केले. सहायक संचालक पल्लवी धारव यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. या कार्यशाळे त नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, अमरावती, यवतमाळ या जिल्ह्यातील शासकीय छायाचित्रकार उपस्थित होते.

## माणुसकीचे मूल्य टिकवण्यासाठी साहित्य आवश्यक- प्रा.सावरकर

**वर्धा/जनमाध्यम**

भारत हा विविधतेने नटलेला देश असून या विविधतेतील संस्कृतीचे संवर्धन साहित्यातून झाले, तर पुढील पिढ्यांसाठी तेच खरे मार्गदर्शन ठरेल, असे विचार पुस्तकदस्ती चळवळीचे प्रणेते आणि बालवाचन संस्कृती संवर्धक प्रा. सचिन सावरकर यांनी व्यक्त केले.



नागपूर येथील साहित्य विहार संस्थेतर्फे आयोजित दोन दिवसीय 'बालकुमार संवाद साहित्य संमेलनाचे' ते उद्घाटक म्हणून बोलत होते. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध व्यासंगी लेखिका डॉ. मनीषा यमसनवार होत्या. व्यासपीठावर प्रसिद्ध कथा लेखक डॉ. श्रीकांत गोडबोले, कथालेखिका डॉ. संध्या पवार आणि संस्थेच्या अध्यक्षा आशा पांडे उपस्थित होत्या. प्रा. सावरकर पुढे म्हणाले, आज जीवनातील गौण गोष्टींवर लक्ष केंद्रीत केल्याने माणूस आनंदापासून दूर जातो. समाजनिर्मितीत शिक्षण आणि साहित्य या दोन्ही घटकांचा सिंहाचा वाटा असून त्यांचा संगम होणे गरजेचे आहे. शालेय स्तरापासून हे एकात्मिक शिक्षण साधले, तर सुसंस्कृत व राष्ट्राभिमानी पिढी घडेल. नवोदित साहित्यिकांनी माणूस हा केंद्रबिंदू ठेवून लेखन केल्यास त्यातून शाश्वत मूल्य निर्माण होईल.संमेलनाचे प्रास्ताविक संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. माधुरी वाघ यांनी केले, तर आभार प्रदर्शन संस्थेच्या सचिव मंदा खंडारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. तुषार झाडे, रेखा ढोले, सुजाता काळे, अशोक डोळस, विजय हरदास, जितेंद्र पटवर्धन आणि नीता वरणकर यांनी परिश्रम घेतले.

## गीताई मंदिरात विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी सहप्रवास- डॉ.गिरीश ठाकरे

**वर्धा/जनमाध्यम**

यशवंत महाविद्यालय, वर्धा यांच्या भाषा विभागातर्फे आज एक आगळीवेगळी शैक्षणिक सहल घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी कमलनयन बजाज ट्रस्टद्वारा निर्मित गीताई मंदिर संकुलाला भेट देत ज्ञान, संस्कृती आणि अध्यात्माचा अनुभव घेतला. ही सहल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गिरीश ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली.




प्राचार्य डॉ. ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शैक्षणिक सहली केवळ माहितीपुरत्या मर्यादित नसतात, तर त्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातही महत्त्वाची भूमिका बजावतात. अशा सहलीतून विचारांची दिशा आणि जीवनमूल्यांची जाणीव विकसित होते, असे त्यांनी नमूद केले.या आयोजनात डॉ. संजय धोटे आणि डॉ. प्रमोद नारायणे यांनी समन्वयक म्हणून मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमास मराठी विभाग प्रमुख डॉ. एन.एच. खोडे, डॉ. दीपक महाजन, तसेच इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. माधुरी सिडाम उपस्थित होते.गीताई मंदिरात विद्यार्थ्यांचे स्वागत मंदिराचे व्यवस्थापक राजीव अर्जापुरे आणि प्रशासकीय अधिकारी अनिल देशमुख यांनी केले. अर्जापुरे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, गीताई मंदिर हे विनोबा भावेंच्या जीवनदर्शनाचे सजीव प्रतीक असून येथे शांतता आणि आत्मचिंतनाचा अनुभव घेता येतो.देशमुख यांनी गीताई मंदिराच्या स्थापनेपासून ते सामाजिक-आध्यात्मिक योगदाना पर्यंत विविध माहिती दिली. त्यांनी नमूद केले की, येथे साधेपणा, सेवा आणि सत्य हाच जीवनाचा मूलाधार आहे. विद्यार्थ्यांनी या सहलीदरम्यान विनोबा दर्शन केंद्र, विनोबा जीवनचित्र प्रदर्शन, गांधी विचार परिषद, जमनालाल बजाज स्मारक आणि विश्वशांती स्तूप यांना भेट दिली. सहलीचा उद्देश विद्यार्थ्यांत गांधी-विनोबा विचारांची ओळख आणि सांस्कृतिक भान निर्माण करणे हा होता. सहलीचे संचालन वैष्णवी गोहणे यांनी केले, तर मृणाली कोकाटे यांनी गीताई मंदिर ट्रस्टच्या वतीने आभार मानले.सहलीचा समारोप सामूहिक प्रार्थनेने झाला. पवित्र आणि प्रेरणादायी वातावरणात विद्यार्थ्यांनी ही सहल संस्मरणीय ठरवली. कार्यक्रमास प्रा. नीलम ठवसे, डॉ. अभिजीत वाघाडे, प्रा. अमित पोहणकर, प्रा. कल्याणी टेभरें, प्रा. हिमांशु ढोके, प्रा. प्रणाली कापसे, प्रा. प्रशिक थुल, प्रा. रमाकांत चव्हाण, प्रा. आचल चव्हाण, प्रा. नुतन महाजन तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## आरक्षणाने बिघडले समीकरण, ओबीसी पुढाऱ्यांचा हिरमोड

**साहूर/जनमाध्यम**

जिल्हा परिषदेच्या गटगणांच्या आरक्षण सोडतीने



राजकीय मैदानात एकच खळबळ उडाली आहे. ओबीसी वर्गातील इच्छुक उमेदवारांची स्वप्ने चक्क भंगली असून साहूर जिल्हा परिषद सर्कल एसटीकरिता राखीव ठरल्याने जुन्या पुढाऱ्यांचे गणित कोलमडले आहे.आष्टी पंचायत समितीच्या सहा सदस्यांसाठी झालेल्या आरक्षण सोडतीनंतर साहूर सर्कल एसटींसाठी राखीव ठरली, तर माणिकवाडा सर्कल एसटी महिलांसाठी राखीव झाली आहे.

साहूर पंचायत समिती सर्कल मात्र ओपन ठेवण्यात आली असली तरी अपेक्षेप्रमाणे आरक्षण न मिळाल्याने ओबीसी उमेदवारांचा उत्साह गडद निराशेत बदलला आहे. राजकीय रणांगणात भाजप, काँग्रेस, शिवसेना आदी पक्षांतील संभाव्य दावेदारांचे समीकरण पूर्णपणे उलटले आहे. गेल्या काही दिवसांपासून आरक्षणाच्या घोषणेकडे लागलेले लक्ष सोडतीनंतर क्षणातच मावळले, अनेक गावांतील राजकीय पुढारी कोमात गेल्याची चर्चासुद्धा रंगू लागली आहे.दरम्यान, एसटी उमेदवारांमध्ये आनंदाचे वातावरण असून नव्या चेहऱ्यांच्या शोधासाठी पक्षांमध्ये बैठका, रणनीती आणि गुप्त सत्रांची लगबग सुरू झाली आहे. मात्र आरक्षणाने झालेल्या या धक्क्याने जिल्हा परिषद निवडणुकीचा रंग काहीसा फिका झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

## वर्धा पोलिसांची धडाकेबाज कारवाई

### एक किलो गांजा जप्त

### पथकाने अवैध विक्री करणाऱ्या तरुणास अटक

**वर्धा/जनमाध्यम**

शहरातील गुन्हे प्रगटीकरण पथकाने अवैध अमली पदार्थ विक्रीस आळा घालत एक मोठी कारवाई केली असून, एका तरुणाला गांजासह अटक करण्यात आली आहे.



या कारवाई दरम्यान पोलिसांनी १ किलो ३४ ग्रॅम वजनाचा गांजा आणि सुमारे दीड लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून १४ ऑक्टोबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास बजाज सायन्स कॉलेज समोरील रोडवर पोलिसांनी छापा टाकला. यावेळी रूपेश घनश्याम उईके (वय २४, रा. बुरड मोहल्ला, वर्धा) हा सुझुकी ॲक्सेस १२५ या मोपेडच्या डिकीत प्लास्टिक पिशवीत गांजा ठेवून विक्रीसाठी तयारीत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तत्काळ त्याला अटक केली.ही कार्यवाही पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय अधिकारी प्रमोद मकेश्वर आणि पोलीस निरीक्षक संतोष ताले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. छाप्यात उपनिरीक्षक शरद गायकवाड, अंमलदार गजेंद्र धार्मे, राजेश राठोड, अभिजीत वाघमारे, सुरज जाधव, योगेश ब्राम्हण व राजेश दहाळ यांनी सहभाग घेतला.अटक आरोपी रूपेश उईकेवर यापूर्वीही विविध कलमांन्वये गुन्हे नोंद असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. शहर परिसरात अमली पदार्थ विक्री करणाऱ्या आरोपींवर प्रभावी कारवाई करून पोलिसांनी प्रतिबंधात्मक यश मिळवले आहे.

## रेती तुटवड्याचा खेळ थांबवा

### रेतीघाट वेळेत सुरू न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

### निखिल सातपुते यांचे प्रशासनाला आव्हान

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात गेली पाच वर्षे सुरू असलेला कृत्रिम रेती तुटवड्याचा खेळ थांबवावा, अन्यथा रस्त्यावर उतरू असा इशारा जय महाराष्ट्र युवा संघटनेचे



जिल्हाध्यक्ष निखिल सातपुते यांनी प्रशासनाला दिला आहे.

ट्रक चालक-मालक संघटनेच्या वतीने त्यांनी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले.वर्धा जिल्ह्यात एप्रिल-मे महिन्यातच रेतीघाट सुरू करून जूनमध्ये बंद करण्यात येतात. त्यामुळे कृत्रिम रेती तुटवडा निर्माण होतो आणि सामान्यांना अवाजवी दराने निकृष्ट रेती खरेदी करावी लागते. मातीमिश्रित गुणवत्ताहीन रेतीमुळे बांधकाम खर्च दोन ते तीन लाखांनी वाढल्याने सामान्य गृहस्वामी त्रस्त झाले आहेत.प्रशासनाचे काही अधिकारी आणि कर्मचारी जाणूनबुजून रेतीघाटांच्या लिलाव प्रक्रियेत अडथळे निर्माण करत असल्याचे आरोप या निवेदनात करण्यात आले. शासनाच्या गौ खनि १०/०१/२५ प्र क्र ०५/खा-१ परिपत्रकानुसार सर्व प्रक्रिया वेळेत पूर्ण कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. दप्तरदिरंगाईत कुणाचा हात असल्यास जय महाराष्ट्र युवा संघटना, ट्रक मालक, लोहा-सिमेंट विक्रेते, अभियंते आणि कामगार यांच्या सहकार्याने ठिय्या आंदोलन छेडले जाईल, असा इशारा सातपुते यांनी दिला.या वेळी दिलीप नाईक, अविनाश काकडे, अमोल रामटेके, गौरव पाटील, मंगेश भोंगाडे, अमर बेलगे, सचिन मेश्राम, विकी थोरात, अक्षय बुरांडे आदी उपस्थित होते.

## जनआरोग्य योजनेंतर्गत सर्व शिधापत्रिका धारकांना ५ लाखापर्यंतचे उपचार विनामुल्य

**वर्धा/जनमाध्यम**

एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत सर्व शिधा पत्रिकाधारकांना ५लक्ष पर्यंत चा उपचार, शस्त्रक्रियांचा आरोग्याचा लाभ उपलब्ध होणार आहे. या योजनेचा रुग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेचे लाभार्थी केशरी शिधापत्रिकाधारक, पिवळे, अंत्योदय, अन्नपूर्णा शिधापत्रिकां धारक तसेच योजनेत सफाई कर्मचारी, दिव्यांग, वृद्ध, तृतीयपंथी, शासकीय व निम शासकीय आश्रम शाळेतील बालक, महिला, वृद्धाश्रमातील वृद्ध, रस्त्यांवरील कामगार देखील योजनेचे लाभार्थी आहेत. योजनेचा लाभ घेण्याकरिता आयुष्मान गोल्डन कार्ड असणे आवश्यक आहे. गोल्डन कार्ड आशा, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत ऑपरेटर व आपले सेवा सरकार केंद्रावर काढून दिले जातात.जिल्ह्यात एकत्रित आयुष्मान भारत व महात्मा ज्योतिराव फुले योजनेंतर्गत आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी,कस्तुरबा हॉस्पिटल सेवाग्राम, डॉ.लोढा ऑर्थोपेडीक हॉस्पिटल हिंगणघाट, अरिहंत डायलिसिस सेंटर हिंगणघाट, डॉ. कटारिया मल्टि हॉस्पिटल हिंगणघाट, लक्ष्मी हॉस्पिटल वर्धा,डॉ.पाटील ऑर्थोपेडीक हॉस्पिटल वर्धा, डॉ. घागरे ऑर्थो कारंजा, श्री मल्टि हॉस्पिटल वर्धा,डॉ.राणे ऑर्थोपेडीक हॉस्पिटल आर्वी, जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा, उपजिल्हा रुग्णालय आर्वी, उपजिल्हा रुग्णालय हिंगणघाट, ग्रामीण रुग्णालय कारंजा, सेलू, आष्टी, वडनेर, देवळी, भिडी, पुलगाव, समुद्रपूर असे एकूण २१ रुग्णालये जिल्ह्यात योजनेंतर्गत अंगीकृत आहेत. रुग्णालयात दाखल होतांना मुळ आधारकार्ड, आयुष्मान कार्ड, राशनकार्ड सोबत आणणे आवश्यक आहे. नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी सरकारी रुग्णालय, ग्रामपंचायत व आपले सेवा सरकार केंद्रावर जाऊन आयुष्मान कार्ड काढण्याचे आवाहन जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### तडीपार आरोपीला ठोकल्या बेड्या

**वर्धा** - तडीपार करण्यात आलेल्या मनोज हरीचंद पाला रा. कंजर मोहल्ला, इतवारा याला पोलिसांनी रात्रीच्या सुमारास स्थानिक सोशालिस्ट चौक येथून ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध वर्धा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. हा आरोपी हद्दपार झाल्यापासून नेहमीच नियमांचे उल्लंघन करून शहरात येतो व घरी वास्तव्याला राहतो. अनेकदा त्याच्या घराची पोलिसांनी तपासणी केली; पण तो सापडला नव्हता. आता मात्र शहराच्या मुख्य चौकातच तो पोलिसांच्या हाती लागल्याने त्याच्याकडे चौकशी करण्यात आल्याचे कळते.

### जुन्या वादातून एकाला मारहाण

**आर्वी** - जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी दोघांनी एकाला संगणमत करून मारहाण केली. ही घटना आर्वी येथील लकडगंज परिसरात घडली. याप्रकरणी आर्वी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजय श्यामसुंदर पुरोहित रा. गणपती वॉर्ड, आर्वी हे आर्वी शहरातील लकडगंज भागात दुर्गामूर्ती विसर्जन मिरवणूक बघत होते. दरम्यान तेथे हनीत तावयनी, मंगेश शिरपूरे व त्यांचा एक साथीदार आला. त्यांनी जुन्या कारणावरून वाद करून विजय पुरोहित यांना मारहाण करून जखमी केल्याचे तक्रारीत नमुद असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी आर्वी पोलिसांनी जखमीच्या तक्रारीवरून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### दारूविक्रीस मनाई करणाऱ्यांवर हल्ला

**पुलगाव** - दारूविक्री करण्यास मनाई आहे, असे म्हणताच संगनमत करून दोघांनी कुऱ्हाडीने वार करून एकास जखमी केले. ही घटना सोनोरा (ढोक) येथे घडली. याप्रकरणी तक्रारीवरून पुलगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रवींद्र ढोक (४७) असे जखमीचे नाव आहे. तर रोहित नारनवरे आणि विशाल नारनवरे दोन्ही रा. सोनोरा (ढोक) ता. देवळी अशी आरोपींची नावे आहेत. रवींद्र ढोक हे शेतातून घरी जात असताना रोहित व विशाल हे घराजवळ रोडवर दारूविक्री करण्याचा प्रयत्न करीत होते. यावर रवींद्रने त्यांना मनाई केली असता रोहित व विशालने कुऱ्हाडीने तसेच काठीने मारहाण करून त्यास जखमी केले.

### अज्ञात चोरट्यांनी सेट्रिंगच्या प्लेटा चोरून नेल्या

**सेलू** - क्षीरसमुद्र शिवारातून अज्ञात चोरट्यांनी सेट्रिंगच्या १० प्लेटा चोरून नेल्या. ही घटना रात्रीच्या सुमारास घडली. क्षीरसमुद्र शिवारात सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी ९२ लोखंडी प्लेटा ठेवल्या होत्या. दरम्यान, अज्ञात चोरट्याने त्यातील १० प्लेटा चोरून नेल्या. यात २० हजार रुपयांचे नुकसान झाले. या प्रकरणी प्रवीण ढोले याच्या तक्रारीवरुन सेलू पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### लहानूजीनगरातून कार पळविली

**तळेगाव (शा. पंत)** - घरासमोर ठेवलेली कार अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना लहानूजीनगर येथे घडली. शंतनू कडू (५४) रा. लहानूजीनगर यांनी त्यांच्या मालकीची कार घरासमोर ठेवली होती. रात्रीदरम्यान, अज्ञात चोरट्याने कार चोरून नेली. घरी लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे पाहिले असता अज्ञात इसम तळेगाव हायवेने कार नेताना दिसून आला. तक्रारीवरून तळेगाव पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### अपघातात मजूराचा मृत्यू

**गिरड** - घराचे काम करताना खाली पडून डोक्याला मार लागल्याने मजुराचा मृत्यू झाला. ही घटना आर्वी येथे घडली. विलास बारेकर (५३) रा. आर्वी, असे मृतकाचे नाव आहे. विलास बारेकर हा हातबैले यांचे घराच्या कामावर होता. दरम्यान, पाय घसरून पडल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. यातच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी गिरड पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### दारूच्या नशेत इसमाचा मृत्यू

**वर्धा** - दारुच्या नशेत खाली पडून इसमाचा मृत्यू झाला. ही घटना आलोडी येथे घडली. शंकर कुमरे (४६) रा. आलोडी, असे मृतकाचे नाव आहे. शंकर कुमरे याला दारुचे व्यसन होते. तो घरी एकटाच राहत होता. दरम्यान, दारुच्या नशेत खाली पडून त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### राष्ट्रीय महिला किसान दिनानिमित्त महिला शेतकऱ्यांचा गौरव

**वर्धा**-जिल्ह्यातील महिला किसान अधिकार मंचच्यावतीने राष्ट्रीय महिला किसान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सेलू तहसीलातील आमगाव जंगली, सुकळी स्टेशन तसेच देवळी तालुक्यातील ममदापूर, दरने टाकळी व पिंपळगाव लुटे येथे विविध कार्यक्रम घेण्यात आले. महिलांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाचा गौरव करत त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. या आयोजनासाठी वैशाली खैरकार, रामेश्वर मसराम,चंद्रकांत भोंगाडे, पंढरी नगराळे व वैशाली सावरकर यांनी पुढाकार घेतला.ग्रामीण महिलांची शेतीतील मेहनत आणि नेतृत्व अधोरेखित करणारा हा कार्यक्रम ठरला.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३१७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## जाहीरात

**- पाहिजेत -**

**श्री.सारडा एज्युकेशन सोसायटी (ट्रस्ट) द्वारा संचालित**
**(भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त)**
**श्रीमती राधाबाई सारडा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, अंजनगांव सुर्जी**
**मान्यता २००८-०९ विना अनुदानित खालील पदे भरणे आहे.**

| अ. क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता | पदे | संवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक | M.Sc.(Phy.) B.Ed. | 01 | खुला |
| 2. | | M.Sc.(Che.) B.Ed. | 01 | |
| 3. | | M.Sc.(Bio.) B.Ed. | 01 | |
| 4. | | M.Sc.(Math) B.Ed. | 01 | |
| 5. | | M.A.(Marathi, English) B.Ed. | 01 | |

वरील पदाकरीता शैक्षणिक पात्रता शासकीय नियमानुसार राहील. पात्र उमेदवारांनी मुलाखतीस दिनांक ०४.११.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अर्ज तसेच मूळ प्रमाणपत्र व झेरॉक्स प्रतिसह **श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगांव सुर्जी** येथे स्वखर्चाने उपस्थित रहावे.

**अध्यक्ष / सचिव,**
**श्री.सारडा एज्युकेशन सोसायटी (ट्रस्ट)**
**अंजनगांव सुर्जी**

**प्राचार्य**
**श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगांव सुर्जी**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२३३९/२०२५
**इंदिरा -वि- अनिता**
पुढील ता.२६.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. इंदिरा पांडुरंग उर्फ देविदास खंडारकर, वय ७६ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.जुनी वस्ती रहाटगांव, ता.जि.अमरावती
२. रमा मोहन चावके, वय ६२ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. वनमाला दिपकराव आस्कर, वय ४९ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.सुरवाडी, ता.तिवसा, जि.अमरावती
४. सुनिता अविनाशरावजी लक्षणे, वय ५१ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.पंचशिल चौक, हिंगणा रोड, नागपूर
५. राजेंद्र पांडुरंग उर्फ देविदास खंडारकर मयत तर्फे वारस
   अ) वनिता राजेंद्र खंडारकर, वय ४७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
   ब) महेश राजेंद्र खंडारकर, वय २१ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
   क) गायत्री राजेंद्र खंडारकर, वय १९ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
   अ ते क रा.रहाटगांव, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत पांडुरंग उर्फ देविदास शामरावजी खंडारकर** यांचे दिनांक **३१.०३.२०१९** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार इंदिरा पांडुरंग उर्फ देविदास खंडारकर व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **इंदिरा पांडुरंग उर्फ देविदास खंडारकर व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१३.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## निविदा

**विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती या ईमारतीच्या दुरुस्तीकरीता/डागडुजीचे काम करण्याकरीता पात्र कंत्राटदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.**

**कामाचे स्वरुप** - कार्यालय प्रमुख यांचे कक्षाचे दुरुस्ती करणेबाबत

**कामाची अंदाजित रक्कम** - रु.७,२४,०७५/-

**काम पूर्ण करण्याचा कालावधी** - माहे १५ डिसेंबर, २०२५ अखेर (२ महिने)

**टिप -**

कंत्राटदाराने पात्रता व अनुभवाचे दाखले जोडून काम मागणीचा अर्ज स्वहस्ताक्षरात मर्यादा कोटेशनसह दिनांक २४ ऑक्टोबर, २०२५ रोजी बंद पाकिटात कार्यालय, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती, सहकार संकूल, कांता नगर, अमरावती येथे सकाळी ११.०० ते ३.०० वाजेपर्यंत सादर करावेत.

**दिनांक १५/१०/२०२५**

**विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३८९/२०२५
**श्रीमती पुष्पा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२५.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Pushpa Vinayakrao Pelagade, Age 62 Yrs. Occu.: Housewife
2. Swapnil Vinayakrao Pelagade, Age 38 Yrs. Occu.: Business
3. Bharat Vinayakrao Pelagade, Age 32 Yrs. Occu.: Business
   All R/o Near Arjun Nagar, Shrihari Nagar, Amravati. Tq.Dist.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **विनायक लक्ष्मणराव पेलागडे** हे दिनांक 24.12.2024 रोजी **चिंचवड, जि.पुणे** येथे मयत झाले. अर्जदार **पुष्पा अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पुष्पा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १४.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ४१**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

**मा.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**कि.आर.एम.जे.सी.अर्ज क्र.२५६/२०२५** **ने.ता.१३.११.२०२५**

**अर्जदार :-**
१. **आत्माराम किसन शिरभाते**
२. **सुरेश किसनराव शिरभाते,**
   दोघेही रा.मंगरुळ च.,ता.नांदगाव खंडे, जि.अमरावती
३. **अनिल किसनराव शिरभाते,**
   रा.पोलिस मित्र कॉलनी, लोहारा, जि.यवतमाळ
४. **अशोक किसनराव शिरभाते,**
   रा.हरिराम नगर, दारव्हा, ता.दारव्हा, जि.यवतमाळ
५. **गणेश किसनराव शिरभाते,**
   रा.दर्डा नगर रोड,९,राधिका लेआउट वडगाव, जि.यवतमाळ

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी **किसन शिवराम शिरभाते यांचा मृत्यू दि.०९.०६.२०१० रोजी मंगरुळ चव्हाळा,** ता.नांदगाव खंडे, जि.अमरावती येथे झाला. मयताचे पत्नी नामे नर्मदा किसन शिरभाते यांचा मृत्यू दि. २८.०८.२०११ रोजी मंगरुळ चव्हाळा, ता.नांदगाव खंडे, जि.अमरावती येथे झाला आहे. मयतांचे अ.क्र.१ ते ५ ही मुले आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ०३ ऑक्टोबर २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहा.अधीक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

**( C.J.J.D.) मा.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**कि.आर.एम.जे.सी.अर्ज क्र.२४०/२०२५** **ने.ता.३०.०९.२०२५**

**चंद्रकांत // वि // निरंक**

१. **चंद्रकांत नारायण कोटांगळे,**
   रा.वरखंडे चाळ जुनागाव ठाणे, ता.जि.ठाणे
२. **गजानन नारायण कोटांगळे**
   रा.दाभा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि // निरंक**

ज्याअर्थी **सखुबाई नारायण कोटांगळे** यांचा मृत्यू दि.२१.०८.२०१७ रोजी दाभा, ता.नांदगाव खंडे, जि.अमरावती येथे झाला असुन ते तेथीलच **मुळ रहिवासी होते.** अ.क्र.१ ते२ ही मयत यांची मुले आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक २५ ऑगष्ट २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६४८/२०२५ ने.ता.२९/११/२०२५

**अर्जदार -**
१. **श्रीमती प्रियंका मनोज बक्कार,** वय ३१ वर्षे, धंदा - घरकाम
२. **ओजस मनोज बक्कार,** वय ०१ वर्ष
   अर्जदार नं.२ करिता अ.पा.क.आई अर्जदार नं.१
३. **सुमन ज्ञानेश्वरराव बक्कार,** वय ६४ वर्षे, धंदा - घरकाम
   सर्व रा.खेड, ता.मोशी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन** २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पति तर अर्जदार नं.२ चे वडिल तर अर्जदार नं.३ चा मुलगा नामे मनोज ज्ञानेश्वरराव बक्कार **हे दिनांक १२/०३/२०२५ रोजी त्यांचे General Hospital Gadchiroli, Tq. & Dist. Gadchiroli येथे मय्यत झालेले आहे.** त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- १५.१०.२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**मा.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) अर्ज क्र.२७९/२०२५ ने.ता.१९.११.२०२५
**कासाबाई नामदेवराव उके + ४ - वि - निरंक**

**अर्जदार :**
१. कासाबाई नामदेवराव उके
२. भिमराव नामदेव उके
३. हंसराज नामदेवराव उके
   अर्जदार नं.१ ते ३ रा.वडाळा, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती
४. लता प्रवीण मेश्राम
   रा.माहुली जहांगीर, ता.जि.अमरावती
५. नलू वासुदेव बनसोड,
   रा.मोगरा. ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** **निरंक**

ज्याअर्थी मयत **नामदेव दमळाजी उके** यांचा मृत्यू दि.**२२.११.२०१६** रोजी वडाळा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला.मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी आहे व अर्जदार नं.२ ते ३ ही मुले आणि अर्जदार नं.४ व ५ ह्या मुली आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२३६३/२०२५
**विलास -वि- अनिता**
पुढील ता.२५.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. विलास पंजाबराव टाले, वय ५१ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
२. प्रभावती पंजाबराव टाले, वय ७० वर्षे, व्यवसाय - निरंक
   रा.सुशिल नगर साई नगर पो.अमरावती, ता.जि.अमरावती
३. अनिता शेषराव नेरकर, वय ५८ वर्षे, व्यवसाय - नोकरी
   रा.गायत्री नगर कौलखेड रोड, अकोला, ता.जि.अकोला
४. सिमा मनोज नांदेकर, वय ५३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
   रा.बस स्टॉप जवळ, बोरगांव मंजू, जि.अकोला

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत पंजाबराव खुशालराव टाले** यांचे दिनांक **२०.०८.२०२५** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार विलास पंजाबराव टाले व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विलास पंजाबराव टाले व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१४.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

## जाहीर नोटीस

प्रो.नं.४०१५/२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.१४/१०/२०२५

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.३९४/२०२५ ने.ता.०१.११.२०२५

**अर्जदार -**
१. **बेबीनंदा पंजाबराव उमक,** वय ६५ वर्षे, धंदा - मजुरी
   रा.साईनगर, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती
२. **संगिता अरविंद नाईक,** वय ४२ वर्षे, धंदा - मजुरी
   रा.हर्षराज कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती
३. **मिना संजय गावंडे,** वय ४२ वर्षे, धंदा - मजुरी
   रा.सांगळूद, ता.दर्यापूर, जि.अमरावती
४. **अनिल पंजाब उमक,** वय ४१ वर्षे, धंदा - मजुरी
   रा.साईनगर, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती
५. **विजु पंजाब उमक,** वय ३६ वर्षे, धंदा - मजुरी
   रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती

**गैरअर्जदार-** निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **पंजाबराव नारायणराव उमक हे दिनांक १९.०२.२०१६ रोजी मरण पावले आहे.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - मयत पंजाबराव नारायणराव उमक** यांचे नावे मौजा साईनगर गायवाडी, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे स.नं.११३/१ मधील प्लॉट क्र.८८८ क्षेत्र. १७०० चौ.मी. असून सदर प्लॉटची बाजारभावाने किंमत ५०,००० रुपये इतकी आहे.

आज दि.**१४.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय (व.स्तर), दर्यापूर

---

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी**

आर.एम.जे.सी.क्र.६५८/२५ ने.ता.०२.१२.२०२५

**अर्जदार -**
१. **श्रीमती प्रेमानंदा गंगाबिसन झंवर,** वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.प्रशांत कॉलनी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. **राहुल गंगाबिसन झंवर,** वय ३३ वर्षे, धंदा - नोकरी
   रा.रॉयल इम्पीरीओ को.ऑप.सोसायटी, रहाटनी पुणे, ता.जि.पुणे
३. **सौरभ गंगाबिसन झंवर,** वय ३२ वर्षे, धंदा - शेती व व्यापार
४. **मोहित गंगाबिसन झंवर,** वय २५ वर्षे, धंदा - शिक्षण
   दोघेही रा.प्रशांत कॉलनी,मोर्शी, ता.मोर्शी,

**-- विरुध्द --**

**निल**

वरील अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे सासरे, तर अर्जदार क्र.२ ते ४ यांचे आजोबा नामे **बालकिसन रामजीवन झंवर यांचा दिनांक ०६/०३/२०२४ रोजी रहाटणी, पिंपरी चिंचवड हवेली पुणे, ता.जि.पुणे येथे मृत्यू झाला.** तसेच मयतांचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- १६/१०/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय,क.स्तर मोर्शी

---

**मा.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) अर्ज क्र.२७८/२०२५ ने.ता.१८.११.२०२५
**कासमशा तयबशा आशकान - वि - निरंक**

**अर्जदार :**
१. कासमशा तयबशा आशकान
२. हारुनशा तयबशा आशकान

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** **निरंक**

ज्याअर्थी मयत **तयबशा जमालशा आशकान तर्फे तयबशा जमालशा फकीर** यांचा मृत्यू दि.**०७.०४.२०१९** रोजी पापळ, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला.मयतांचे अर्जदार नं.१ व २ ही मुले आहेत.मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

## जाहीर नोटीस

सर्वत्र आम जनतेस जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खालील वर्णन केलेले शेत विकत घेण्याबाबत **रजनी कैलास कुऱ्हेकर** रा.कुऱ्हा, ता.तिवसा, जि.अमरावती यांच्यासोबत खरेदी खतान्वये विकत घेण्याचा व्यवहार केला आहे. त्या स्थावर मालाचे (शेतजमीन) वर्णन येणेप्रमाणे-

नोंदणी तुकडी अमरावती पोट तुकडी तिवसा जि.प.अमरावती, पं.स.तिवसा कक्षेतील मौजे जामठी, ता.तिवसा, जि.अमरावती भूमापन क्र.व उपविभाग ५४, क्षेत्रफळ १ हे.११ आर, आ.रु.१.५३, भो.वर्ग १ या शेताची चतुःसिमा खालीलप्रमाणे--

पुर्वेस - प्रकाश किसनराव पोकळे यांचे शेत
पश्चिमेस - कुऱ्हा-तिवसा रोड
उत्तरेस - कमरुद्दीन हफिजोद्दीन यांचे शेत
दक्षिणेस - अनुप राजेश डोंगरे यांचे शेत

तरी वर उल्लेखीत शेतजमीन खरेदी खताद्वारे बक्षीसपत्राद्वारे, भाडेपट्टाद्वारे, वारसा हक्काने, विनिमयाने, कर्जाद्वारे, गहाणद्वारे, बोझाद्वारे, धारणाधिकाराने, न्यासाद्वारे, वहिवाटी अन्वये, सुविधाधिकारान्वये, जप्तीद्वारे, लिलावाद्वारे, ताबा हक्क संबंध, बक्षीस, कूळ, वारसाचा वाद असल्यास योग्य त्या मूळ दस्ताऐवजासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर सदरची जाहीर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी उजर कळवावा, अन्यथा माझे पक्षकार सदर शेताची खरेदीखत नोदून घेण्यास सक्षम व पात्र राहतील व तसेच तद्नंतर येणाऱ्या उजर वा आक्षेपास गृहित धरल्या जाणार नाही.

करीता ही जाहीर नोटीस प्रकाशित करीत आहे.

**दिनांक १६.१०.२०२५**

(ॲड.सचिन भेंडकर)
(महा-३१८/२०२४)
कार्या.पत्ता - ११-बी, शिव कॉलनी,
अंबा रोड, अमरावती
मो.९३०७७५४०५१

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२१७/२०२५
**श्रीमती शेवंती अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.१४.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Shewanti Panditrao Rathod, Age 53 Yrs. Occu.: Household
2. Sandip Panditrao Rathod, Age 32 Yrs. Occu.: Business
   Both R/o Parsoda, Tq.Dist. Amravati
3. Sau.Anita Gajanan Rathod, Age 35 Yrs. Occu.: Household
   R/o Bhilgaon, Po.Khairi Akashwani, Tq.Kamptee, Dist.Nagpur
4. Sau.Rekhabai Radheshyam Jadhav, Age 33 Yrs. Occu.: Household
   R/o Pachod, Chincholi Dange, Tq. Arvi, Dist. Wardha
5. Sau. Jyotsana Ankush Chavhan, Age 27 Yrs. Occu.: Household
   R/o Ward No.2, Bhiwapur, Tq. Teosa, Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **पंडीतराव रामू राठोड** हे दिनांक 20.07.2025 रोजी **चिंचवड, जि.पुणे** येथे मयत झाले. अर्जदार **शेवंती अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शेवंती अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी**

आर.एम.जे.सी.क्र.६५०/२५ ने.ता.२९.११.२०२५

**अर्जदार -**
१. **दिलीप झांगोजी तंबाखे,** वय ६१ वर्षे, धंदा - मजुरी
२. **सुनिल झांगोजी तंबाखे,** वय ५९ वर्षे, धंदा - मजुरी
३. **अनिलराव झांगोजी तंबाखे,** वय ५५ वर्षे, धंदा - मजुरी
   सर्व रा.खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. **व्दारकाबाई शामरावजी फाटे,** वय ७९ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. **मिना ज्ञानेश्वरराव फाटे,** वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
६. **मिना देवी पप्पु ढाकरे,** वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.सिकरारा आग्रा फतेहाबाद (उत्तरप्रदेश)

**-- विरुध्द --**

**निल**

वरील अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ ते ६ यांचे वडिल नामे **झांगोजी भानुजी तंबाखे** यांचा **दिनांक २७/१०/२०१७** रोजी खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. तसेच अर्जदार क्र.१ ते ६ यांची आई नामे **देवकीबाई झांगोजी तंबाखे हिचा दि.३०/०८/२०२५** रोजी खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. तसेच मयतांचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- १६/१०/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय,क.स्तर मोर्शी

---

**मा.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) अर्ज क्र.२७६/२०२५ ने.ता.१८.११.२०२५

**अर्जदार :** १. ज्योती राजकुमार उर्फ राजू दोनतकर

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** **निरंक**

ज्याअर्थी मयत **राजकुमार उर्फ राजू दोनतकर**यांचा मृत्यू दि.**२०.०८.२०२५** रोजी लोणी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला.मयत यांचे अर्जदार नं.१ ही पत्नी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**मा.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) अर्ज क्र.२५५/२०२५ ने.ता.३०.१०.२०२५
**रजनीश विजय घवले + २ - वि - निरंक**

**अर्जदार :**
१. रजनीश विजय घवले,
   रा.प्लॉट नं.१९ वर्धा रोड, भैयालाल वाडी, गोविंद नगर, नागपूर, ता.जि.नागपूर
२. आंचल विजय घवले
३. रणजीता अजयराव लोणारे,
   रा.प्लॉट नं.२६, वव्हारे लेआऊट, गोपाल नगर, राणाप्रताप नगर, नागापूर, ता.जि.नागपूर ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **विजय डोमाजी घवले** यांचा मृत्यू दि.**१३.१२.२०२४** रोजी अवंती हॉस्पीटल इस्टिट्यूट ऑफ कॉर्डीओलॉजी नागपूर येथे झाला.मयत **विजय डोमाजी घवले** यांचे अर्जदार नं.१ ते ३ हे मुलगा व मुलगी आहेत.मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **श्री.विलास किसनराव राठोड,** रा.वैशाली विहार, द्वारका नगर, अकोली रोड, अमरावती यांच्या मालकी व ताब्यातील मौजे बडनेरा, ता.जि.अमरावती, प्लॉट नं.८९, क्षेत्रफळ १४४ चौ.मी. (१५५० चौ.फुट), सर्वे नं.३२३ असे वर्णन केलेल्या मालमत्तेचे (प्लॉटचे) जुने खरेदीखत अनुकमे खालीलप्रमाणे आहे--

खरेदीखत क्र. १) ३४/२००१, दि.०३.०१.२००१
खरेदीखत क्र. २) २६१०/२००२, दि.०२.०८.२००२
खरेदीखत क्र. ३) ७९४/२०१०, दि.२५.०३.२०१०

असे एकुण तीन मूळ खरेदीखत स्टॅम्प सहीत झेरॉक्ससाठी नेले असतांना नागपुरी गेट चौक ते सुकळी गावात दि.०२.१०.२०२५ रोजी सायंकाळी ७.०० वाजताचे दरम्यान हरविले आहे. त्याबाबत मालमत्ताधारक श्री.विलास किसनराव राठोड यांनी दि.०८.१०.२०२५ रोजी पोलीस स्टेशन नागपुरी गेट अमरावती, ता.जि.अमरावती येथे रितसर तक्रार दाखल केलेली आहे. तसेच दस्तऐवजांचा आजपर्यंत शोध लागलेला नाही. सदर प्लॉटचे मालक यांनी युनियन बॅंक शाखा शेगांव नाका, अमरावती याच्याकडे गृहकर्ज मिळण्याकरीता मागणी अर्ज दाखल केलेला आहे. सबब वर उल्लेखीत मालमत्तेत कुणाचाही हक्क, गहाण, कर्ज, बोजा, किंवा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास ती नोटीस मिळाल्यापासून ७ दिवसात खालील पत्त्यावर संपर्क करावा अथवा आमची बॅंक कर्ज मागणी अर्ज मंजूर करुन कर्ज पुरवठा केल्यास त्यानंतर कुणाचाही उजर चालणार नाही. तरी सर्व लोकांना विनंती आहे की, वरील वर्णनीत मालमत्तेच्या खरेदीखताच्या अस्सल प्रती/दस्तऐवज कुण्याही व्यक्तिला आढळल्यास कृपया खाली नमुद मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा अथवा खाली नमुद पत्त्यावर आणून द्याव्यात..

स्वाक्षरीत/-
**ॲड.रेणुका एस.पवार,** मो.नं.९४२१८२२८०५
ॲड.रेणुका एस.कडू, मो.नं.७४९८४४५४९९
पत्ता - शिवार्पण कॉलनी, कठोरा नाका, अमरावती
ता.जि.अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३७६/२०२५
**श्री.संजय अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२१.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sanjay S/o Ratnakar Khajurkar, Age 64 Yrs. Occu.: Retired
2. Prakash S/o Ratnakar Khajurkar, Age 59 Yrs. Occu.: Business
   Both 1 & 2 R/o Kedia Nagar, Rajapeth, Amravati.
3. Kiran W/o Prakash Deshmukh, Age 62 Yrs. Occu.: Homemaker
   R/o New Pournima Darshan, Near Akshay Hospital, Manpada Road, Dombivali (East) Mumbai

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रत्नाकर काशिनाथ खजूरकर** हे दिनांक 21.09.2011 रोजी **चिंचवड, जि.पुणे** येथे मयत झाले. व मयत **ताराबाई रत्नाकर खजूरकर** ही दिनांक १३.११.२०२२ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मरण पावली. अर्जदार **संजय अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संजय अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# शेतीमाल उत्पादन ५३९ अब्ज डॉलर; निर्यात फक्त ४० अब्ज डॉलर

## महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे विपणन तज्ज्ञ सतीश वराडे यांची माहिती; कृषिमित्र प्रतिष्ठानतर्फे परिसंवाद

**अमरावती/का.प्र.**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात आजवर शेतीमालाचे उत्पादन सहा पट वाढले आहे. त्या तुलनेत लोकसंख्या चार पट वाढली आहे. परिणामी भारतीय शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवायचे असेल तर निर्यातीवर भर द्यावा लागेल. सध्या आपल्या शेतीमालाचे उत्पादन ५३९ अब्ज डॉलर तर निर्यात केवळ ४० ते ४५ अब्ज डॉलर इतकी अत्यल्प आहे. ही मोठी दरी असल्यानेच शेतकऱ्यांची आर्थिकस्थिती गेल्या अनेक वर्षांत सुधारू शकली नाही, असे परखड मत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे विपणन तज्ज्ञ (निर्यात) सतीश वराडे यांनी व्यक्त केले.



विधान परिषद सदस्य संजय खोडके व आमदार सुलभा खोडके यांच्या कृषिमित्र प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित कृषी परिसंवाद कार्यक्रमात वराडे बोलत होते. आमदार खोडके, सुलभा खोडके, शेवगा उत्पादन व मूल्यवर्धन तज्ज्ञ बसैय्या हिरेमठ, सोलापूर येथील केळी उत्पादक शेतकरी किरण डोके, उद्योग संचालक नीलेश निकम, कुत्रिम बुद्धिमत्ता तज्ज्ञ सारंग नेरकर, कृषी विद्यापीठाचे तज्ज्ञ डॉ. राजेंद्र वानखडे, महाऑरेंजचे संचालक श्रीधर ठाकरे, नरेंद्र शिंगणे, दत्ता इंगोले यांची या वेळी उपस्थिती होती.

वराडे म्हणाले, की देशात सुमारे ४ लाख ९५ हजार टन केळीचे उत्पादन होते. यातील ८० ते ८५ टक्के महाराष्ट्राचा आणि यातील ६० ते ६५ टक्के वाटा हा एकट्या सोलापूर जिल्ह्याचा आहे. त्यावरूनच केळी पिकातील संधी आपल्याला लक्षात येतात. भाजीपाला उत्पादनात देशात महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक असून १४७.५ लाख टन उत्पादनाच्या बळावर सात टक्के हिस्सा आहे. महाराष्ट्र हे फळ उत्पादनात देशात तिसऱ्या क्रमांकावर असून उत्पादकता ९९.९ लाख टन आहे. एकूण फळ उत्पादनाच्या सुमारे १२ टक्के उत्पादन राज्यात होते. नगदी पिकांत राज्याचा सहावा क्रमांक असून ३.२९ लाख टन इतके उत्पादन होते. फुल पिकांचा विचार करता दंडी विरहित ०.५७ लाख टन तर दंडीसहित फुलांचे उत्पादन ०.०००३ लाख टन इतके आहे. याद्वारे राज्य फुल उत्पादनात नवव्या क्रमांकावर आहे. जगाला मसाल्याची ओळखच भारताने करून दिली. महाराष्ट्राचा विचार करता या राज्यात सुमारे १२.२ लाख टन मसालावर्गीय पिकांचे उत्पादन होते. याद्वारे राज्य मसाले उत्पादनात ११ व्या क्रमांकावर आहे. राज्यात तीन हजारपेक्षा अधिक नोंदणीकृत शेतकरी कंपन्या आहेत. त्यांनी निर्यात क्षेत्रातील संधी ओळखत काम करण्याची गरज आहे.

ते म्हणाले, की आंतरराज्यात देखील निर्यातीला प्रोत्साहन मिळावे याकरिता पणनकडून पुढाकार घेण्यात आला आहे. त्यासाठी ३५० ते ७५० किलोमीटरपर्यंतच्या शेतीमाल वाहतुकीसाठी ५० टक्के अनुदानाची योजना राबविली जाते. १५०० ते २००० किलोमीटरपर्यंतच्या वाहतुकीकरिता देखील अनुदान देण्याची तरतूद आहे. नोंदणीकृत एफपीसों व शेतीमाल उत्पादकांच्या सहकारी संस्थांना याचा लाभ मिळतो. आंबा, केळी, डाळिंब, द्राक्षे, संत्रा, मोसंबी, कांदा, टोमॅटो, आले व भाजीपाला या सारख्या शेतीमालाकरिता वाहतूक अनुदान देण्याची सोय आहे, असेही वराडे यांनी या वेळी सांगितले कृषिमित्र प्रतिष्ठानच्या वतीने येत्या काळात शेतकऱ्यांमध्ये विविध व्यावसायिक पिकांबाबत जागृतीसाठी कार्यशाळा घेतल्या जातील, असे या वेळी खोडके यांनी सांगितले.

### पुरस्कार मिळालेल्या शेतकऱ्यांचा सन्मान

या कार्यक्रमात राज्य शासनाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल नरेंद्र शिंगणे, अरविंद तडे, पुष्पक खापरे, नामदेव वैद्य, विजय लाडोळे, रजनी रावणकर, विनय बोथरा, ममता ठाकूर, प्रवीणदास बेलखेडे, शांता धांडे या शेतकऱ्यांचा या वेळी सन्मान करण्यात आला.

# यशदिप भोगे याची एशीयन आर्चेरी स्पर्धेकरीता निवड

**अमरावती/का.प्र.**



साई सोनीपत हरियाणा येथे आयोजित एशीयन आर्चेरी स्पर्धेकरीता यशदिप संजय भोगे याची निवड करण्यात आली आहे. तो या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. ही स्पर्धा दि. ७ ते १५ नोव्हेंबर या कालावधित बांग्लादेश, ढाका येथे होणार आहे. त्याकरिता औरंगाबाद येथे साई क्रिडा संकुलन येथे सराव सुरु आहे. या अगोदर दोनदा भारतीय विद्यापिङ्ग स्पर्धेचे इटली व चिन येथे नेतृत्व केले आहे. तेव्हा तो डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचा व अमरावती विद्यापीङ्गाचा विद्यार्थी होतो. बॅकॉक येथील एशीया कप स्पर्धेत त्याने सुवर्ण पदक प्राप्त केले. राष्ट्रीय व राज्य स्तरावर देखील त्याने अनेक पदक प्राप्त केले आहे. सध्या तो रेल्वे खात्यात नोकरी करित असून २०२१ व २०२४ च्या ऑलम्पीक स्पर्धेतील सराव चाचणी करिता तो पहिल्या ८ मध्ये तो भारतातून होता.

# शिक्षकांवर ४०ॲपची सक्ती

## डिजिटल अहवाल प्रणाली आणि व्हॉट्सॲप आदेशामुळे अध्यापनावर होणारा परिणाम
## प्राथमिक शिक्षक संघटना यांची शालेय शिक्षणमंत्र्यांकडे मागणी

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील शिक्षक सध्या सुमारे ४० विविध शासकीय ॲप्स वापरत आहेत. दररोज शिक्षकांना विविध ऑनलाईन ॲप्स, लिंक, अहवाल, प्रशिक्षण आणि सर्वेक्षण यामध्ये व्यस्त राहावे लागत आहे.हे सर्व ऑप एकत्रित करुन शिक्षक मैत्रिणपूर्ण डीजिटल प्रणाली निर्माण करावी अशी मागणी प्राथमिक शिक्षक संघटना यांनी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे व शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी यांच्याकडे केली आहे.

सध्या ४०ॲप शिक्षक वापरत आहे.त्यामुळे स्वतःचे मोबाईल हॅग होत आहे.त्यामध्ये खालील प्रमुख ॲप्स आहेत सरल ,शालार्थ, यू-डायस प्लस , मध्यान्ह भोजन, प्रेरणा , प्रेरणा डीबीटी,महाडीबीटी, दीक्षा , रीड अलॉंग,निपुण प्लस,शारदा, उल्लास, समर्थ पोर्टल , कर्मयोगी, निपुण टीचर ॲप, हरितिमा, ईको क्लब, एम-आधार,उमंग , पी.एफ.एम.एस. ,महा स्कूल , प्रश्नास्त , स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण, स्विफ्ट चॅट, खान अकॅडमी, गूगल मिट, झूम, एन.आय.एल.पी., एन.बी.एम.सी. , ई-कवच , एफ.एस.एस.ए.आय., जी.पी.एस., फिट इंडिया , ज्ञान समीक्षा , प्रेरणा अहवाल पोर्टल, आणि परख इत्यादी.या सर्व ॲप्सवर शिक्षकांकडून दररोज हजेरी, विद्यार्थ्यांचे अहवाल, सर्वेक्षण,प्रशिक्षण, आणि विविध शासकीय माहिती अनिवार्यपणे भरावी लागते. तसेच विविध व्हॉट्सॲप गटांवरून २४ तास आदेश व लिंक येतात. परिणामी शिक्षकांचा अध्यापनासाठीचा वेळ अत्यल्प उरतो. ही परिस्थिती भारतीय संविधानातील कलम २१ (शिक्षणाचा अधिकार तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या उद्देशांशी विसंगत आहे. शिक्षकांचे मूळ कार्य म्हणजे अध्यापन परंतु तांत्रिक आणि प्रशासकीय कामांमुळे हे कार्य प्रभावित होत आहे.

सर्व ॲप्स एकत्र करून एक एकत्रित 'Unified Education App' तयार करावा,ऑनलाईन अहवालांची संख्या मर्यादित ठेवावी,शाळांमध्ये 'डिजिटल डेटा एंट्री सहाय्यक' पद निर्माण करावी, इंटरनेट नसताना माहिती सेव्ह करून नंतर अपलोड करता येईल अशी ऑफलाईन सुविधा द्यावी. व्हॉट्सॲप व सोशल मीडियावरून आदेश देणे थांबिण्यात यावी, शिक्षकांच्या अध्यापन वेळेचे संरक्षण करणारी डिजिटल कार्य धोरण शासनाने निश्चित करावी,केंद्र शाळा आणि प्रत्येक माध्यमिक शाळेवर ऑनलाईन कामा करीता संगणक प्रणाली उपलब्ध करावी तसेच या करीता कंत्राटी संगणक ऑपरेटरची नेमणूक करावी अश्या मागणीचे निवेदन सादर करण्यात आले आहे.

# परतवाडा येथे राज्यस्तरीय थांगता मार्शल आर्ट स्पर्धा उत्साहात

## महाराष्ट्रातील ३५० खेळाडूंचा सहभाग

**परतवाडा/वार्ताहर**




भारतीय पारंपरिक युद्ध कला तलवार भाला बाजी म्हणजे थांगता मार्शल आर्ट ची २९वी राज्यस्तरीय स्पर्धा चे आयोजन प्रथमच अमरावती जिल्हातील परतवाडा शहरात करण्यात आले होते. या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील सुमारे ३५० च्या वर खेळाडूंचा सहभाग होता.

ऑल महाराष्ट्र थांग-ता असोसिएशन व अखिल महाराष्ट्र लष्कर शास्त्रादी विविध शिक्षण प्रसार मंडळ तसेच परतवाडा थांग-ता क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने अंबिका लॉन परतवाडा येथे झालेल्या या स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अराखराव, तहसीलदार डॉ संजय गरकल महाराष्ट्र थांग-ता असोसिएशन चे अध्यक्ष मुकुंद धुळधर सचिव महावीर धुळधर, सदस्य रामदास जसेकर, गजानन कोल्हे सरपंच नामदेव बोरेकार या मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी उपविभागीय अधिकारी अरखराव व तहसिलदार गरकल या दोघांनी या खेळाविषयी माहिती जाणून घेतली.यावेळी राज्यभरातून आलेल्या सुमारे ३५० मुला मुलींनी स्पर्धेत आपआपले कौशल्य दाखवून मेडल प्राप्त केले व ऑक्टोम्बर मधे गोवा राज्यात होणाऱ्या थांगता च्या राष्ट्रीय स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले तीन दिवस चाललेल्या या राज्यस्तरीय स्पर्धत महाराष्ट्रातील २५ जिल्ह्याच्या खेळाडूंचा सहभाग होता. सर्वात जास्त मेडल प्राप्त मधे प्रथम क्रमांक सातारा जिल्हा व्दितीय क्रमांक अमरावती जिल्हा तर तृतीय क्रमांक मुंबई उपनगर यांना बहुमान प्राप्त झाला. स्पर्धेचा समारोप जल्लोषात साजरा करण्यात आला. प्रथमच परतवाडा शहरात राज्यस्तरावरील थांगता स्पर्धेचे आयोजन केल्याने महाराष्ट्रात शहराला नावलौकिक प्राप्त झाला आहे. राष्ट्रीय प्रशिक्षिका तसेच महाराष्ट्र थांगता हेड कोच रुपाली जहागिरदार यांचे सर्वचस्तरातून कौतुक करण्यात आले व भविष्यातही थांग ता मार्शल आर्ट च्या स्पर्धाचे आयोजन करण्यासाठी त्यांना मान्यवरांकडून शुभेच्छा देण्यात आल्या स्पर्धेत मोठ्या संख्येने खेळाडू,नागरिक क्रीडा प्रेमी व सर्व जिल्याचे जिल्हा संघटक जातीने उपस्थित होते.

# धारणीत चिल्लर नोटांचा तुटवडा

**धारणी/ वार्ताहर**



शहरात गेल्या काही महिन्यांपासून १० आणि २० रुपयांच्या नोटांचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून, या चिल्लर अभावी किरकोळ व्यवहार करणे व्यापारी व ग्राहक दोघांसाठीही डोकेदुखी ठरत आहे. बँकांकडून लहान नोटांचा पुरवठा थांबल्याने व्यवहारात अडथळे निर्माण झाले आहेत. यामुळे ग्राहक–व्यापाऱ्यांमध्ये दररोज वादावादी, भांडणे होत असून, बाजारपेठेत तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.धारणीतील ४ ते ५ प्रमुख बँका गेल्या वर्षभरापासून १० आणि २० रुपयांच्या नोटांचा पुरवठा अत्यल्प प्रमाणात करीत आहेत. परिणामी बाजारात ५०, १०० आणि त्यापेक्षा मोठ्या किंमतीच्या नोटांचीच उलाढाल सुरू आहे. मात्र, लहान रकमेच्या व्यवहारासाठी आवश्यक असलेल्या नोटा दुर्मिळ झाल्या आहेत.लहान नोटा उपलब्ध नसल्याने व्यापाऱ्यांनी पर्याय म्हणून ग्राहकांना चिल्लरच्या ऐवजी पाच रुपयांचे बिस्किटाचे पाकीट, चॉकलेट किंवा अन्य अन्नवस्तू देण्यास सुरुवात केली आहे. काही ठिकाणी ग्राहकांनी हे नाईलाजाने स्वीकारले असले, तरी अनेकांनी यावर नाराजी व्यक्त केली आहे. 'आम्हाला पैशांच्या ऐवजी वस्तू का द्याव्यात?'असा सवाल ग्राहकांकडून उपस्थित केला जात आहे.स्थानिकांनी बँका आणि जिल्हा प्रशासनाने लवकरात लवकर लहान नोटांचा पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी केली आहे. 'बँकांनी १० आणि २० रुपयांच्या नोटा पुरवाव्यात, नाहीतर आमचा व्यवसाय बंद करण्याची वेळ येईल,' असा इशारा काही व्यापाऱ्यांनी दिला

# अमरावती विद्यापीठ शैक्षणिक गुणवत्ता राखण्यात असमर्थ-अभाविप

## विद्यापीठाच्या ढिसाळ कारभाराविरोधात आंदोनल करणार

**अमरावती/का.प्र.**




गेल्या अनेक वर्षांपासून विद्यापीठाच्या कामकाजातील ढिसाळपणा, निष्क्रियता आणि विद्यार्थ्यांच्या विषयांवर विद्यापीठ प्रशासनाने गंभीरतेने लक्ष न देता विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करण्याचे काम विद्यापीठ प्रशासन करत आहे. या निष्काळजी वृत्तीमुळे लाखों विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आयुष्य अंधारात जात आहे.वेळोवेळी समस्यांना घेऊन अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सातत्याने आवाज उठवत आली आहे. विद्यार्थी हितासाठी निवेदन देण्यापासून तर आंदोलन करण्यापर्यंत सर्व पातळ्यांवर परिषदेने प्रयत्न केले, तरीही विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या हिताचे ठोस निर्णय घेतलेले नाही.याकरीता विद्यार्थी केंद्रित महत्त्वाच्या विषयांना घेऊन येणाऱ्या काळात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विदर्भ प्रांत विद्यापीठ प्रशासनाच्या भोंगळ कारभाराच्या विरोधात विद्यापीठ स्तरीय मोर्चा काढणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत दिली.

विद्यार्थ्यांना काय सोपे जाईल किंवा विद्यार्थी केंद्रित विचार विद्यापीठ प्रशासन करण्यासाठी नेहमीच दिरंगाई दाखवते या निष्काळजी आणि बेफिकीर वृत्तीमुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे आणि प्रशासन मात्र हातावर हात धरून बसले आहे. शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी महत्त्वाचे बिंदू म्हणजे प्रवेश, परिक्षा, परिणाम, पाठ्यक्रम व पदभरती म्हणून विद्यापीठाची वास्तविक स्थिती बघितली तर जी प्रवेश प्रक्रिया जुलै-ऑगस्ट मध्ये पूर्ण झाली पाहिजे ती लांबवत लांबवत सप्टेंबर पर्यंत पूर्ण होत नाही, परीक्षेच्या काळात हॉल तिकीटचे प्रश्न असो, परीक्षा केंद्रावरची असुविधा असो यामुळे परिक्षेच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. अश्या कितीतरी अडचणींना आज विद्यार्थ्यांना तोंड द्यावे लागत आहे आणि त्यानंतरही जेव्हा परिणामाची वेळ येते तेव्हा सुद्धा विद्यापीठ प्रशासन परिणाम पहिला वेळेत लावणे असो अथवा योग्य लावणे असो यासाठी अपयशी ठरते.

अशा सर्व विद्यार्थी केंद्रित महत्त्वाच्या विषयांना घेऊन येणाऱ्या काळात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विदर्भ प्रांत विद्यापीठ प्रशासनाच्या भोंगळ कारभाराच्या विरोधात विद्यापीठ स्तरीय मोर्चा काढणार, या मोर्चात प्रामुख्याने प्रवेश, परीक्षा, परिणाम, पाठ्यक्रम, पदभरती, शिष्यवृत्ती, वसतिगृह, NEP क्रियान्वयन आणि अत्यंत महत्त्वाचे म्हणजे छात्र संघ निवडणुका ज्या होण्याने विद्यार्थ्यांचे नेतृत्व बाहेर पडते व प्रत्येक विद्यार्थी कॅम्पस मध्ये येण्यासाठी आतुर असतो अशा विविध विषयांचे समावेश आहे. या विद्यापीठ मोर्चाचे काही टप्पे ठरवले आहे त्यात २६ ऑक्टोबर ते १३ नोव्हेंबर विद्यार्थी संपर्क अभियान,७ नोव्हेंबर महाविद्यालय बंद आंदोलन,१४ नोव्हेंबर विद्यापीठ मोर्चा काढण्यात येईल.

पत्रकार परिषदेला अनिकेत अंजीकर, पायल किनाके,रिद्देश देशमुख,कैवल्य रूद्रे,गौरी भारती,गौरी देशमुख आदी उपस्थीत होते.

## संक्षिप्त

### इमासतर्फे 'संत साहित्यातील संविधान मूल्य' व्याख्यानमाला २६ ऑक्टोबरला


**अमरावती-** येथील अलुतेदार, बलुतेदार, भटक्या विमुक्त जनजाती व अल्पसंख्यांक जाती समन्वय समिती म्हणजेच इमासतर्फे 'संत साहित्यातील संविधान मूल्य' या विषयावरील व्याख्यानमाला रविवार २६ ऑक्टोबर रोजी स्थानिक गाडगेनगरमधील संत गाडगेबाबा सभागृह क्र. ३ येथे दुपारी २ ते ६ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आली आहे.सदर व्याख्यानमाला हभप श्यामसुंदर महाराज सोन्नर, जि. बिड सादर करणार आहेत. सकल ओबीसी समाजामधे आपल्या हक्काचे, कर्तव्याचे आणि संतांनी केलेल्या उपदेशाचे प्रसार-प्रचार होण्यासाठी इमास संस्थेने जनजागृतीची विशेष मोहीम गेल्या वर्षी जिल्ह्यात राबविली होती. याला बहुजन समाजाचा उदंड प्रतिसाद प्राप्त झाला होता.२६ ऑक्टोबर रोजी केलेल्या आयोजित व्याख्यानमालेचा शहर व जिल्ह्यातील सकल ओबीसी समाजाने लाभ घ्यावा, असे आवाहन इमासचे अध्यक्ष इंजि. वासुदेव चौधरी, उपाध्यक्ष इंजि. सुभाष गोहत्रे, महासचिव डॉ. श्रीराम कोल्हे, प्रसिद्धी प्रमुख ॲड. प्रभाकर वानखडे यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे.

### दीपावलीनिमित्त चंदनउटी उत्सव



**चांदुर रेल्वे-** 'चला जाऊ सावंगपुरी, गडे हो भक्तांचे माहेरी... तिथे नांदतो हरि, हेच होय पुण्याची पायरी !' या भक्तिभावाने ओथंबलेल्या ओवीने दीपावलीच्या पावन पर्वावर श्रीक्षेत्र सावंगा विठोबा नगरीत चंदनउटी उत्सव अखंड नामस्मरणात भक्तांची मांदियाळी उत्साहात पार पडणार आहे. श्री विठोबा संस्थानच्या वतीने नेहमीप्रमाणे यावर्षीही दीपावली-अमावस्यानिमित्त विशेष चंदनउटी उत्सव मोठया उत्साहात साजरा होणार आहे. २१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता या पवित्र सोहळयाची सुरुवात होणार असून अवधूती भजन आणि अखंड अवधूत नामस्मरणाने संपूर्ण परिसर गजरमय होणार आहे.भक्तांच्या माहेरी म्हणविणाऱ्या सावंगपुरी नगरीत भाविकभक्त मोठया संख्येने उपस्थित राहणार असून दुपारी २ वाजता बाहेरगावावरुन आलेल्या भाविकांसाठी महाप्रसाद आयोजन करण्यात आले आहे. श्री अवधुत महाराजांच्या प्रेरणेने संस्थानच्या वतीने भाविकांच्या निवासाकरिता सर्व सुविधासह पाच मजली इमारतीच्या बांधकामाचा शुभारंभ अगदी थोड्याच दिवसात होणार आहे.संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रवीण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी यांच्यासह समस्त विश्वस्त मंडळाने केले आहे.

### विवेकानंद कन्या विद्यालयात वाचन प्रेरणा दिन



**लेहेगाव(कैलास ठाकूर) -** शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या भारताचा मिसाईल मॅन, विज्ञानाचा योगा, विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आभाळमाया देणारा विचारवंत 'भारतरत्न डॉ. ए.पी .जे. कलाम यांची जयंती' वाचन - प्रेरणा दिन म्हणून शाळेचे जेष्ठ शिक्षक योगेंद्र तट्टे, पी.बी. आडे, प्रीती सावरकर, कडू यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झाला.

या प्रसंगी विद्यार्थ्यानी ईश्वरी पोटे,पूनम कणेर, नव्या कडू, आस्था वैद्य आदि विद्यार्थ्यांनी अतिशय ओघवत्या भाषेत वाचनाची ताकद, विद्यार्थ्यावर खूप प्रेम करणारे राष्ट्रपती डॉ. कलम यांच्या वाचनाला आपल्या आयुष्याचा श्वास मानला होता. याप्रसंगी विद्यार्थ्यांने कमीत कमी एक पुस्तक वाचून दररोज १० मिनीटे मौन वाचन करण्याचा संकल्प करून भारतरत्न डॉ. ए.पी.जे. कलाम यांना आदरांजली वाहिली. अशाप्रकारे अत्यंत अभ्यासमय, प्रसन्न उत्साही वातारणात अविनाशी सूर्य डॉ. .पी.जे. कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रेरणादायी कार्यक्रमाच्या सूत्राचे संचालन सृष्टि क्षीरसागर हिने केलेत. तर उपस्थितांचे आभार रुजूता तट्टे हिने मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी, प्रीती सावरकर तथा शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# विवाहित तरुणाने प्रेयसीचा गळा आवळून केला खून

## मृतदेह रेल्वे रुळावर टाकून आत्महत्येचा बनाव, आरोपी जेरबंद

**चांदूर रेल्वे /प्रतिनिधीः-** प्रेमसंबंधातील तणावामुळे विवाहित तरुणाने आपल्या प्रेयसीचा गळा आवळून खून केला आणि तिचा मृतदेह रेल्वे रुळावर ठेवून आत्महत्येचा बनाव रचल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पूजा सूरज उके (वय २५, रा. डांगरीपुरा) असे मृतक महिलेचे नाव आहे. स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणच्या पथकाने अत्यंत कौशल्याने तपास करत या प्रकरणाचा छडा लावत आरोपीला जेरबंद केले आहे. आरोपीचे नाव शुभम विठ्ठलराव हटवार (वय



२८, रा. डांगरीपुरा, चांदूर रेल्वे) असे आहे. सततच्या तगाद्याला कंटाळून विवाहित तरूणाने पत्नीच्या मदतीने प्रेयसीचा खून करून तिचा मृतदेह रेल्वे रुळावर ठेवला होता. हा प्रकार उघडकीस येताच चांदूर रेल्वे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

१५ ऑक्टोबर रोजी चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात एका तरुणीचा रेल्वेखाली आत्महत्येचा प्रकार नोंदवण्यात आला होता. मृत युवतीच्या गळ्यावर व्रण असल्याने डॉक्टरांनी आत्महत्येचा संशय फेटाळला आणि हे प्रकरण खूनाचे असल्याचे प्राथमिक संकेत दिले. या संशयावरून पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले. पो.उप.नि. मूलचंद☞(पान २ वर)

# बाफना कंपनीच्या निकृष्ट सोयाबीन बियाण्याने शेतकरी उद्ध्वस्त

## -शेंगांत दाण्यांचा पत्ताच नाही! -विदर्भातील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान

### कंपनी व कृषी विभागावर मिलीभगतीचा आरोप

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** अमरावती तालुक्यातील शेतकऱ्यांवर या हंगामात अभूतपूर्व संकट कोसळले आहे. बाफना कंपनीने बाजारात आणलेल्या सोयाबीन बियाण्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून, शेंगांमध्ये दाण्यांचा पत्ताच नसल्याने शेतकऱ्यांचे सर्वस्व उद्ध्वस्त झाले आहे.

शेतकऱ्यांनी बाफना कंपनीचे २५ किलो वजनाचे बियाण्याचे पोते ३२०० रुपयांना नगदी खरेदी करून पेरले, मात्र पेरणीच्या वेळीच या बियाण्यांची उगवण शक्ती अत्यंत कमी आढळली. या संदर्भातील शेकडो तक्रारी कृषी विभागाकडे नोंदवण्यात आल्या. तरीही विभागाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही.



साडेतीन महिन्यांपासून शेतकऱ्यांनी मशागत, फवारणी, खत-टॉनिक, फंगीसायड आणि कीटकनाशकांवर हजारो रुपये खर्च केले, परंतु परिणाम शून्य! शेंगा लागल्या तरी त्यात दाणे नाहीत. आज चार महिने उलटूनही या सोयाबीनचे पाने आणि दांड्या हिरवेच असून दाण्यांचा विकास झालेला नाही.

या संदर्भात शेतकऱ्यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, कंपनीचे अधिकारी फोन उचलत नाहीत आणि शेतावर यायलाही तयार नाहीत, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली.

शिवसेनेचे तालुकाप्रमुख व माजी जिल्हा परिषद ☞(पान २ वर)

# क्रेनच्या धडकेत आजोबाचा मृत्यू ,नातू जखमी

### नवी बस्ती बडनेरा येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या नवी बस्ती येथील समशानभूमी जवळ क्रेनच्या धडक बसल्याने आजोबाचा मृत्यू झाला, तर नातू जखमी असल्याची घटना बुधवारी सायंकाळी समोर आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली. राजेंद्र मोतीराम सायरे (वय ६१, वडूरा विठ्ठल मंदिरा जवळ) असे मृतकाचे नाव आहे. तर त्यांचा नातू पूर्वेश सायरे जखमी आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे.




माहितीनुसार राजेंद्र सायरे बुधवार सायंकाळी आपला नातू पूर्वेशला घेऊन वडूरा येथे खरेदी करण्यासाठी ☞(पान २ वर)


# धारणीतील प्राणघातक हल्ल्यात जखमी तरुणाचा मृत्यू

### दाना बाजार परिसरातील घटना

**धारणी/प्रतिनिधीः-** येथील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील वार्डमध्ये जुन्या वादात बैल व्यापारींवर प्राण घातक हल्ला करण्यात आला होता. यामध्ये फाजील बेग मिर्झा (वय ३०, हिवरखेड ,अकोला ) यांचा मृत्यू झाला होता, तर त्यांचा भाऊ नाजीम बेग मिर्झा जखमा होता. त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारादरम्यान आज गुरुवार १६ ऑक्टोंबर रोजी सकाळी त्यांचा मृत्यू झाला.

माहितीनुसार बैल व्यापारी फाजिल बेग व नाजिम बेग ५ ऑक्टोबर रोजी धारणी कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये आले होते. त्यावेळी





रात्री दाना बाजार परिसरात प्लॉट वितरण बद्दल त्यांचे आरोपींसोबत वाद झाले. या वादात दोन्ही भावांवर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. यामध्ये फाजील बेग यांचा☞(पान २ वर)

# महसूल सेवकांना तलाठी भरतीत प्राधान्य देणार

## महसूल सेवकांच्या प्रश्नावर महसूलमंत्र्यांचे आश्वासन

### मंत्रालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक

**मुंबई/प्रतिनिधीः-** महसूल सेवकांचा समावेश चतुर्थ श्रेणीमध्ये करुन त्यांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी अशी महसूल सेवकांची मागणी होती. याबाबत महसूलमंत्र्यांनी मंत्रालयात तातडीची बैठक घेऊन त्यांचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. वेतनश्रेणी लागू करता येत नसल्यामुळे त्यांना तलाठी भरतीमध्ये काही जागा राखीव ठेवून अनुभवाप्रमाणे अधिक गुण वाढवून देण्याच्या मुद्दावर सकारात्मक चर्चा झाली. महसूल सेवकांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येतील, असे आश्वासनही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.



महसूल सेवकांच्या प्रश्नाबाबत महसूलमंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला राज्याचे मुख्य सचिव राजेश मिना, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव सचिव ओमप्रकाश गुप्ता, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे आणि महसूल सेवक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. महसूलमंत्री बावनकुळे यांनी महसूल सेवकांचे उपोषण सोडविताना त्यांचे प्रश्नही प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार गुरुवारी मंत्रालयात वरिष्ठ ☞(पान २ वर)

# जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहनाला प्रकल्पग्रस्तांचा सकारात्मक प्रतिसाद

## स्थलांतरणाला पूर्ण सहकार्य करण्याचे सरपंचांचे आश्वासन



**अमरावती/प्रतिनिधीः-** निम्न पेढी प्रकल्पामध्ये बाधीत झालेल्या गावांचे दर्जेदार पुनर्वसन करण्यात येत आहे. प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन त्या मान्य केल्या आहेत. निम्न पेढी प्रकल्पाच्या घळभरणीला शासनाने मान्यता दिल्याने या कामास सुरवात करण्यात आली आहे. त्यामुळे बाधित गावातील नागरिकांनी पुनर्वसित गावात तातडीने स्थलांतरीत व्हावे, या जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या आवाहनाला बाधीत गावाच्या सरपंचांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज निम्नपेढी प्रकल्पाबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी श्रद्धा उदावंत, प्रसेनजित चव्हाण यांच्यासह बाधीत गावातील प्रतिनिधी निलेश मानकर, गौतम खंडारे, प्रविण तायडे ☞(पान २ वर)

■ प्रकल्पग्रस्तांची घरकुल आणि दर्जेदार पुनर्वसनाची मागणी मान्य करण्यात आली आहे. पुनर्वसनाच्या कामात पारदर्शकता, तसेच खारपाणपट्टा असल्याने शुद्ध पाण्याची सोय करण्यात आली आहे. महत्वाचे प्रश्न मार्गी लागल्याने पुनर्वसनाला वेग आला आहे. स्मशानभूमी स्थलांतर आणि ओपन जिमची मागणी मान्य झाली आहे. तसेच इतरही प्रश्न येत्या काळात मार्गी लागतील. त्यामुळे नागरिकांच्या स्थलांतरणासाठी प्रयत्न करण्यात येतील. **-निलेश मानकर, कुंड सर्जापूर**

■ गेल्या कालावधीत दर्जेदार पुनर्वसनाची कामे गतीने झाली आहेत. यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी सहकार्य केले आहे. घराच्या बांधकामासाठी मदत मिळणार आहे. तसेच स्थलांतरणासाठी दोन लाख रूपयांची रक्कम एकत्र देण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांचे पुनर्वसित गावात स्थलांतरण होणार आहे. पुनर्वसनाबाबत शासनाने मागण्या मान्य केल्या आहेत. त्यामुळे स्थलांतरणासाठी सहकार्य करण्यात येईल. **-गौतम खंडारे, अळणगाव**

■ प्रकल्पबाधीत गावांतील नागरिकांना भूखंडांचा लाभ देण्यात येत आहे. तसेच कुंड खुर्द, सावरखेड, ततारपूर येथील रस्त्यांचा विषय मार्गी निघाला आहे. पुनर्वसित गावात विकासकामांचा निधी मंजूर झाला आहे. नवीन स्मशानभूमी आणि ओपन जीमची मंजूरात मिळाली आहे. त्यामुळे येत्या १५ दिवसांत संपूर्ण गावाच्या स्थलांतरण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. **-सुजाता तायडे, कुंड सर्जापूर**

# महानगरपालिका आयुक्तांची राजापेठ परिसरात पार्कींग संदर्भात पाहणी

## -वाहतूक शिस्तीसाठी दिले महत्वाचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरातील वाढती वाहतूक आणि मर्यादित पार्किंग व्यवस्था लक्षात घेता, अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज राजापेठ परिसरात प्रत्यक्ष पाहणी करून वाहतूक नियोजन आणि पार्किंग व्यवस्थापनासंबंधी सविस्तर आढावा घेतला. शहरातील वाहतूक सुरळीत राहावी, नागरिकांना वाहनतळाच्या अभावामुळे होणारा त्रास कमी व्हावा आणि प्रमुख मार्गावरील गर्दी टाळण्यासाठी त्वरित उपाययोजना राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले.

राजापेठ हा शहरातील व्यावसायिक आणि गर्दीचा भाग असल्याने येथे वाहनांची वाढती वर्दळ आणि अनियमित पार्किंगमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सकाळी राजापेठ परिसरातील मुख्य रस्ते, चौक आणि अंडरबायपास परिसराची पाहणी केली. पाहणीदरम्यान वाहतूक व्यवस्थापन अधिकाऱ्यांसह मनपाचे अभियांत्रिकी विभाग, झोन अधिकारी आणि वाहतूक पोलीस उपस्थित होते.



आयुक्तांनी पाहणी दरम्यान ऑटो स्टँड उभारणी तातडीने करण्याचे निर्देश दिले. तसेच अंडरबायपास मार्गावरून जाणाऱ्या वाहनांचे नियोजन सुयोग्य पद्धतीने करण्याचे आदेश देण्यात आले, ज्यामुळे शहराच्या मध्यवर्ती भागातील वाहतूक दाब कमी होईल. आयुक्तांनी वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक ठिकाणी वाहतूक फलक, दिशादर्शक बोर्ड आणि बॅरिकेड्स बसविण्याचे तसेच शिस्तभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्याचप्रमाणे, फुटपाथवरील अतिक्रमणे आणि अनधिकृत पार्किंग हटविण्याची मोहीम राबविण्याचे निर्देशही आयुक्तांनी संबंधित झोन अधिकारी आणि वाहतूक विभागाला दिले. नागरिकांना नियमांचे पालन करून निश्चित जागेतच वाहन उभे करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक म्हणाल्या की, शहरातील वाहतूक शिस्त राखणे आणि नागरिकांना सुलभ, सुरक्षित प्रवास सुविधा उपलब्ध करून देणे हे महानगर पालिकेचे ☞(पान २ वर)

# बिबट्याने पाळीव श्वानाची केली शिकार

### तपोवन परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** गेल्या काही दिवसापासून शहराच्या आसपास बिबट्याचा वावर दिसून येत आहे. वन विभागाने त्यासाठी लोकांना सावध देखील केले. विद्यापीठ, वडाळी व तपोवन परिसरात बिबट्यापासून सावधान राहण्याचे बोर्ड देखील लावले आहे. दुसरीकडे तपोवन परिसरातील



डॉक्टर कॉलनी मध्ये बिबट्याने एका पाळीव कुत्र्याचा फडशा पाडल्याने सर्वत्र भय व्याप्त आहे. विशेष म्हणजे पाळीव श्वानाची शिकार केल्यानंतर बिबट्या त्याचे प्रेत आपल्या तोंडात दाबून जंगलात घेऊन गेला.माहिती नुसार डॉक्टर कॉलनीमध्ये नांदगाव पोलीस स्टेशनचे हवालदार ☞(पान २ वर)

# नांदगाव पंचायत समितीने केला शिक्षकांचा सन्मान

## मिशन पटसंख्या, नवोदय, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांची दखल



**नांदगाव /प्रतिनिधीः-** पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर द्वारा दिनांक १४ ऑक्टोबर रोजी पंचायत समिती सभागृहात शिक्षक सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या सोहळ्यात शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षा, आदर्श पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी डॉ. स्नेहल शेलार व सहा. गटविकास अधिकारी संजय झंझाळ आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ☞(पान २ वर)

# चोरी गेलेले १०५ मोबाईल मूळ मालकांना दिले परत





## सायबर सुरक्षेसंदर्भात महत्त्वपूर्ण मार्गदर्शन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यभरात ऑक्टोंबर महिना सायबर जनजागृती महिना म्हणून राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने विविध कार्यक्रम जनजागृतीसाठी घेतली जात आहे. सायबर गुन्हेगारांकडून सतर्क राहण्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात येत आहे. अशात सायबर पोलिसांनी चोरी गेलेल्या १७९ मोबाईलपैकी १०५ मोबाईल शोधून मूळ मालकांना परत केले.

पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या हस्ते आज गुरुवार १६ ऑक्टोंबर रोजी पोलीस मुख्यालय मध्ये आयोजित सायबर जनजागृती मार्गदर्शन कार्यशाळेमध्ये हे मोबाईल परत करण्यात आले. यावेळी पोलीस उपायुक्त धुमाळ रमेश धुमाळ,श्याम घुगे आदि उपस्थित होते. शहरातून हरविले व चोरी गेलेले मोबाईलच्या तक्रारी प्राप्त होताच सायबर पोलीस स्टेशन ने तांत्रिकी पद्धतीने चोरी गेलेल्या मोबाईलचा शोध घेऊन एकूण १०५ मोबाईल☞(पान २ वर)

# अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणुकीत

## पक्ष नेतृत्वाला पडलाय पेच

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** नगराध्यक्षपदासाठीचे आरक्षण 'अनुसूचित जाती' अर्थात एच सी प्रवर्गासाठी निघाल्याने अध्यक्षपदाची निवडणूक लढण्यास इच्छूकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. देवी पावली, असा भास त्यांना होत आहे, कोणत्याही प्रवर्गातील उमेदवाराला निवडणूक लढविता येणार नसल्यामुळे अनुसूचित जातीच्या इच्छुकांची भाऊगर्दी वाढणार आहे. त्यामुळे राजकीय



पक्षापुढे पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

अनेकदा विशिष्ट प्रवर्गासाठी अध्यक्षपद आरक्षित झाल्यावर तीव्र इच्छा असताना अनेकांना निवडणूक लढता येते. पण नगराध्यक्षपदाचे आरक्षण यावेळी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी निघाल्यामुळे ही संधी आपल्यालाच मिळावी, यासाठी अनेकजण सक्रिय झाले आहेत. राजकीय पक्ष व इच्छुकांकडून नव्या समीकरणाला सुरुवात झाली आहे. अनेक वर्षानंतर थेट नागरिकांमधून नगराध्यक्ष निवडले जाणार आहे. त्यामुळे निवडनुकीच्या काळात नाही'तर इतर वेळेसही जास्तीत जास्त चांगला जनसंपर्क ठेवणाऱ्या उमेदवाराला फायदा होणार आहे. यातच इच्छुकांची वाढती संख्या पाहता सर्व राजकीय पक्ष स्वतंत्रपणे ☞(पान २ वर)